# सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | बुधवार, १८ डिसेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २६४ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com







## रेल्वेस्टेशन व विमानतळावर छत्रपती संभाजीनगरचा नामोल्लेख करावा : अंबादास दानवे

तभा वृत्तसेवा

नागपुर, दि .१७ डिसेंबर : छत्रपती संभाजीनगर जिल्हा व शहराचे राज्य शासनाच्या वतीने नामांतरण केंद्र शासनाच्या परवानगीने सदरील नामांतरण झाले आहे.मात्र,अद्यापपर्यंत शहरातील रेल्वेस्टेशन व विमानतळावर छत्रपती संभाजीनगर असा उल्लेख होत नाही. या ठिकाणी नामोल्लेख करण्यात यावा,अशी मागणी आज विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी परिषद सभागृहात केली.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक,जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ व कृषी उत्पन्न बाजार समिती या स्थानिक संस्थावर सुद्धा छत्रपती संभाजीनगर असा नामोल्लेख होत नाही. तसेच धाराशिव व अहिल्यानगरचे सुद्धा नुकतेच नामांतरण झाले आहे. येथील स्थानिक संस्थांवरही नव्या नावाचा नामोल्लेख करण्यात यावा,अशीही मागणी दानवे यांनी केली. उत्तर प्रदेशातील फैझाबादचे एका रात्रीत आयोध्या असे नामांतरण झाले. मात्र राज्यात संभाजीनगर, धाराशिव व अहिल्यानगर यांचे नामांतर होऊन मोठा कालावधी गेला आहे. तरीही अद्यापपर्यंत येथील स्थानिक संस्थांवर नवीन नावाप्रमाणे उल्लेख का होत नाही ? असा प्रश्न दानवे यांनी उपस्थित केला.

# नागपूर मेट्रो प्रकल्प टप्पा-२ साठी १५२७ कोटींचे अर्थसहाय्य : देवेंद्र फडणवीस

## महामेट्रो व आशियाई विकास बँकेत सामंजस्य करार

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

नागपूर, दि. १७ डिसेंबर : नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याला चालना देण्यासाठी आशियाई विकास बँकेकडून १५२७ कोटी रुपयांचे (२०० मिलियन डॉलर) अर्थसहाय्य मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत विधानभवनातील मंत्रिमंडळ सभागृहात यासंदर्भात आज सामंजस्य करार करण्यात आला. या प्रकल्पामुळे नागपूर शहरासह परिसराच्या विकासाला आणखी गती मिळणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.



महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर आणि आशियाई विकास बँकेच्या संचालक मिओ ओका यांनी अर्थसहाय्याच्या करारावर सह्या केल्या. नागपूर मेट्रो रेल प्रकल्पाच्या टप्पा-२ साठी आशियाई विकास बँक आणि युरोपियन इन्व्हेस्टमेंट बँक यांच्याकडून एकूण ३५८६ कोटी रुपयांचा वित्तपुरवठा करण्यात येणार आहे. त्यापैकी १५२७ कोटी रुपये आशियाई विकास बँकेकडून मिळणार असून त्यासंदर्भातील करार आज करण्यात आला. महामेट्रोला हा वित्तपुरवठा जपानी येन या चलनामध्ये मिळणार आहे. त्यामुळे कर्जावर तुलनेने कमी व्याज द्यावे लागणार आहे. महामेट्रोला या कर्जाची रक्कम केंद्रीय गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाच्या माध्यमातून उपलब्ध केली जाणार आहे.

नागपूर मेट्रो रेल प्रकल्प टप्पा-२ हा खापरी ते एमआयडीसी इएसआर दरम्यान १८.५ किलोमीटर, ऑटोमोटिव्ह स्क्वेअर ते कन्हान नदी दरम्यान १३ किलोमीटर, प्रजापती नगर ते ट्रान्सपोर्टनगर दरम्यान ५.६ किलोमीटर आणि लोकमान्यनगर ते हिंगणा दरम्यान ६.७ किलोमीटर असा एकूण ४३.८ किलोमीटरचा असणार आहे. या मेट्रो प्रकल्पाचा लाभ नागपूर परिसरातील १० लाख रहिवाशांना होणार आहे.

यावेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव आश्विनी भिडे, सचिव श्रीकर परदेशी, विविध विभागांचे सचिव, आशियाई विकास बँकेचे विविध विषयतज्ज्ञ यांच्यासह महामेट्रोचे संचालक (एसपी) अनिलकुमार कोकाटे, संचालक (वित्त) हरेंद्र पांडे आदी उपस्थित होते.

# मंत्रीपदात डावल्याने महायुतीतील जेष्ठांमध्ये नाराजीचे धुमारे!

## ११ जणांची उघड नाराजी

तभा वृत्तसेवा/जमीर काझी

मुंबई,दि.१६ डिसेंबर : महायुती सरकारच्या मंत्रिमंडळ विस्तारात ३३ कॅबिनेटसह ३९ जणांना ताण देण्यात आले असले तरी तिन्ही पक्षातील अनेक दिग्गज व ज्येष्ठ नेत्यांना डावलण्यात आले आहे. त्यामुळे त्यांच्याकडून उघड व अप्रत्यक्षपणे नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. त्यांच्याकडून पक्ष नेतृत्वाला एक प्रकारे इशारा देण्यात आला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे छगन भुजबळ यांनी तर समर्थकांचा मेळावा घेऊन पुढील भूमिका ठरवणार असल्याचे सांगून एकप्रकारे पक्षप्रमुख व उपमुख्यमंत्री अजित पवार यांना इशारा दिला . प्रकाश सोळंके यांनी धनंजय मुंडे ऐवजी आपल्याला मंत्रिमंडळात स्थान मिळाला हवे होते अशी उघडपणे नाराजी बोलून दाखवली .

भाजपाचे ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार यांच्यासह सदाभाऊ खोत यांनी उघडपणे नाराजी व्यक्त केली आहे.तर यामध्ये शिवसेना शिंदे गटाच्या विजय शिवतारे,तानाजी सावंत, दीपक केसरकर, प्रकाश सुर्वे यांनी उघडपणे नाराजी व्यक्त केली. शिवतारे यांनी अडीच वर्षांनंतर मंत्रीपद दिले तरी ते घेणार नाही, असे सांगत खदखद जाहीरपणे मांडली.

मंत्रिमंडळ विस्तारात आधी मंत्री असलेल्या अनेक बड्या नेत्यांना डच्चू देण्यात आला आहे. त्यामध्ये भाजपाने मुनगंटीवार, विजयकुमार गावित या जेष्ठांसह सदा खोत, गोविंद पडळकर,रवी राणा नाराज आहेत.

शिवसेना शिंदे गटातील अब्दुल सत्तार, तानाजी सावंत, दीपक केसरकर, विजय शिवतारे, प्रकाश सुर्वे यांचा पत्ता कट करण्यात आला आहे. त्यामुळे नेत्यांमधून नाराजी व्यक्त होत आहे.तसेच पवनी विधानसभा मतदारसंघाचे आमदार नरेंद्र भोंडेकर यांना मंत्रिपद न मिळाल्यानं त्यांनी काल उघड नाराजी व्यक्त करत त्यांनी शिवसेना उपनेते पदाचा राजीनामा देखील दिला. त्यांचं पक्षात काहीच योगदान नाही अशांना देखील मंत्रिपद मिळाले ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप आहेत, त्यांना देखील मंत्रिपद मिळालं, जर मला जनतेला न्याय देता येत नसेल तर पदावर राहून काय उपयोग असा सवाल भोंडेकर यांनी केला आहे.

मंत्रिपद न मिळाल्यामुळे तानाजी सावंत नाराज झाले आहेत. नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनाला न थांबता ते पुण्यातील बालाजी नगर येथील कार्यालयात परतले आहेत. माध्यमांसमोर येण्यासाठी तानाजी सावंत यांनी नकार दिला आहे. राष्ट्रवादीच्या छगन भुजबळ यांनी 'जहा नही चैना वहा नही रहना ,असे म्हणत पक्षातून बाहेर पडण्यात चा सुतवा दिला आहे येवल्यात पक्ष कार्यकर्ते समर्थकांचा मेळावा घेऊन ते पुढील भूमिका जाहीर करणार आहेत. त्यांच्यासह अनिल पाटील यांनाही मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले नाही तर प्रकाश साळुंके इच्छुक असून त्यांना डावलण्यात आल्याने त्यांनी उघडपणे नाराजी दर्शवित अधिवेशनात हजर न आणण्याचा निर्णय घेतला आहे.

# 'वन नेशन वन इलेक्शन'च्या आधी निवडणूक प्रक्रिया पारदर्शक करा : उद्धव ठाकरे

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई,दि.१७ डिसेंबर:

'वन नेशन वन इलेक्शन' होता कामा नाही त्याच्याआधी निवडणूक प्रक्रिया पारदर्शक झाली पाहिजे. निवडणूक आयुक्तांची नेमणूक

निवडणुकीतून केली पाहिजे, अशी मागणी माजी मुख्यमंत्री व ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज पत्रकारांशी बोलताना केले हिवाळी अधिवेशनासाठी सहभागी होण्यासाठी ठाकरे आज नागपूरला आले होते विधान परिषदेत काही सभागृह उपस्थित राहिल्यानंतर पत्रकार परिषद घेऊन त्यांनी राज्यातील व देशातील सद्यस्थिती बाबत आपली भूमिका स्पष्ट करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी भाजपा व महायुती सरकारवर खेळाडू टीका केली .मंत्रिमंडळ विस्तारात स्थान न मिळाल्याने छगन भुजबळ यांच्यासह शिवसेनेतील अनेक आमदार नाराज आहेत. त्यांना पुन्हा पक्षात घेणार का? अशी विचारणा केली असता त्यांनी पहिल्यांदा आपली भूमिका स्पष्ट करून दे मग पाहू, असे उत्तर दिले.

ते म्हणाले, हिवाळी अधिवेशन सुरू झाले .पण हे बिन खात्याचे मंत्री असून अद्याप खातेवाटप झालेले नाही. त्यामुळे नेमकी जबाबदारी कोणावर आहे एखादी निश्चित होणार ?

की नुसते एक गंमत म्हणून अधिवेशन घेतलं जाते असं जर का असेल तरी लोकशाहीची थट्टा आहे मला असं वाटतं की लवकरात लवकर खातेवाटप व्हायला पाहिजे होता पण एवढा राक्षसी बहुमत मिळाल्यानंतर एक तर मंत्रिमंडळ स्थापन करण्यासाठी किंवा मुख्यमंत्रीच्या शपथविधीसाठी वेळ लागला मंत्रिमंडळ विस्तारासाठी वेळ लागला विस्तार झाला तरी देखील अजूनही खाते वाटप झालेले नाही कोणत्याही मंत्री कोणत्याही प्रश्नाला उत्तर देतोय काय चालले आहे.काही कळत नाही. हे अधिवेशन घेतले कशाला? असे सांगून

'लोकसभेत वन नेशन वन इलेक्शन' विधेयकाबाबत ते म्हणाले की, निवडणूकीची प्रक्रिया पारदर्शी करण्याची आवश्यकता आहे .कारण राज्यातील सध्याचे सरकार हे ईव्हीएम सरकार असल्याचे जनतेचे मत बनले आहे तीव्र नाराजी असतानाही हे बहुमताने निवडून कसे येते याबाबत जनतेमध्ये शंका व्यक्त होत आहे. असे सांगून ते म्हणाले की, निवडणूक आयुक्त हे नेमले जाणार असतील आणि ते जर आम्हाला निवडणुकीचे कायदे शिकवणार असतील तर ती प्रथा योग्य नाही आणि अशा व्यक्तीच्या अधिपत्याखाली' वन नेशन वन इलेक्शन 'होता कामा नये पहिला प्रथम निवडणूक आयुक्तांना सुद्धा निवडणूक प्रक्रियेतून त्यांनी निवडण्याची प्रक्रिया झाली पाहिजे. त्यासाठी कोणाची मत घ्यायची, कशी घ्यायची? हे ठरवावी लागेल .पण निवडणूक आयुक्त सुद्धा निवडून आला पाहिजे तर आणि तरच त्याला निवडणूक आयुक्त मानले गेले पाहिजे.

नवीन सरकार महाराष्ट्र मध्ये आलेले आहे .यापूर्वी अडीच वर्षे आपण घटनाबाह्य सरकार पाहिले आणि त्याच्यानंतर या निवडणुकांचा जो काही निकाल लागला त्याच्यामुळे जनतेत या सरकारला ईव्हीएम सरकार म्हणतात तर अशा या जनतेच्या शब्दात ईव्हीएम सरकारचा पहिला अधिवेशन आहे, या सरकारकडून जनतेच्या बऱ्याच अपेक्षा आहेत .काही गावांमध्ये जो काही निवडणुकीचा निकाल लागला त्याच्याविरुद्ध आंदोलन सुरू झालेली आहेत एकूणच काय की विजयाचा आनंद कुठे दिसला नाही ? परवाकडे मंत्रिमंडळाचा विस्तार जरूर झाला. पण विस्तारापेक्षा मंत्रिमंडळाच्या वजाबाकीची चर्चा अधिक रंगलेली आहे . त्यांनी सरकार स्थापन केले आता माझी मागणी अशी आहे की ,प्रत्येकाने आपापल्या जाहीरनाम्यामध्ये आमचे सरकार आले तर आम्ही केले असते. या सरकारने लाडक्या बहिणीपेक्षा लाडक्या आमदार मिळालेत आणि नावडती आमदार अशीच चर्चा जास्त सुरू झाली आहे. सरकारने लाडकी भेट योजनेसाठी जाहीरनामा दिलेल्या आश्वासनाप्रमाणे २१०० रुपये देण्याचे तातडीने पूर्तता करावी, तसेच निकषाचे निमित्य देवून आवडती व नावडती बहीण असा काही प्रकार करू नये , राज्यपालांच्या अभिभाषणाबाबत बोलताना ते म्हणाले की ,'मुंबईच्या संबंधात आरेमधील मेट्रोच्या कारशेडसाठी झाडांची कत्तल केली गेली. त्याच्यामध्ये कुठे पर्यावरणाला दिसले नाही. तसेच आता डोंगरी येथे कारशेडसाठी चौदाशे झाडांची कत्तल केली जाणार ही पर्यावरणाची तज्ञांची समिती होऊ देणार आहे का ? तसेच राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेबद्दल ,महिलांच्या सुरक्षेबद्दल राज्यपाल महोदयांच्या अभिवाचनात काही आढळले नाही .

सरकारची झाली रे दैना

मंत्रीमंडळात स्थान न मिळाल्याने नाराज असलेल्या छगन भुजबळ यांनी 'जहा नही चायना वाह नही रहना 'असे म्हटले होते.त्याबाबत बोलताना ठाकरे म्हणाले की, सरकारची झाली आहे दैना,अशी अवस्था झाली आहे छगन भुजबळ हे माझ्याशी अधून मधून संपर्कात असतात असेही त्यांनी सांगितले.

# सोलापूरकरांना पुरेसे पाणी कधी मिळणार? : आ.देवेंद्र कोठे


तभा वृत्तसेवा

मुंबई,दि.१७ डिसेंबर: सोलापूर शहराला उजनी ते सोलापूर असे दुहेरी पाईपलाईनचा काम अनेक वर्षापासून संथगतीने सुरू आहे.त्यामुळे नागरिकांना आठवड्यातून एक वेळ पिण्याचे पाणी मिळत आहे त्यांना पुरेसे पाणी कधी मिळणार यासाठी त्वरित कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी सोलापूरचे भाजपाचे आमदार देवेंद्र कोठे यांनी आज विधानसभेत औचित्याच्या मुद्द्याच्या आधारे केले.

ते म्हणाले ,' उजनी धरण सोलापूर जिल्ह्यात असून सुद्धा सोलापूर शहराला आठवड्यातून एकदा पाणीपुरवठा होत आहे. यासाठी महापालिका प्रशासन कुठेतरी कमी पडताना दिसत आहे.११० किलोमीटर पैकी १०६ किलोमीटरचा काम पूर्ण झालेले आहे .केवळ ४ किमी काम प्रलंबित असताना देखील हे काम पूर्णत्वास होत नाहीये. त्याचबरोबर महापालिका प्रशासनाच्यावतीने शहराला आज आठवड्यातनं एकदा पाणी दिलं जाते. मागील अनेक वर्षांपासून दुहेरी पाईपलाईन पूर्ण झाल्यानंतर पाणी होईल , असे महापालिका प्रशासन सांगत असून त्या जलसिद्धीकरणाची केंद्राची जागा राष्ट्रीय महामार्गकडे आहे. त्यामुळे सरकारने प्रशासनाला सूचना देऊन सोलापूर शहराला त्वरित होण्यासाठी सूचना कराव्यात,

उमरखेड विधानसभा मतदारसंघातील आमदार किसन वानखेडे यांनी उमरखेडला व्यवस्थित पाणी सोडण्याचे नियोजन व्हावे , नदीपात्रात पशुसाठी आणि शेतकऱ्यांसाठी पाणी असावे, अशी मागणी केली

# उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन दिल्या शुभेच्छा!



तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई दि.१७ डिसेंबर: विधानसभा निवडणूकपुर्व व निवडणूक निकालानंतर एकमेकावर केलेल्या टीकेमुळे चर्चेचा विषय बनलेले हा विकास आघाडीचे नेते व माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उद्धव ठाकरे यांनी मंगळवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. नागपूरात हिवाळी अधिवेशनात ठाकरेंनी आज हजेरी लावली होती . दुपारी त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या दालनात जाऊन त्यांचे अभिनंदन केले. २०१९ च्या विधानसभा निवडणूक निकालानंतर भाजपा व शिवसेना युती तुटल्यापासून उद्धव ठाकरे व फडणवीस यांच्यात वितुष्ट निर्माण झाले. त्यामुळे तेव्हापासून एकमेकांवर टीका करण्याची ते एकही संधी सोडत नाहीत. निवडणूक काळात एकमेकांवर कडाडून टीका व आरोप प्रत्यारोप करण्यात आले होते. ५ डिसेंबरला आझाद मैदानावर झालेल्या शपथविधीसाठी फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांना फोन करून निमंत्रण दिले होते .मात्र ते गैरहजर राहिले . हिवाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी उद्धव ठाकरे नागपूरला आले. त्यांनी परिषदेतील सहभाग सभा परिषदेतील सभागृहाच्या कामकाजात भाग घेतला त्यानंतर पत्रकार परिषद घेतले त्यांनी मुख्यमंत्री यांच्या दालनात जाऊन त्यांचे अभिनंदन केले. यावेळी युवासेनाप्रमुख, शिवसेना नेते, आ. आदित्य ठाकरे, विधानपरिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, शिवसेना नेते, आ. अनिल परब, आ. भास्कर जाधव, आ. सचिन अहिर, आ. संजय पोतनीस, आ. वरुण सरदेसाई उपस्थित होते.

# ऑस्ट्रेलियाच्या पूर्वेकडील वानुआतु या बेटावर मंगळवारी ७.३ रिश्टर स्केलचा विनाशकारी भूकंप

वानुआतु : ऑस्ट्रेलियाच्या पूर्वे कडील वानुआतु या बेटावर मंगळवारी ७.३ रिश्टर स्केलचा विनाशकारी भूकंप झाला, ज्यामुळे राजधानी पोर्ट विलामध्ये मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे. यूएस भूगर्भीय सर्वेक्षणानुसार, स्थानिक वेळेनुसार दुपारी १२:४७ वाजता मुख्य बेट एफेटच्या किनाऱ्यापासून अंदाजे ३० किमी अंतरावर, ५७ किमी खोलीवर भूकंपाचा धक्का बसला. भूकंपाचे क्षण दाखवणारे अनेक व्हिडिओ आता सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर व्हायरल होत आहेत.

एक्सवर व्हायरल झालेल्या एका व्हिडीओत सीसीटीव्ही फुटेज दिसत आहे. यामध्ये भूकंप आल्यानंतर जंकयार्ड हादरताना दित आहे. यादरम्यान कॅमेऱ्यात एक कुत्रा पळताना दिसत आहे. तर दुसरीकडे एक माणूस जीव वाचवण्यासाठी बाहेर पळताना दिसत आहे. दुसऱ्या व्हिडिओमध्ये भूकंप किती विनाशकारी होता हे दिसत आहे. ज्यामध्ये यूएस, यूके आणि फ्रेंच दूतावासाच्या इमारतींचे लक्षणीय नुकसान झालं आहे.

एका फोटोत रस्त्याच्या मधोमध मुळापासून उखडून पडलेली झाडं दिसत आहेत. अमेरिकन दूतावासाच्या पहिल्या मजल्याचे नुकसान झालं आहे. फुटेजमध्ये कोसळलेला दूतावासा दिसत आहे. या दुतावासात लोक अडकल्याचं सांगितलं जात आहे.

दुपारच्या मोठ्या भूकंपानंतर पोर्ट विला येथील उ-ठए इंटरनॅशनलच्या कार्यालयाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचं इतर व्हिडीओत दिसून आलं. शहरातील बऱ्याच मोठ्या इमारती कोसळल्या आहेत, ज्यामुळे मोठ्या प्रमाणावर वीजपुरवठा खंडित झाला आहे. पाणीपुरवठा खंडित झाल्यामुळे राजधानीचा बहुतांश भाग प्रभावित झाला आहे.

# महाराष्ट्राला जोडणारा भारतातील पहिला इलेक्ट्रिक हाईवे

मुंबई : भारताच्या कानाकोपऱ्यात महामार्गांचे जाळे तयार केले जात आहे. देशात अनेक महामार्गांचे काम प्रगतीपथावर आहे. भारतात इलेक्ट्रिक हाईवे उभारला जात आहे. महाराष्ट्रातून स्टार्ट होणाऱ्या देशातील सर्वात मोठ्या महामार्ग असलेल्या दिल्ली-मुंबई एक्सप्रेसवेवरच भारतातील हा पहिला इलेक्ट्रिक हाईवे तयार केला जाणार आहे. या इलेक्ट्रिक हायवेमुळे पेट्रोल डिझेलची कटकट संपणार असून सर्व वाहने वीजेवर धावणार आहेत. तसेच धावता धावता ही वाहने चार्ज होणार आहेत.

१३५० किमी लांबीच्या दिल्ली-मुंबई द्रुतगती मार्गाचा काही भाग इलेक्ट्रिक एक्सप्रेस वेच्या धर्तीवर विकसित केला जाणार आहे. ६ राज्यांना जोडणाऱ्या या महामार्गामुळे वेळेची बचत होणार असून प्रवास देखील सुपरफास्ट होणार आहे. भविष्यात महामार्गावरुन प्रवास करणाऱ्यांची पेट्रोल, डिझेलच्या कटकटीतून सुटका होणार आहे. इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढत आहे. यामुळे भविष्यात दिल्ली-मुंबई द्रुतगती मार्गावर इलेक्ट्रिक वाहनांसाठी खास मार्गिका तयार केली जात आहे. या महामार्गावरुन ट्रॉलीबस, ट्रक इत्यादी वाहने धावतील. या महामार्गावर वाहने धावता धावताच चार्ज होणार आहेत. म्हणजेच या महामार्गावर ट्रेनप्रमाणे विजेवर वाहने धावणार आहेत.




सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# इन्नरव्हील होरायझनतर्फे पिंपरखेड ग्रामपंचायतला आरोग्य किट प्रदान

## ग्रामीण भागात आरोग्याच्या बाबतीत सकारात्मक बदल घडवण्याचा प्रयत्न -ॲड.अश्विनी धन्नावत

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

इन्नरव्हील होरायझन, इन्नरव्हील क्लब ऑफ जालना आणि इन्नरव्हील क्लब ऑफ जालना सेंट्रल यांच्या संयुक्त विद्यमाने घनसावंगी तालुक्यातील पिंपरखेड ग्रामपंचायतला आरोग्य किट प्रदान करण्यात आली. या किटमध्ये हॉस्पिटल बेड, व्हीलचेअर, वॉकर, आणि टॉयलेट चेअर या अत्यावश्यक साधनांचा समावेश आहे. या किटमुळे आजारी आणि गरजू रुग्णांसाठी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून मोफत आरोग्य सुविधा उपलब्ध होणार आहे.

जालना जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने १५ डिसेंबर रोजी घनसांगी आयोजित विधी सेवा महाशिबीर, शासकीय सेवा व योजनांचा महामेळावा आयोजित करण्यात आला होता. त्याप्रसंगी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती व जालना जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती संदीपकुमार मोरे, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश वर्षा मोहिते, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण



पांचाळ, अतिरिक्त पोलिस अधीक्षक आयुष नोपाणी, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव श्रीमती प्रणिता भारसाकडे, जिल्हा सरकारी अभियोक्ता ड. बाबासाहेब इंगळे, ड. विकास पिसुरे, फोटो संघाचे घनसावंगी तालुका ड. दीपक शिवतारे यांच्याहस्ते इन्नरव्हील क्लब ऑफ जालना होराझनच्या अध्यक्ष ड. अश्विनी धन्नावत, इन्नरव्हील क्लबच्या अध्यक्ष मधूलता भक्कड, इन्नरव्हील क्लब ऑफ जालना सेंट्रलच्या अध्यक्ष शिल्पा कावना यांनी आरोग्य किट पिंपरखेड ग्रामपंचायतकडे सुपूर्द केली. यावेळी होराझनतर्फे ग्रामीण महिलांसाठी लावण्यात आलेल्या स्टॉलवरून २०० मेनस्ट्रोल कप मोफत वाटप करण्यात येऊन मासिक पाळीत ते कसे वापरायचे, पर्यावरण संरक्षणासाठी आणि आरोग्याच्यादृष्टीने ते किती हितकारक आहे, याबाबत प्रबोधन करण्यात आले. यावेळी ड. अश्विनी धन्नावत यांनी आरोग्य किट देण्यामागील उद्देश स्पष्ट केला. त्या म्हणाल्या, अनेक कुटुंबे अशी आहेत ज्यांना आजारपणात हॉस्पिटल बेड, व्हीलचेअर, वॉकर यासारखी साधने खरेदी करणे परवडत नाहीत. अशा गरजू व्यक्तींना ग्रामपंचायतीच्या माध्यमातून मोफत ही साधने उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. ग्रामीण भागात आरोग्याच्या बाबतीत सकारात्मक बदल घडवण्याचा, ग्रामस्थांचे जीवन सुसह्य करण्याचा आमचा प्रयत्न आहे. ग्रामीण भागातील आरोग्याच्या गरजा लक्षात घेऊन ही किट प्रदान करण्यात आली असून, आजारी व्यक्तींचे जीवन सुसह्य होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला

## संक्षिप्त

### अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू; मंठा पोलिसात गुन्हा दाखल



**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

मंठा-जालना या महामार्गावर अपघाताचे सत्र थांबता थांबेना. या मार्गावर (ता.१६)सोमवार रोजी सायंकाळी पुन्हा टिप्पर व दुचाकीचा अपघात झाला. गोविंद गंगा पेट्रोल पंपासमोर झालेल्या या अपघातामध्ये दुचाकी स्वाराचा जागीच मृत्यू झाला.यात मंठा शहरातील हारून इब्राहिम कुरेशी असे मयताचे नाव आहे. या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

याप्रकरणी पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार , सोमवार रोजी सायंकाळी अज्ञात टिप्पर चालकाने निष्काळजीपणाने व भरदाव वेगाने आपल्या ताब्यातील वाहन चालवून मोटरसायकलला जोराची ठोस देऊन गंभीर जखमी करून त्यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी मंठा पोलीस ठाण्यात अज्ञात टिप्पर चालका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी अधिक तपास पोलीस निरीक्षक रवींद्र निकाळजे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक माळगे करत असल्याची माहिती सुत्रांकडून प्राप्त झाली आहे.

### अनुश्री भगत हिचे यश



**तभा वृत्तसेवा**
**बदनापूर/प्रतिनिधी**

तालुक्यातील माळीवाडा येथील अनुश्री सुनील भगत हिने भारतातील प्रतिष्ठेची मानली जाणारी होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेत यश मिळवले, त्याबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. कै. दादासाहेब चव्हाण पाटील इंग्लिश स्कूल आसेगाव या शाळेत इयत्ता नववी वर्गात शिकणार्या अनुश्री सुनील भगत हिने भारतात नावाजलेली होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेत सहभाग घेतला. या स्पर्धेत मुंबई शिक्षक संघटनेतर्फे सदरील स्पर्धा घेण्यात येतात. या स्पर्धेतून विज्ञान विषयातील गुणवत्ता तपासण्यात येते. या स्पर्धेत माळीवाडा सारख्या ग्रामीण भागात असलेल्या अनुश्री भगत हिने सहभाग नोंदवत घवघवीत यश मिळवले. राष्ट्रीय पातळीवरील या स्पर्धेत यशस्वी झाल्याबद्दल तिचे शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचार्यासह अमृत तारो, चंद्रकांत भगत, अनिल भगत, अमोल तुपे, गणेश जाधव आदीनी अभिनंदन केले.

### ऑल इंडिया रिले स्केटींग स्पर्धेत जालन्याचे खेळांडूचे यश

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

ऑल इंडिया रिले स्केटिंगस्पर्धा मध्ये जालन्याचे खेळाडूंची यश क्रीडा सप्ताह निमित्त ऑल इंडिया रोलर रिले स्केटिंगस्पर्धा विभागीय क्रीडा संकुलन संभाजीनगर औरंगाबाद येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धांमध्ये विविध राज्यातून ३५० खेळणी सहभाग नोंदविला या स्पर्धांमध्ये जालनाचे खेळांडूमध्ये अद्वैत विष्णू पेंढारे- स्वर्ण पदक पटकावले, जयवर्धन नितीन राठौड़-स्वर्ण पदक पटकावले, शेख अरिश अहेमद- स्वर्ण पदक पटकावले, एहसास जगदीश अग्रवाल-स्वर्ण पदक पटकावले, जर्मिया मनोज कसबे- स्वर्ण पदक पटकावले, शेख अरशान अहेमद -कांस्य पदक पटकावले, स्वस्ति राहुल पांडे-कास्य पदक चौथे स्थानावर, इब्राहीम इमरान सिद्दीकी - कास्य पदक चौथे स्थानावर पदक पटकावले.

सर्व खेळाडूंचा जालना स्केटिंग असोसिएशन तर्फे सत्कार करण्यात आले. असोसिएशनचे अध्यक्ष ड. अमजद पठाण, असोसिएशनचे अरविंद देशमुख, प्रवीण पाचफुले, क्रीडा शिक्षक किरण पाटील मॅडम, सय्यद शब्बीर, प्रशिक्षक फहीम खान यांनी शुभेच्छा दिल्या. या सर्व खेळाडूंना प्रशिक्षक सय्यद निसार यांचे मार्गदर्शन लाभले.

# वालसावंगी परिसरात ढगाळ वातावरणामुळे रब्बी हंगामातील गहू, हरभरा, तुर पिकांना फटका





## शेतकऱ्याचा औषध फवारणीवर भर

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील पारध वार्ताहर वालसावंगी व परिसरात दोन-तीन दिवसांपासून ढगाळ वातावरण पसरले आहे. ढगाळ वातावरणामुळे रब्बी हंगामातील हरभरा, तूर पिकावर अळीचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून शेतकरी विविध प्रकारच्या महागड्या औषधींची फवारणी करू लागले आहेत. मात्र ढगाळ वातावरण आणि अधिक दिवस राहिल्यास हरभरा आणि तूर पिकांमध्ये उत्पादन घट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

गेल्या आठवड्यात थंडीने कहर केला होता परिणामी शेतकऱ्यातून समाधान व्यक्त केले जात होते सध्या रब्बी हंगामातील हरभरा तूर आदी पिके मोठ्या प्रमाणात बहरली आहे. दोन दिवसापासून बदल होऊन सर्वत्र ढगाळ छाया पसरली असून कधी हंगामातील पिके धोक्यात आली आहेत. या ढगाळ वातावरणामुळे गहू तूर पिकर अळीचा हल्ला वाढल्याचे मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. त्यामुळे अळी पडलेल्या या रोगामुळे उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट होऊ नये म्हणून शेतकरी औषधी फवारणी करण्यास भर दिला जात आहे त्यामुळे शेतकऱ्याच्या आर्थिक गणित कोलमडणार असून उत्पादनाती आल्यानंतर हमीभाव मिळेल की नाही याची चिंता शेतकऱ्यांतून शेतकऱ्यांना होत आहे त्यातच सप्टेंबर- ऑक्टोंबर पडलेल्या अवकाळी पावसामुळे खरीप हंगामातील सोयाबीन मका पिकांना मोठ्या प्रमाणात फटका बसला त्यामुळे शेतकऱ्याच्या हातात तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला तसेच सोयाबीनच्या पिकांना गंजी मध्येच पाणी गेल्याने कोंब फुटले त्यामुळे सोयाबीन डागी निघाल्याने शेतकऱ्यांना बे भाव सोयाबीन पिकाची विक्री करावी लागली. मात्र आता बहरलेल्या तूर, गहू,मका हरभरा पिकांना मोठ्या प्रमाणात फटका बसण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. याकडे कृषी विभागाने लक्ष घालून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे अशी मागणी शेतकरी होत आहे.

# मुख्यमंत्री वयोश्री योजनेच्या लाभार्थ्यांना आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

राज्यातील ६५ वर्षे व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी व वयोमानापरत्वे येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य साधने, उपकरणे खरेदीसाठी मुख्यमंत्री वयोश्री योजना सुरु करण्यात आली आहे. जालना जिल्ह्यात मुख्यमंत्री वयोश्री योजनेतंर्गत ५ हजार ११३ पात्र लाभार्थींना शासनाकडून प्रत्येकी ३ हजार रुपये आधार संलग्न बँक खात्यात रक्कम जमा केली आहे. तरी अशा लाभार्थ्यांनी शासन निर्णयातील नियमानुसार साहित्य, उपकरणे खरेदी करुन त्याचे देयक (पावती) सहायक आयुक्त समाजकल्याण जालना यांच्या कार्यालयात जमा करावेत, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# अल्पसंख्याक हक्क दिनाचे आयोजन


**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

अल्पसंख्याक हक्क दिवस म्हणुन १८ डिसेंबर २०२४ हा दिवस साजरा करण्यात येणार आहे. अल्पसंख्याक नागरिकांना त्यांच्या घटनात्मक आणि कायदेशिर हक्काची जाणीव, माहिती देण्यासाठी बुधवार दि.१८ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला. तरी नागरिकांनी अल्पसंख्याक हक्क दिन कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# शहरातील नागरिकांची पाणीपट्टी माफ करा; आम आदमी पार्टीची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

नगरपरिषदेने कोरोना काळात तसेच पाणी टंचाईच्या काळात नियमित पाणीपुरवठाच केलेला नाही त्यामुळे सन २०२० ते २०२५ या काळातील पाणीपट्टी नागरिकांना माफ करण्यात यावी याबाबत भोकरदन शहरातील नागरिकांच्या वतीने आम आदमी पार्टीने नगरपरिषदेचे प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देवुन पाणीपट्टी माफ करण्याबाबत मागणी केलेली आहे. यावेळी आम आदमी पार्टीचे शहराध्यक्ष महेजाद खान उपाध्यक्ष फिरोज भाई, जमील भाई, भीम आर्मीचे अनिल पगारे सर,पंडीत बीरसोने,मुद्दसर शेख,तालीब शेख, लिलाबाई टेकाळे तसेच आम आदमी पार्टीचे कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने हजर होते. असे



प्रसिध्दिसाठी दिलेल्या पत्रकात बोरशे गुरुजींनी कळवीलेले आहे.शासनाकडे केलेल्या निवेदनात पुढे म्हटले आहे की २०२० पासून कोरोना काळामध्ये नागरिकांना कोणत्याही प्रकारचे उत्पन्न नव्हते जनता घरात बसून होती लॉकडाऊन असल्यामुळे पाणीपट्टी तसेच नगर परिषदेचे इतर कर भरता आले नाहीत. तसेच लॉक डाऊन नंतर नगरपरिषदेने पाणीटंचाई असल्यामुळे पाणीपुरवठा केलेलाच नाही क्वचितच दोन महिन्यातून एखाद्या वेळेस पाणी नळाला सोडलेले आहे त्यामुळे पाणीपट्टी ची मागणी नागरिकांना करणे हे न्याय संगत वाटत नाही त्यामुळे संबंधित २०२० ते २०२५ या काळातील पाणीपट्टी नागरिकांना माफ करण्यात यावी असे प्रकारे निवेदनाद्वारे मागणी करण्यात आलेली आहे निवेदनाच्या प्रति माननीय जिल्हाधिकारी जालना माननीय विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांना पाठवण्यात आलेल्या आहेत.

# नातेवाईकांनी मारहाण केल्याने सुंदर नगर येथे एकाचा मृत्यू

## नातेवाईकांनी चंदनझीरा पोलीस ठाण्यात मृतदेह आणून ठेवला

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना शहरातील सुंदर नगर येथे किरायाने राहत असलेल्या एका तरुणास मागील कौटुंबिक कारणावरून जबर मारहाण केल्याने फारूक निजाम शेख या तरुणाच्या मृत्यू झाला. मयत तरुण हा बदनापुर तालूक्यातील देवगाव येथील राहीवाशी असून सध्या सुंदर नगर येथे किरायाची खोली करून राहत होता.



सदरील घटना रात्री च्या सुमाराची असून मयताच्या गळ्याला दोरीच्या फासाचे वण असल्याचे नातेवाईकांचे म्हणणे आहे. आज दिनांक १७ मंगळवार रोजी सकाळी अकरा वा. दरम्यान मृतदेह शव विच्छेदनासाठी शहरातील शासकीय सामान्य रुग्णालयामध्ये पाठवण्यात आला असून शवविच्छेदना नंतर नातेवाईकांनी थेट चंदनझीरा पोलीस ठाणे गाठून मृतदेह चंदनझीरा पोलीस ठाण्यात आणून ठेवला. जोपर्यंत मारेकऱ्यांना अटक होऊन खुनाचा गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत मृतदेह हलवणार नसल्याची भूमिका नातेवाईकांनी घेतली. या घटनेने परिसरामध्ये एकच कळबळ उडाली आहे.

# छगन भुजबळ यांना मंत्रिमंडळात स्थान नकारल्याने अंबड शहरांमध्ये ओबीसी समाजाचे तीव्र आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

अंबड दि १७ डिसेंबर ओबीसी नेते तथा महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगनरावजी भुजबळ साहेब यांना नुकत्याच पार पडलेल्या महायुती सरकारच्या मंत्रिमंडळ विस्तारामध्ये मंत्रिपद देण्यात आले नाही त्यामुळे संपूर्ण ओबीसी समाजामध्ये अतिशय तीव्र अशी नाराजीची भावना आहे याचाच एक भाग म्हणून आज अंबड शहरांमध्ये सकल ओबीसी समाजात कडून महायुती सरकारचा व राज्याचे




उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांच्या विरोधात धरणे आंदोलन करत जाहीर निषेध करण्यात आला यावेळी अंबड शहर व परिसरातील ओबीसी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते संतप्त ओबीसी बांधवांनी यावेळी अजित पवार यांच्या प्रतिमेला जोडे मारो आंदोलन देखील केले आणि महायुती शासनाची तसेच नवनियुक्त मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्या विरोधात तीव्र अशी घोषणाबाजी केली यावेळी रवींद्र खरात, नंदू पुंड, रामशेठ लांडे, संदीप दादा खरात, दिनेश गाजरे, डॉक्टर अभय जाधव, शिवा गाजरे ,दिलीप राठोड, किशोर मुर्तडकर, गोरख हिरे, संतोष राऊत, परमेश्वर राऊत, योगेश राऊत, ईश्वर पिराने, बाबासाहेब बटुळे , बाळू गावडे, बाळासाहेब दखणे, परमेश्वर भागवत , किरण रहाटगावकर, प्रदीप जीवने ,कैलास गादे आदी ओबीसी बांधव उपस्थित होते

अहिल्यानगर शहरासह जिल्ह्यातील अवैध कत्तलखाने त्वरित भुईसपाट करा - बजरंग दल

# अहिल्यानगर जिल्हा हा गोहत्या मुक्त करण्यासाठी सहकार्य राहील : आ.संग्राम जगताप



अहिल्यानगर : महाराष्ट्र राज्य सरकारने गोमातेला राज्यमाता घोषित केले असून गोवंश हत्या बंदी कायदा असताना देखील काही समाजकंटक त्या कायद्याची पायमल्ली करत आहे, गेल्या आठवड्यात गुन्हे अन्वेषण पथकाकडून अहिल्यानगर जिल्ह्यातील झेंडीगेट, ममतापूर, श्रीरामपूर आदींसह विविध ठिकाणच्या अवैध कत्तलखान्यावर छापा टाकून हजारो गोवंश वाचवण्यात आले असून ५० हजार किलो गोमास जप्त करण्यात आले आहे, आम्ही वेळोवेळी निवेदन देऊन देखील अवैध कत्तलखाने नष्ट करण्याची कोणतीच कारवाई झालेली नाही, तरी तातडीने कत्तलखाने भुईसपाट करावी, हिंदू समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्यामुळे हिंदू समाज प्रचंड क्रोधीत झाला आहे तरी कायदा सुव्यवस्थेचा मोठा प्रश्न निर्माण होऊ शकतो ,निवेदनासोबत पुरावे देखील सादर करत असून पुढील कारवाई तातडीने करावी अशी मागणी बजरंग दलाच्या वतीने गोरक्षक प्रमुख पश्चिम महाराष्ट्र प्रांत ऋषिकेश भागवत यांनी जिल्हा पोलीस प्रमुख राकेश ओला यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे यावेळी आमदार संग्राम जगताप, माजी नगरसेवक विपुल शेटिया यांच्यासह गोरक्षक बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान पोलीस प्रशासन व आ. संग्राम जगताप यांच्या सहकार्यातून गेल्या आठवड्यात गुन्हे अन्वेषण पथकाकडून अवैध कत्तलखान्यावर छापा टाकून हजारो गोवंश वाचवल्याबद्दल बजरंग दलाच्या वतीने यावेळी पोलीस अधीक्षक राकेश ओला, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर आणि आ.संग्राम जगताप आदींचा गो मातेची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला

# एमजीएम रेडिओ ज्येष्ठ नागरिकांपर्यंत पोहचविणार अटल वयो अभ्युदय योजना



छत्रपती संभाजीनगर, दि.१७ : छत्रपती संभाजीनगर शहरातील गीता भवन,एन ५,सिडको परिसरातील 'प्रागतिशील ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्था या ठिकाणी ४०-४५ वयोवृद्ध नागरिकांच्या उपस्थितीत अटल वयो अभ्युदय योजनेबद्दल कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून समाजकल्याण सह आयुक्त प्रदीप भोगले हे उपस्थित होते. त्यांनी शासनाच्या ज्येष्ठ नागरिकांसाठी असणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. त्याचप्रमाणे आपल्याकडे असलेली माहिती गरजूपर्यंत पोहचवली तर त्याचा खऱ्याअर्थाने उपयोग आहे, असे सांगितले. जास्तीत जास्त ज्येष्ठ नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी, ज्येष्ठ नागरिक मंडळाचे अध्यक्ष श्रीकांत पत्की यांचेसह ज्येष्ठ नागरिक मंडळाचे सदस्य उपस्थित होते. सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालय (भारत सरकार ) व सामुदायिक रेडिओ संघटना,नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने 'ध्यास अध्ययचा, सन्मान ज्येष्ठांचा' या अभियानांतर्गत अटल वयो अभ्युदय योजने बद्दल जिल्हाभरात जनजागृती करण्यात येणार आहे. सामुदायिक रेडियो संघटना, एमजीएम ९०.८ एफ.एम.च्या माध्यमातून पुढील ४ महिने ही जनजागृती करण्यात येणार असून अटल वयो अभ्युदय योजने सोबतच जेष्ठ नागरिकांसाठी असलेल्या विविध योजनांची माहिती देण्यात येणार असल्याचे एमजीएम रेडिओ ९०.८ एफएमचे केंद्र प्रमुख सुनील शिरसिकर यांनी सांगितले. एमजीएम वृत्त पत्र विद्या आणि जनसंवाद महाविद्यालय यांच्या संकल्पनेतून साकार झालेले रेडिओ ९०.८ एफएम जिल्ह्यातील नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याने अशा कार्यक्रमाचे आयोजन वेळोवेळी केले जाते. यावेळी वयोवृद्ध नागरिकांच्या समस्या टोल फ्री नंबर १४५६७ या क्रमांकावर संपर्क केल्यानंतर तत्काळ सोडवण्यात येतील तसेच बोलण्यासाठी, संवाद साधण्यासाठी संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी आरजे मनीषा आणि ज्येष्ठ नागरिक मंडळाचे सदस्य यांनी परिश्रम घेतले.

## सोयगाव शहरासह तालुक्यात हुडहुडी वाढली;-ऊबदार कपडे खरेदी करण्यावर भर

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.१७ डिसेंबर



सोयगावसह तालुक्यात गेल्या तीन-चार दिवसांपासून अचानक थंडीत वाढ झाली आहे रविवार,सोमवार थंडीचा कडाका सायंकाळी पाच वाजेपासून सुरू होता त्यामुळे शहरात सायंकाळी कमालीची शांतता पसरली होती ग्रामीण भागात शेकोट्या पेटू लागल्या होत्या त्यामुळे शेकोट्या सुरू झाल्याने जुन्या काळासारखी चावडी सुरू झाल्या चे चित्र शहरासह ग्रामीण भागात दिसून येत आहे.दरम्यान तालुक्यातील ग्रामीण भागातही थंडीची वाढ झाली आहे त्यामुळे नागरिक उबदार कपडे खरेदी करण्यावर भर देत आहे.

सोयगाव सह ग्रामीण भागात वाढलेली थंडी रब्बीच्या पिकांना फायदेशीर ठरली आहे रब्बीच्या गहू,हरभरा,मका आदि पिकांना वाढी साठी थंडीची गरज आहे.त्यामुळे सोयगाव शहरासह तालुक्यात पिकांना पुरेशी थंडी मिळत आहे मात्र नागरिकांचा शुकशुकाट पहावयास मिळत आहे.सोयगाव सह ग्रामीण भागात शेकोट्याचे प्रमाण वाढलेले आहे.

## ५० गोल्डन रूल्स ऑफ लाइफ पुस्तकाचे प्रकाशन

पुणे : सुप्रसिद्ध लेखक आणि लाइफ कोच संतोष जोशी यांच्या ५० गोल्डन रूल्स ऑफ लाइफ या पुस्तकाचे पुणे येथील फर्ग्युसन कॉलेज मध्ये एनबीटी द्वारे आयोजित बुक फेअरमध्ये दिमाखदार प्रकाशन करण्यात आले. संध्याकाळी ६ ते ७ या वेळेत झालेल्या या कार्यक्रमात पुस्तकप्रेमी आणि मान्यवरांची मोठी उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध कवि, कथा लेखक, चित्रपट निर्माते आणि दिग्दर्शक रामदास फूटाने यांची उपस्थिती होती. आपल्या भाषणातून त्यांनी या पुस्तकाचे महत्त्व अधोरेखित केले आणि सांगितले की, हे पुस्तक वाचकांना जीवनांना सकारात्मक दृष्टिकोन आणि प्रेरणा देणारे असेल. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोनिका बन्सल यांनी प्रभावीपणे केले.

# मेडिकव्हर हॉस्पिटल्सने आज मेडिकव्हर्ड फॅमिली कार्ड चे उद्घाटन छत्रपती संभाजीनगर शाखेत केले

## मेडिकव्हर्ड फॅमिली हेल्थ कार्ड: एक कार्ड फायदे अनेक



छत्रपती संभाजीनगर : भारतातील आघाडीची आरोग्यसेवा पुरवठादार असलेल्या मेडिकव्हर हॉस्पिटल्सने आज मेडिकव्हर्ड फॅमिली कार्ड चे उद्घाटन आपल्या छत्रपती संभाजीनगर शाखेत केले. या उपक्रमाचे उद्घाटन श्री. नवनीत काँवत , पुलिस उपायुक्त, सिटी जोन २ ,श्री. डॉ. विनय कुमार राठौड़ पुलिस अधीक्षक, श्री. सुनील लांजेवार,अतिरिक्त पुलिस अधीक्षक यांच्या हस्ते झाले, तर श्री. युवराज खेडकर, भगवान शिक्षा प्रसारक मंडल यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमात बोलताना, श्री. नवनीत काँवत, पुलिस उपायुक्त, यांनी सांगितले, आरोग्यसेवा ही प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्क आहे, आणि मेडिकव्हर्ड फॅमिली कार्डसारख्या उपक्रमांमुळे दर्जेदार आरोग्यसेवा सामान्य नागरिकांच्या अधिक जवळ जाते. हे कार्ड अधिक निरोगी समाज निर्माण करण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे, जिथे कुटुंबांना परवडणाऱ्या खर्चात आरोग्यसेवा सहज उपलब्ध होईल.

डॉ. दीपेन शाह , यांनी या कार्डाचे महत्त्व स्पष्ट करताना सांगितले, मेडिकव्हर हॉस्पिटल मध्ये आमचे प्राधान्य नेहमीच रुग्णांना योग्य सेवा व आधार देणे आहे. मेडिकव्हर्ड फॅमिली कार्ड हे आमच्या रुग्णांशी असलेल्या नात्याला अधिक दृढ करण्याचे माध्यम असून, प्रगत, अत्याधुनिक परवडणारी आणि स्नेहपूर्ण आरोग्यसेवा प्रत्येक कुटुंबाला उपलब्ध करून देण्याचा आमचा मानस आहे.

हे फॅमिली कार्ड केवळ सवलतींसाठी नाही तर तुमच्या कुटुंबाच्या आरोग्यसेवेसाठीचे वचन आहे. आम्ही दर्जेदार आरोग्यसेवा नेहमीच उपलब्ध असल्याचे सुनिश्चित करत आहोत मग तुम्ही भारतात कुठेही असाल.भारतातील सर्व २३ मेडिकव्हर हॉस्पिटल्स मध्ये हे कार्ड उपलब्ध आहे हे कार्ड अनेक फायदे देते, जसे की:

ओपी कन्सल्टेशनवर ३०% सवलत, ओपीडी तपासण्यांवर १५% सवलत, कॅश डमिशनसाठी आयपी आणि डे-केअर सेवांवर १०% सवलत (फार्मसी आणि कंझ्युमेबल्स वगळता), विमा व कॉर्पोरेट डमिशनसाठी नॉन-मेडिकल सेवांवर ५०% सवलत, शहराच्या १० कि.मी. च्या परिघात मोफत म्ब्युलन्स पिक-अप व ड्रॉप सेवा, होमकेअर सेवांवर ३०% सवलत (फार्मसी वगळता), ५००० पेक्षा जास्त बिलांसाठी फार्मसीवर २०% सवलत, हेल्थ चेकअप पॅकेजेसवर १०% सवलत.

## पंडीत दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना; प्राप्त अर्जाची त्रुटी पूर्तता करणेबाबत आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि.१७(जिमाका):- राज्यातील मान्यताप्राप्त शासकीय अनुदानित आणि कायम विना अनुदानित महाविद्यालय व तंत्रनिकेतनांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता वसतीगृह योजनेत विमुक्त जाती भटक्या जमाती क प्रवर्गातील विद्यार्थ्यांना निवासी व शैक्षणिक सुविधांपासून पंडीत दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना सुरु केली आहे. या योजनेअंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करण्यात आली आहे.

# जि.प. प्रा.शा. रामजीनगर येथे पालक विद्यार्थी क्रीडा स्पर्धा उत्साह संपन्न

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.१७ डिसेंबर



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर विकास मीना यांच्या संकल्पनेनुसार दि.१६ ते १९ २०२४ पर्यंत पालक विद्यार्थी यांच्या क्रीडा स्पर्धांच्या आयोजन करण्यात आलेले असून या स्पर्धांमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथे पालकांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग दिसून येत आहे.या स्पर्धांमध्ये पालक व विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले असून यामध्ये कबड्डी खो-खो धावणे क्रिकेट संगीत खुर्ची रस्सीखेच या खेळांच्या स्पर्धा आयोजित केलेले आहेत. दि.१७ मंगळवार रोजी सोयगाव तालुका गटशिक्षणाधिकारी रंगनाथ आढाव व केंद्रप्रमुख फिरोज तडवी यांनी पालक विद्यार्थी क्रीडा स्पर्धा जिल्हा परीषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथे भेट देऊन स्पर्धेत विजेत्या मातांचा फुल गुच्छ देऊन सत्कार केला स्पर्धा यशस्वी होण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील, सहशिक्षक गोपाल चौधरी,प्रशिक्षक शिक्षक शुभम देसले यांनी परिश्रम घेतले.पालक शिक्षक क्रीडा स्पर्धांना शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष उपाध्यक्ष सदस्य जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामजीनगर यांचे अनमोल सहकार्य लाभत आहे. त्याच बरोबर या स्पर्धा मध्ये अनेक वयस्कर मातानीही सहभाग घेतला.

# एकविस वर्षानंतर वर्ग मित्रांची भरवली पुन्हा शाळा



वाळूज महानगर (प्रतिनिधी): रांजणगाव पोळ येथील लोकनेते साहेबराव पाटील डोणगावकर माध्यमिक विद्यालयाचे २००३-२००४ बॅचमध्ये शिक्षण घेणाऱ्या वर्ग मित्रांनी रविवार १५ डिसेंबर रोजी शाळेच्या प्रांगणात पुन्हा एकत्र येत शाळा भरवली. रांजणगाव पोळ येथील विद्यालयात २००३-२००४ मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी एक दिवस शाळा भरवण्याचे ठरवले याकरिता सचिन बोडखे,अर्जुन कापसे,योगिता जाधव, अनिल शेलार आणि अरविंद राऊत या वर्ग मित्रांनी एक व्हाट्सअप ग्रुप बनवून सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींना एकत्र जमवले. रविवार १५ डिसेंबर रोजी वर्गमित्रांची शाळा भरण्याचा निर्णय घेत तो लगेचच अंमलातही आणला. यावेळी त्या काळाचे शिक्षक सेवानिवृत्त मुख्याध्यापक तुकाराम नेमाने यांच्या अध्यक्षतेखाली व स्वामी ज्ञानानंद गिरीजी महाराज, सेवानिवृत्त मुख्याध्यापक बाबुराव देशमुख, मुख्याध्यापक विलास जाधव, शालेय समितीचे अध्यक्ष शिवाजी बोडखे पाटील इंग्रजीचे शिक्षक एम एल कराड, बाबासाहेब बारगळ,केंद्रप्रमुख विठ्ठल नरोडे, अशोक शिंदे, रामेश्वर शेळके,तुकाराम शेलार यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवार १५ डिसेंबर रोजी शाळा भरविण्यात आली. नेहमीप्रमाणे शाळेची घंटा वाजून राष्ट्रगीत घेत हजेरी घेऊन वर्ग भरविण्यात आला. यावेळी सर्व वर्गमित्रांनी आपल्या कुटुंबासह हजेरी लावली.

एकमेकांची सुखदु:ख जाणून घेतले.विद्यार्थ्यांनी आपल्या संघर्षाचा काळ आपल्या गुरुजनासमोर मांडताना आपल्या शिकवणीतूनच आम्ही त्यावर कशी मात केली हे आवर्जून सांगितले. यावेळी गुरुजनांनी विद्यार्थ्यांना भरभरून आशीर्वाद देत यापुढेही आपण एकमेकांच्या संपर्कात राहावे व एकमेकांच्या सुखदु:खात साथ देण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयोजक सचिन बोडखे यांनी केले सूत्रसंचालन अनिल शेलार यांनी केले आभार शालेय समिती अध्यक्ष शिवाजी बोडखे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेच्या अर्जुन कापसे अरविंद राऊत अन्सार शेख यांच्या शाळेच्या सर्व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. शाळेचा समारोप भोजनाने करण्यात आला.

सोबत असलेल्या काही वर्ग मित्र तसेच काही शिक्षक हयात नसल्याने त्या सर्वांना सर्व विद्यार्थी व उपस्थित गुरुजनांनी दोन मिनिट जागेवर उभा राहून श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी संपूर्ण भावनिक वातावरण झाले होते.


IIFL FINANCE
CIN: L67100MH1995PLC093797
Regd. Office: IIFL House, Sun Infotech Park, Road No. 16V, Plot No.B-23, Thane Industrial Area, Wagle Estate, Thane - 400604
Tel: (91-22) 41035000 • Fax: (91-22) 25806654
E-mail: reach@iifl.com • Website: www.iifl.com

**सोन्याचा दागिन्यांचा लिलावाची सार्वजनिक सूचना**

येथे सगळ्या संबंधित ऋणकोंना विशेषत: आणि सर्व सामान्य नागरिकांना, सामान्यपणे असे सूचित करण्यात येते की, आम्ही आयआयएफएल फायनान्स लिमिटेड (''आयआयएफएल'') येथे थकबाकी असलेल्या कर्जदारांच्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करणार आहोत, यामध्ये वारंवार सूचना देऊन देखील कर्जाची रक्कम न भरलेल्या किंवा कर्ज खाते सामान्य करू न शकलेल्या ऋणकोंचा समावेश केला गेला आहे. खालील कर्ज खात्यांमध्ये तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा सार्वजनिक लिलाव **दिनांक २०.१२.२०२४** रोजी **सकाळी १०.००** वाजल्यापासून जिल्हा केंद्र **बीड- सुभाष रोड गोल्ड लोन - एच. क्रमांक 211290, प्रकाश हाइट्स, सुभाष रोड, बीड-431122,** येथे होणार आहे. स्थान किंवा तारखेतील कोणताही बदल (जर असल्यास) लिलाव केंद्राकडे प्रदर्शित केला जाईल. कोणत्याही कारणास्तव येथे उल्लेखित तारखेस लिलाव होऊ शकला नाही किंवा त्या दिवशी लिलाव पूर्ण होऊ शकला नाही, तर आयआयएफएलला त्याच अटी व शर्तींवर कोणत्याही पुढील तारखेस उक्त लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा हक्क आरक्षित आहे. ग्राहकाचा मृत्यू झाला, तर त्या लिलावाशी संबंधित सर्व अटीं नामनिर्देशित व्यक्ती/कायदेशीर वारसाला लागू होतील.

**गोल्ड लोन खाता क्रमांक :** GL31261723, GL31274519, GL32388290, GL32408104, GL32227726, GL32212797, GL32256465, GL30758322, GL32249464, GL30754582, GL30610034, GL31286055, GL32564046, GL32446733, GL32682498, GL32509037, GL32628339, GL32471024, GL31367740, GL31347882, GL30431847, GL30682831, GL30665848, GL32518360, GL32711621, GL24866197, GL32358000, GL32576269, GL32581960, GL32578526, GL30457709, GL30477896, GL32304626, GL32310136, GL29522084, GL29513028, GL30688101, GL30712926, GL31834440, GL31817549, GL25904478, GL30532437, GL30457882, GL30455747, GL32238854, GL32256067, GL22811733, GL30608975, GL31109373, GL31121166, GL32325735, GL31554888, GL31545847, GL27558284, GL30474468, GL32064490, GL31434597, GL31425234, GL30458878, GL30481516, GL31430005, GL31167000, GL31143548, GL31130897, GL32452327, GL32469219, GL29574894, GL30377473, GL30370461, GL30599286, GL30569086, GL28290873, GL32359799, GL32389703, GL23721372, GL27430271.

लिलाव हा ''जिथे आहे तसे'', ''जसे आहे तसे'' आणि ''जेवढे आहे तेवढे'' या तत्वावर केला जाईल आणि आयआयएफएल द्वारे कोणत्याही प्रकारे सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकनाचे प्रतिनिधीत्वं केले जाणार नाही. आयआयएफएल स्वत:हून, लिलाव पुढे ढकलू किंवा रद्द करू शकेल, लिलावाच्या यादी मधून एखाद्या खात्याचे नाव वगळण्याचा अधिकार देखील आयआयएफएल कडेच असेल आणि हे करताना त्याकरिताची पुर्व सूचना, करण्यामागची कारणे, एखाद्या बोलीचा स्वीकार किंवा रद्दीकरण केल्याची कारणे देण्याची कोणतीही आवश्यकता नसेल. थकबाकी असलेल्या ऋणकोंची यादी, त्यांनी जमा केलेले दागिने आणि इतर तपशील हा संबंधित शाखांमध्ये दिलेला असेल. अयशस्वी कर्जदारांकडे हा पर्याय आहे की त्यांनी अद्ययावत व्याज आणि सर्व लागू शुल्कांसह संपूर्ण थकबाकीची परतफेड करावी जेणेकरुन ही नोटीस प्रकाशित झाल्यानंतरही त्यांचे कर्ज खाते बंद करण्याचा किंवा नियमित करण्याचा पर्याय असतो परंतु कोणत्याही परिस्थितीत लिलावाच्या तारखेपर्यंतच हे शक्य आहे, यात ते अयशस्वी झाल्यास सोन्याचे दागिने विकले जातील आणि थकबाकी (असल्यास) व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल. ही सूचना छापून आल्यानंतर जर एखाद्या ऋणकोने आपल्या कर्जाचा व्यवहार पूर्ण केला किंवा आपली थकबाकी भरून कर्ज खाते बंद केले, तर त्याला या सूचनेच्या छपाईचा संपूर्ण खर्च मात्र उचलावा लागेल. ऋणकोंना आपल्या बँक खात्यांचा तपशील शाखेकडे जमा/अद्ययावत करण्याची विनंती केली जाते आहे जेणेकरून लिलाव प्रक्रियेमधून निघालेला परतावा असल्यास तो जमा करता येऊ शकेल.

**तपशीलवार माहिती, अटी आणि नियम जाणून घेण्याकरिता कृपया आयआयएफएल फायनान्स लिमिटेडच्या नजिकच्या शाखेशी संपर्क साधा.**

तारीख : १८.१२.२०२४
स्थळ: बीड
स्वाक्षरीकर्ता/-
अधिकृत स्वाक्षरीकर्ता
आयआयएफएल फायनान्स लिमिटेड



IIFL FINANCE
CIN: L67100MH1995PLC093797
Regd. Office: IIFL House, Sun Infotech Park, Road No. 16V, Plot No.B-23, Thane Industrial Area, Wagle Estate, Thane - 400604
Tel: (91-22) 41035000 • Fax: (91-22) 25806654
E-mail: reach@iifl.com • Website: www.iifl.com

**सोन्याचा दागिन्यांचा लिलावाची सार्वजनिक सूचना**

येथे सगळ्या संबंधित ऋणकोंना विशेषत: आणि सर्व सामान्य नागरिकांना, सामान्यपणे असे सूचित करण्यात येते की, आम्ही आयआयएफएल फायनान्स लिमिटेड (''आयआयएफएल'') येथे थकबाकी असलेल्या कर्जदारांच्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करणार आहोत, यामध्ये वारंवार सूचना देऊन देखील कर्जाची रक्कम न भरलेल्या किंवा कर्ज खाते सामान्य करू न शकलेल्या ऋणकोंचा समावेश केला गेला आहे. खालील कर्ज खात्यांमध्ये तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा सार्वजनिक लिलाव **दिनांक २०.१२.२०२४** रोजी **सकाळी १०.००** वाजल्यापासून जिल्हा केंद्र **परभणी -स्टेशन रोड गोल्ड लोन - 1ला मजला काबरा कॉम्प्लेक्स, लक्ष्मीनारायण मंदिर स्टेशन जवळ , परभणी-431401,** येथे होणार आहे. स्थान किंवा तारखेतील कोणताही बदल (जर असल्यास) लिलाव केंद्राकडे प्रदर्शित केला जाईल. कोणत्याही कारणास्तव येथे उल्लेखित तारखेस लिलाव होऊ शकला नाही किंवा त्या दिवशी लिलाव पूर्ण होऊ शकला नाही, तर आयआयएफएलला त्याच अटी व शर्तींवर कोणत्याही पुढील तारखेस उक्त लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा हक्क आरक्षित आहे. ग्राहकाचा मृत्यू झाला, तर त्या लिलावाशी संबंधित सर्व अटीं नामनिर्देशित व्यक्ती/कायदेशीर वारसाला लागू होतील.

**गोल्ड लोन खाता क्रमांक :** GL32388512, GL32408163, GL34331331, GL25572380, GL25562631, GL32394407.

लिलाव हा ''जिथे आहे तसे'', ''जसे आहे तसे'' आणि ''जेवढे आहे तेवढे'' या तत्वावर केला जाईल आणि आयआयएफएल द्वारे कोणत्याही प्रकारे सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकनाचे प्रतिनिधीत्वं केले जाणार नाही. आयआयएफएल स्वत:हून, लिलाव पुढे ढकलू किंवा रद्द करू शकेल, लिलावाच्या यादी मधून एखाद्या खात्याचे नाव वगळण्याचा अधिकार देखील आयआयएफएल कडेच असेल आणि हे करताना त्याकरिताची पुर्व सूचना, करण्यामागची कारणे, एखाद्या बोलीचा स्वीकार किंवा रद्दीकरण केल्याची कारणे देण्याची कोणतीही आवश्यकता नसेल. थकबाकी असलेल्या ऋणकोंची यादी, त्यांनी जमा केलेले दागिने आणि इतर तपशील हा संबंधित शाखांमध्ये दिलेला असेल. अयशस्वी कर्जदारांकडे हा पर्याय आहे की त्यांनी अद्ययावत व्याज आणि सर्व लागू शुल्कांसह संपूर्ण थकबाकीची परतफेड करावी जेणेकरुन ही नोटीस प्रकाशित झाल्यानंतरही त्यांचे कर्ज खाते बंद करण्याचा किंवा नियमित करण्याचा पर्याय असतो परंतु कोणत्याही परिस्थितीत लिलावाच्या तारखेपर्यंतच हे शक्य आहे, यात ते अयशस्वी झाल्यास सोन्याचे दागिने विकले जातील आणि थकबाकी (असल्यास) व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल. ही सूचना छापून आल्यानंतर जर एखाद्या ऋणकोने आपल्या कर्जाचा व्यवहार पूर्ण केला किंवा आपली थकबाकी भरून कर्ज खाते बंद केले, तर त्याला या सूचनेच्या छपाईचा संपूर्ण खर्च मात्र उचलावा लागेल. ऋणकोंना आपल्या बँक खात्यांचा तपशील शाखेकडे जमा/अद्ययावत करण्याची विनंती केली जाते आहे जेणेकरून लिलाव प्रक्रियेमधून निघालेला परतावा असल्यास तो जमा करता येऊ शकेल.

**तपशीलवार माहिती, अटी आणि नियम जाणून घेण्याकरिता कृपया आयआयएफएल फायनान्स लिमिटेडच्या नजिकच्या शाखेशी संपर्क साधा.**

तारीख : १८.१२.२०२४
स्थळ: परभणी
स्वाक्षरीकर्ता/-
अधिकृत स्वाक्षरीकर्ता
आयआयएफएल फायनान्स लिमिटेड



IIFL FINANCE
CIN: L67100MH1995PLC093797
Regd. Office: IIFL House, Sun Infotech Park, Road No. 16V, Plot No.B-23, Thane Industrial Area, Wagle Estate, Thane - 400604
Tel: (91-22) 41035000 • Fax: (91-22) 25806654
E-mail: reach@iifl.com • Website: www.iifl.com

**सोन्याचा दागिन्यांचा लिलावाची सार्वजनिक सूचना**

येथे सगळ्या संबंधित ऋणकोंना विशेषत: आणि सर्व सामान्य नागरिकांना, सामान्यपणे असे सूचित करण्यात येते की, आम्ही आयआयएफएल फायनान्स लिमिटेड (''आयआयएफएल'') येथे थकबाकी असलेल्या कर्जदारांच्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करणार आहोत, यामध्ये वारंवार सूचना देऊन देखील कर्जाची रक्कम न भरलेल्या किंवा कर्ज खाते सामान्य करू न शकलेल्या ऋणकोंचा समावेश केला गेला आहे. खालील कर्ज खात्यांमध्ये तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा सार्वजनिक लिलाव **दिनांक २०.१२.२०२४** रोजी **सकाळी १०.००** वाजल्यापासून जिल्हा केंद्र **जालना जीएल - पहिला मजला, कडबी मंडी , जुना मोंढा रोड आंध्र बँकेच्या मागे , जालना - 431203,** येथे होणार आहे. स्थान किंवा तारखेतील कोणताही बदल (जर असल्यास) लिलाव केंद्राकडे प्रदर्शित केला जाईल. कोणत्याही कारणास्तव येथे उल्लेखित तारखेस लिलाव होऊ शकला नाही किंवा त्या दिवशी लिलाव पूर्ण होऊ शकला नाही, तर आयआयएफएलला त्याच अटी व शर्तींवर कोणत्याही पुढील तारखेस उक्त लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा हक्क आरक्षित आहे. ग्राहकाचा मृत्यू झाला, तर त्या लिलावाशी संबंधित सर्व अटीं नामनिर्देशित व्यक्ती/कायदेशीर वारसाला लागू होतील.

**गोल्ड लोन खाता क्रमांक :** GL30703189, GL30713882, GL30627521, GL30613072, GL32576086, GL32309490, GL32303292, GL32280117, GL32268308, GL30656889, GL30635970, GL30509670, GL30505430, GL31428437, GL31432155, GL32484135, GL32498139, GL30551318, GL28445046, GL32570707, GL26826069, GL32467891, GL32431564, GL30478979, GL30441933, GL32485752, GL32498475, GL27387516, GL30557229, GL30636579, GL30656994, GL26810482, GL27382108, GL27392205, GL31802803, GL32703748, GL32589632, GL27925896, GL28699664, GL33080654, GL30728729, GL31318153, GL31299236, GL31388066, GL32219428, GL32225300, GL31388981, GL32364216, GL32093422, GL32085950.

लिलाव हा ''जिथे आहे तसे'', ''जसे आहे तसे'' आणि ''जेवढे आहे तेवढे'' या तत्वावर केला जाईल आणि आयआयएफएल द्वारे कोणत्याही प्रकारे सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकनाचे प्रतिनिधीत्वं केले जाणार नाही. आयआयएफएल स्वत:हून, लिलाव पुढे ढकलू किंवा रद्द करू शकेल, लिलावाच्या यादी मधून एखाद्या खात्याचे नाव वगळण्याचा अधिकार देखील आयआयएफएल कडेच असेल आणि हे करताना त्याकरिताची पुर्व सूचना, करण्यामागची कारणे, एखाद्या बोलीचा स्वीकार किंवा रद्दीकरण केल्याची कारणे देण्याची कोणतीही आवश्यकता नसेल. थकबाकी असलेल्या ऋणकोंची यादी, त्यांनी जमा केलेले दागिने आणि इतर तपशील हा संबंधित शाखांमध्ये दिलेला असेल. अयशस्वी कर्जदारांकडे हा पर्याय आहे की त्यांनी अद्ययावत व्याज आणि सर्व लागू शुल्कांसह संपूर्ण थकबाकीची परतफेड करावी जेणेकरुन ही नोटीस प्रकाशित झाल्यानंतरही त्यांचे कर्ज खाते बंद करण्याचा किंवा नियमित करण्याचा पर्याय असतो परंतु कोणत्याही परिस्थितीत लिलावाच्या तारखेपर्यंतच हे शक्य आहे, यात ते अयशस्वी झाल्यास सोन्याचे दागिने विकले जातील आणि थकबाकी (असल्यास) व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल. ही सूचना छापून आल्यानंतर जर एखाद्या ऋणकोने आपल्या कर्जाचा व्यवहार पूर्ण केला किंवा आपली थकबाकी भरून कर्ज खाते बंद केले, तर त्याला या सूचनेच्या छपाईचा संपूर्ण खर्च मात्र उचलावा लागेल. ऋणकोंना आपल्या बँक खात्यांचा तपशील शाखेकडे जमा/अद्ययावत करण्याची विनंती केली जाते आहे जेणेकरून लिलाव प्रक्रियेमधून निघालेला परतावा असल्यास तो जमा करता येऊ शकेल.

**तपशीलवार माहिती, अटी आणि नियम जाणून घेण्याकरिता कृपया आयआयएफएल फायनान्स लिमिटेडच्या नजिकच्या शाखेशी संपर्क साधा.**

तारीख : १८.१२.२०२४
स्थळ: जालना
स्वाक्षरीकर्ता/-
अधिकृत स्वाक्षरीकर्ता
आयआयएफएल फायनान्स लिमिटेड



IIFL FINANCE
CIN: L67100MH1995PLC093797
Regd. Office: IIFL House, Sun Infotech Park, Road No. 16V, Plot No.B-23, Thane Industrial Area, Wagle Estate, Thane - 400604
Tel: (91-22) 41035000 • Fax: (91-22) 25806654
E-mail: reach@iifl.com • Website: www.iifl.com

**सोन्याचा दागिन्यांचा लिलावाची सार्वजनिक सूचना**

येथे सगळ्या संबंधित ऋणकोंना विशेषत: आणि सर्व सामान्य नागरिकांना, सामान्यपणे असे सूचित करण्यात येते की, आम्ही आयआयएफएल फायनान्स लिमिटेड (''आयआयएफएल'') येथे थकबाकी असलेल्या कर्जदारांच्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करणार आहोत, यामध्ये वारंवार सूचना देऊन देखील कर्जाची रक्कम न भरलेल्या किंवा कर्ज खाते सामान्य करू न शकलेल्या ऋणकोंचा समावेश केला गेला आहे. खालील कर्ज खात्यांमध्ये तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा सार्वजनिक लिलाव **दिनांक २०.१२.२०२४** रोजी **सकाळी १०.००** वाजल्यापासून जिल्हा केंद्र **औरंगाबाद-पैठण गेट रोड - जोशी हाईट्स, कमर्शियल तळमजला, उजव्या बाजूचा भाग, सीटीएस क्रमांक १४१८५ क्रांती चौक ते गुलमंडी रोड, पैठण गेट परिसर, औरंगाबाद-४३१००१,** येथे होणार आहे. स्थान किंवा तारखेतील कोणताही बदल (जर असल्यास) लिलाव केंद्राकडे प्रदर्शित केला जाईल. कोणत्याही कारणास्तव येथे उल्लेखित तारखेस लिलाव होऊ शकला नाही किंवा त्या दिवशी लिलाव पूर्ण होऊ शकला नाही, तर आयआयएफएलला त्याच अटी व शर्तींवर कोणत्याही पुढील तारखेस उक्त लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा हक्क आरक्षित आहे. ग्राहकाचा मृत्यू झाला, तर त्या लिलावाशी संबंधित सर्व अटीं नामनिर्देशित व्यक्ती/कायदेशीर वारसाला लागू होतील.

**गोल्ड लोन खाता क्रमांक :** GL28602771, GL29036753, GL25592541, GL28610711, GL28936800, GL29348326, GL31101491, GL28179846, GL28160364, GL32488329, GL32250217, GL32256908, GL32281450, GL32278855, GL32461064, GL27110549, GL27101884, GL32579980, GL30626608, GL30607973, GL29716017, GL29719251, GL32695246, GL31791452, GL31563272, GL31797841, GL31806858, GL28055939, GL32220954, GL31513396, GL31365286, GL30593823, GL30580846, GL28831132, GL27959007, GL31331842, GL28900298, GL31486619, GL31508987, GL31552602, GL30674346, GL33784337, GL28042640, GL31342757, GL27953174, GL31694947, GL30684395, GL29008943, GL27811765, GL27827761, GL32695081, GL28885269, GL32509804, GL32524502, GL31548384, GL31556295, GL31223693, GL31221315, GL29860223, GL30020309, GL29872150, GL26447866, GL26453548, GL32194014, GL32142657, GL32126883, GL32176190, GL31845244, GL31852083, GL32402044, GL30615433, GL30627981, GL32881435, GL24228022, GL23788525, GL32011695, GL32489750, GL31995717, GL31604044, GL31592846, GL22795258, GL32854470, GL32647397, GL32542242, GL25477630, GL25882872, GL25577551, GL25440621, GL27987326, GL34197270, GL23892051, GL32467955, GL27816357, GL29417337, GL28896148, GL28887679, GL29971644, GL33649701, GL30173362, GL30497024, GL32556486, GL32349905, GL30272399, GL32045453, GL30481236, GL30457656, GL31421739, GL31433530, GL29291589, GL31174170, GL31155581, GL31522575, GL32223281, GL32226698, GL31246219, GL31250846, GL31673462, GL31667700, GL31189361, GL31350971, GL31369266, GL31309587, GL23251737, GL23472960, GL23280681, GL26630696, GL27730139, GL24181973, GL27608352, GL25516733, GL27790115, GL29393707, GL24078380, GL27491031, GL28344583, GL27311086, GL29173548, GL27743118, GL29660832, GL26245177, GL24198446, GL27776839, GL27311096, GL28212716, GL27743144, GL25073788, GL28549578, GL28120908, GL27034699, GL29650703, GL28554409, GL27944170, GL28158652, GL34165373, GL24468530, GL24474234, GL32244246, GL32253407, GL31282268, GL30471779, GL29554735, GL29569342, GL32511504, GL31828126, GL32520899, GL31833518, GL30281465, GL30851322, GL30834870, GL30509857, GL30506005, GL30562021, GL30459489, GL30481623, GL32525105, GL30677797, GL32511956, GL31477155, GL31490906, GL31774103, GL31197122, GL31192151, GL31390818, GL33732111, GL28174725, GL31376508, GL32240932, GL31341306, GL31338747, GL31923091, GL31934226, GL32146279, GL32135526, GL29274051, GL29238881, GL29250794, GL29627390, GL28985925, GL29001833, GL28501835, GL30385399, GL28498576, GL32353903, GL27977605, GL26358397, GL26358312, GL27584154, GL28810083, GL27778252, GL27743114, GL27777176, GL27947634, GL25178405, GL27493560, GL28812836, GL26148856, GL28120907, GL28120914, GL25364453, GL28751567, GL27676509, GL30850969, GL30833126, GL27316124, GL27880627, GL30862119, GL31426693, GL25901284, GL28322320, GL29342411, GL29040850, GL32643559, GL30463980, GL30483378, GL32547698, GL25321305, GL31348725, GL25953713, GL31198911, GL31183233, GL30569096, GL30594515, GL30725265, GL30177658, GL26232121, GL26248040, GL32158756, GL32168997, GL32247374, GL32255263, GL29276329, GL29266407, GL31321847, GL31307938, GL27738447, GL32336439, GL32334971, GL31291470, GL31287621, GL26624883, GL32197266, GL32182371, GL30538087, GL32068342, GL28957128, GL28840275, GL30451587, GL27588873, GL28754224, GL27418106, GL30484229, GL29715267, GL29952686, GL30484394, GL30760550, GL30260371, GL30455259, GL32068344, GL31555498, GL31535733, GL30275282, GL27215072, GL30749945, GL28344606, GL22993624, GL28404465, GL30888788, GL29585870, GL28973215, GL30897154, GL28383780, GL26685906, GL23977679, GL27991700, GL25238396, GL31440267, GL31447213, GL27983442, GL32031638, GL32037526, GL32165801, GL32168607, GL31752711, GL31730309, GL32207513, GL32498707, GL32375659, GL32486864, GL32045021, GL32407585, GL32152803, GL32171755, GL32230498, GL31581189, GL31568939, GL32405184, GL32384295, GL32187906, GL30562424, GL32334203, GL32194620, GL32546131, GL31870477, GL32265345, GL32284284, GL26630280, GL26673677, GL31884433, GL31851672, GL31843447, GL31901178, GL30725740, GL26798598, GL26782104, GL31969010, GL30267837, GL29267715, GL30596100, GL30572295, GL32524952, GL32511366, GL27296872, GL27296643, GL31383443, GL31890919, GL22553257, GL31403039, GL29348062, GL27577272, GL27578319, GL32257977, GL32242470, GL30251179, GL32454737, GL32469881, GL32169674, GL32159943, GL27767301, GL30473115, GL31401041, GL23435895, GL28312734, GL32674508, GL32395394, GL28836848, GL24525876, GL32599906, GL31944309, GL31802332, GL32648009, GL32305590, GL28718134, GL32399868.

लिलाव हा ''जिथे आहे तसे'', ''जसे आहे तसे'' आणि ''जेवढे आहे तेवढे'' या तत्वावर केला जाईल आणि आयआयएफएल द्वारे कोणत्याही प्रकारे सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकनाचे प्रतिनिधीत्वं केले जाणार नाही. आयआयएफएल स्वत:हून, लिलाव पुढे ढकलू किंवा रद्द करू शकेल, लिलावाच्या यादी मधून एखाद्या खात्याचे नाव वगळण्याचा अधिकार देखील आयआयएफएल कडेच असेल आणि हे करताना त्याकरिताची पुर्व सूचना, करण्यामागची कारणे, एखाद्या बोलीचा स्वीकार किंवा रद्दीकरण केल्याची कारणे देण्याची कोणतीही आवश्यकता नसेल. थकबाकी असलेल्या ऋणकोंची यादी, त्यांनी जमा केलेले दागिने आणि इतर तपशील हा संबंधित शाखांमध्ये दिलेला असेल. अयशस्वी कर्जदारांकडे हा पर्याय आहे की त्यांनी अद्ययावत व्याज आणि सर्व लागू शुल्कांसह संपूर्ण थकबाकीची परतफेड करावी जेणेकरुन ही नोटीस प्रकाशित झाल्यानंतरही त्यांचे कर्ज खाते बंद करण्याचा किंवा नियमित करण्याचा पर्याय असतो परंतु कोणत्याही परिस्थितीत लिलावाच्या तारखेपर्यंतच हे शक्य आहे, यात ते अयशस्वी झाल्यास सोन्याचे दागिने विकले जातील आणि थकबाकी (असल्यास) व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल. ही सूचना छापून आल्यानंतर जर एखाद्या ऋणकोने आपल्या कर्जाचा व्यवहार पूर्ण केला किंवा आपली थकबाकी भरून कर्ज खाते बंद केले, तर त्याला या सूचनेच्या छपाईचा संपूर्ण खर्च मात्र उचलावा लागेल. ऋणकोंना आपल्या बँक खात्यांचा तपशील शाखेकडे जमा/अद्ययावत करण्याची विनंती केली जाते आहे जेणेकरून लिलाव प्रक्रियेमधून निघालेला परतावा असल्यास तो जमा करता येऊ शकेल.

**तपशीलवार माहिती, अटी आणि नियम जाणून घेण्याकरिता कृपया आयआयएफएल फायनान्स लिमिटेडच्या नजिकच्या शाखेशी संपर्क साधा.**

तारीख: १८.१२.२०२४
स्थळ: औरंगाबाद
स्वाक्षरीकर्ता/-
अधिकृत स्वाक्षरीकर्ता
आयआयएफएल फायनान्स लिमिटेड

## अग्रलेख...

# अलौकिकाचे लेणे...

साक्षात्काराची असंख्य रूपे असतात. कधी ती रूपे मनास अनुभवता येतात, कधी डोळ्यांस दिसतात तर कधी त्याच्या केवळ श्रवणानुभवाने कर्णसंपुटे संतुष्ट होतात. एखाद्या शांत, समयी, वाऱ्याची एखादी झुळूक आसमंतात झोके घेऊ लागते, तिच्या लडिवाळ स्पर्शाने झाडे, वेलींची पाने आनंदाने डोलू लागतात आणि त्यांचा तो आनंद ध्वनीतून व्यतीत होतो. आसपासच्या कोलाहलाची माणसास अलिकडे एवढी सवय झालेली असते की, शांततादेखील कधी कधी असह्य होत असल्याने शांततेचा सहवास फार काळ सहन होत नाही; अशा स्थितीत असा अनुभव येणे आणि त्या ध्वनीमधून उमटणाऱ्या संगीताचा साक्षात्कार होणे ही मनाची एक अत्युच्च अनुभवावस्था असते. निसर्गाच्या प्रत्येक कृतीला लय, ताल, सूर आणि संगीत असते, असे म्हणतात. पहाटेच्या मंद वाऱ्याच्या झुळुकीमधील संगीत, किलबिलाट करणाऱ्या पक्ष्यांच्या कूजनातील संगीत, झऱ्याच्या खळखळाटातील संगीत अशा प्रत्येक संगीतलहरींचा नाद कानात साठविण्याच्या क्षमता कानांना लाभली की, कानाच्या माध्यमातून अध्यात्माच्या मार्गाकडे जाण्याची थोडीफार क्षमता साधता येते. म्हणूनच कसलेल्या कानांची निर्मिती करण्याकरिता निसर्गानेच चहुबाजूंनी संगीत, सूर, लय आणि तालाची निर्मिती केलेली असते. अलिकडे शहरीकरणाच्या गजबजाटात त्या संगीताचे सूर कानापर्यंत पोहोचणे जवळपास अवघडच झालेले असल्याने, ते संगीत शोधण्याचा सोपा मार्ग निसर्गाने निर्माण केला. त्याला मानवी प्रतिभेतून उमलणाऱ्या कलांचे रूप दिले आणि माणसाच्या गळ्यात, हातात, बोटात प्रतिभेचे लेणे चढविले. पक्ष्यांच्या कूजनातून उमटणाऱ्या संगीताचा अनुभव देणारा एखादा कोकिळकंठी गळा पिढ्यान्‌पिढ्यांना निसर्गातील त्या मुकलेल्या अनुभवाचा साक्षात्कार देऊन मने समृद्ध करू लागला, कोणा प्रतिभाशाली कलावंताच्या कसलेल्या बोटांनी छेडलेल्या तारेतून उमटणाऱ्या मंजुळ ध्वनीच्या श्रवणातून अध्यात्माचा साक्षात्कार होऊ लागला, तर कधी एखाद्या चर्मवाद्यातून उमटणाऱ्या तालावर मान डोलू लागली की आपोआपच ब्रह्मानंदी टाळी लागून त्याच अध्यात्माची अनोखी अनुभूती मनावर राज्य करू लागली... अशा अनोख्या अध्यात्माचा आधार मिळाला की मन खंबीर होते, समस्यांचे ओझे हलके वाटू लागते आणि त्यांना सामोरे जाण्याची मानसिक क्षमता वाढते, असा आपला अनुभवसिद्ध विश्वास आहे. प्रत्येक माणसास अध्यात्माची ती अवस्था साधता यावी यासाठी निसर्गाने संगीत तर निर्माण केलेच; पण ज्याप्रमाणे निसर्गाच्या अंगाखांद्यावर खेळणाऱ्या पक्ष्यांच्या, वाऱ्यांचा, झऱ्यांच्या सुरातून संगीत पेरले, तसे संगीत माणसांच्या मनात, ओठात, गळ्यात आणि बोटातही पेरण्याचे बहुमोल काम निसर्गानेच करून ठेवले. एवढेच करून निसर्ग थांबला नाही, तर या संगीतकलेचा वारसा समृद्ध करण्याची जबाबदारी पेलणारे कलावंतही निर्माण केले. असे कलावंत घडविता येत नाहीत. निसर्गाचा आशीर्वाद घेऊन ते जन्मालाच आलेले असतात. अगोदर त्यांना त्यांच्यातील कलेचा साक्षात्कार होतो, तिच्या अस्तित्वाची पालखी ते श्रद्धेने खांद्यावर घेतात आणि कलेची उपासना सुरू होते. कठोर साधनेतून कला प्रसन्न झाली की, कलावंत सिद्ध होतो आणि निसर्गाने खांद्यावर दिलेली पालखीची पुढची वाटचाल सुरू होते.

संगीतातील जी घराणी अशाच परंपरेतून निर्माण झाली, त्यामध्ये उस्ताद झाकिर हुसैन यांच्या 'घराण्या'चा उल्लेख करावाच लागतो. उस्ताद अल्लारखाँ नावाच्या श्रेष्ठ कलावंताच्या बोटांनी तबल्यासारख्या चर्मवाद्यावर थाप दिली की, त्यातून उमटणाऱ्या स्वर्गीय ध्वनीचा अनुभव घेऊन रसिकांच्या पिढ्यांच्या कसलेल्या कानांना त्या अनुभवाचा पुढेदेखील कधीच विसर पडू नये, यासाठी निसर्गाने तो वारसा त्यांच्या सुपुत्राकडे, उस्ताद झाकिर हुसैन यांच्या सुपूर्द केला आणि कलेच्या वारशाची ती पालखी नम्रपणे आपल्या खांद्यावर घेऊन झाकिर हुसैन यांनी तालवाद्याची, तबल्याची उपासना सुरू केली. वारसा आणि तपश्चर्या यांचा संगम झाला की, त्यातून सिद्ध होणारी कला अजोड असते, हे उस्ताद झाकिर हुसैन यांच्या तबलावादनाने सिद्ध करून दाखविले. कठोर तपश्चर्येतून तावून-सुलाखून सिद्ध झालेल्या कसलेल्या बोटांची थाप एकदा पडली की, तबल्याच्या चामड्यातून साक्षात उमटणारे बोल अनुभवण्याचा आनंद अध्यात्माच्या आनंदाहून वेगळा नसतो, हे उस्ताद झाकिर हुसैन यांच्या कलेने दाखवून दिले. तबल्यावर थिरकणाऱ्या त्यांच्या कलावंत बोटांतून उमटणाऱ्या प्रत्येक बोलानजीक, श्रोत्यांच्या मुखातून प्रत्येक समेवर उमटणारी 'वाहवा'ची दाद हा त्या अध्यात्मानुभवाचाच पुरावा असतो. उस्ताद झाकिर हुसैन यांचा जन्म ज्या कलोपासकाच्या घराण्यात झाला, त्या घराण्याने तर संगीताच्या माध्यमातून मनामनामध्ये अध्यात्म रुजविण्यासाठीच जणू अवतार घेतला असावा. पिता अल्लारखाँ, भाऊ तौकिफ कुरेशी, फझल कुरेशी स्वतः झाकिर हुसैन अशा कलावंतांची मांदियाळीच निसर्गाने जन्माला घातली आणि संगीतसाधनेचा वारसा त्यांच्याकडे सोपवून मानवी मने समृद्ध करण्याची जबाबदारी दिली. झाकिर हुसैन यांच्या तबल्याचे सूर पोहोचले नाहीत, असा एखादाही कोपरा आज जगाच्या पाठीवर शोधावाच लागेल आणि त्या तालसुरांनी तृप्त झाले नाहीत, असा एकही कान शोधूनही सापडणार नाही. त्या ध्वनिलहरींची रसिकमनावरची जादू वर्षानुवर्षे बहरत गेली. कोणत्याही ढंगाचे संगीत असो, लाडिक, मधाळ सुरांतून उमटणाऱ्या गीताची धून असो, भक्तिरसाने ओथंबलेले सूर असोत, तपश्चर्येतून सिद्ध झालेल्या गळ्यातून उमटणारा अधिकारी स्वर असो, पाश्चात्त्य संगीताची झाक असलेले गीत असो किंवा विरह व्यथांच्या व्याकुळतेने ओथंबलेला आवाज असो, झाकिर हुसैन यांच्या बोटांनी तबल्यावर उमटलेल्या ध्वनींच्या साथीने त्या प्रत्येकास जिवाभावाची साथ दिली आणि संगीताचा प्रत्येक स्वर समृद्ध केला. हिंदुस्तानी संगीतातील अढळ स्थानी असलेल्या तबल्यावर झाकिर हुसैन यांच्या जादुई बोटांनी जवळपास सहा दशके अधिराज्य गाजविले आणि तबल्याची प्रतिष्ठा उंचावून ती जगाच्या पाठीवर अढळ स्थानी नेऊन ठेवली. जिथे जिथे त्या ध्वनीची उधळण झाली, तिथे तिथे अक्षरशः सुरांचे चांदणे फुलले. या ध्वनीने गायनकळा, वादनकळा धन्य केली आणि संगीताला स्वर्गसुख दिले. कानाच्या माध्यमातून मनामनांत बरसणाऱ्या या ध्वनीतून माणसाच्या मनाला आणि शरीराला ताजेपणा बहाल केला आणि संगीत हा माणसाच्या जगण्याचा अविभाज्य भाग ठरवून जगण्याला आनंदाचा अर्थ दिला. झाकिर हुसैन यांच्या जादुभरल्या बोटांनी तबल्यावर स्वर्गीय ध्वनीच्या लगडी उलगडू लागल्या की कान जागे होतात, मन खुलत जाते, शरीर ठेका धरू लागते आणि या आनंदात विहरणारी सारी मने, एका अनोख्या नात्याने एकमेकांशी जोडली जातात. एखाद्या समेवर एकाच क्षणी असंख्य श्रोत्यांच्या मुखातून उमटणारी दाद हा त्या नात्याचाच प्रत्यक्ष पुरावा असतो. पद्मविभूषण, ग्रॅमी पुरस्कारांचे विजेते, संगीत क्षेत्रात आपल्या कलेने अढळ स्थान प्राप्त केलेला ध्रुवतारा आणि कला समृद्ध करण्याच्या जबाबदारीची पालखी नम्रपणे खांद्यावर वाहतानाही आपल्यातील माणूसपण हरवणार नाही, याचे विनम्रभान असलेला उस्ताद झाकिर हुसैन नावाच्या सच्चा कलावंताने जगाचा निरोप घेतल्याच्या दुःखद वार्तेने संगीत क्षेत्राचे सूर हळवे झाले आहेत. झाकिर हुसैन यांच्या बोटांतून निघणारे जिवंत सूर यापुढे अनुभवता येणार नाहीत हे खरे असले, तरी त्यांच्या साधनेतून सिद्ध झालेले असंख्य जिवंत सूर अजरामरपणे संगीत क्षेत्रावर अधिराज्य गाजवत राहणार आहेत. तबल्याची साधना करणाऱ्या प्रत्येकास उपासनेचा वारसा बहाल करून झाकिर हुसैन यांनी जगाचा निरोप घेतला आहे. असे म्हणतात की, कोणताही ध्वनी वातावरणातून कधीच नष्ट होत नसतो. झाकिर हुसैन यांच्या जादूगार बोटांतून तबल्यावर उमटताना जन्माला येणारा प्रत्येक ध्वनी तर अजरामरत्व घेऊनच या वातावरणात दाखल झालेला असल्याने त्यांचे नाव आणि तो ध्वनी तर अजरामर राहणारच आहे. आपल्या अस्तित्वावर सोपविली गेलेली संगीत साधनेच्या संस्काराची आणि वारशाची पालखी समृद्ध करून झाकिर हुसैन नावाचे व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे; पण त्यांनी मागे ठेवलेल्या कलेचा आवाज पुढच्या असंख्य पिढ्यांना आनंद देत राहील, अध्यात्माची अनुभूती देत राहील आणि कानाच्या माध्यमातून मनेही समृद्ध करत राहील. एका अलौकिक कलावंताने आपला अवतार संपविला असला, तरी त्याचे कार्य मात्र अजरामर होऊन राहिले आहे.

## आंतरराष्ट्रीय

**वसंत गणेश काणे**

# सीरियातील मुलखावेगळा संघर्ष

बशर अल-असद हे सीरिया देशाचे राष्ट्राध्यक्ष, सैन्य दलाचे प्रमुख आणि सत्तारूढ बाथ पार्टीचे जनरल सेक्रेटरी होते. त्यांच्या अगोदर बशर यांचे वडील हाफिज अल-असद हेही सलग ३० वर्षे सीरियाचे राष्ट्राध्यक्ष होते. त्यांच्यानंतर बशर सीरियाचे सर्वेसर्वा झाले. अशाप्रकारे सीरियावर गेली अनेक वर्षे असद कुटुंबाची सत्ता होती. बंडखोरांनी ही सत्ता ८ डिसेंबर २०२४ ला उलथून टाकली. यासाठी गेली १३ वर्षे ते संघर्ष करीत होते. आत्ता-आत्ता तर या संघर्षाला गृहयुद्धाचे स्वरूप आले होते. असद यांनी सहकुटुंब सहपरिवार रशियात पलायन केले आहे. रशियाने मानवतेच्या दृष्टिकोनातून त्यांना आश्रय दिला आहे. आश्रय घेण्यासाठी असद यांनी रशियाची निवड करावी ही नोंद घ्यावी अशी बाब आहे. इस्लामी बंडखोरांनी रशिया आणि इराण या दोन राष्ट्रांनाही या निमित्ताने दणका दिला आहे, असे राजकीय निरीक्षक मानतात. याचे कारण हे आहे की, ही दोन राष्ट्रे सीरियातील असद राजवटीला पाठिंबा देत होती. रशियाने २०२२ मध्ये युक्रेनवर चढाई केली होती. त्यामुळे रशिया यावेळी असदला फारशी मदत करू शकला नाही. इराण हिजबुल्लाहमार्फत असदला मदत करीत असे. पण इस्रायलने हिजबुल्लाहलाच सध्या सुरू असलेल्या युद्धात पुरते नामोहरम केले आहे. त्यामुळे बंडखोरांना नामी संधी मिळाली आणि ते विजयी झाले असे दिसते. दुसरे असे की, सीरियातील जनतेतही असदविरोधात अगोदरच असलेला असंतोष वाढीस लागला होता. त्यांची सहानुभूती आता बंडखोरांकडे वळली. अशाप्रकारे बंडखोरांचा उठाव शेवटी गृहयुद्धात परिवर्तित झाला. असद यांची कारकीर्द ही जगातली सर्वांत मोठी जुलमी राजवट मानली जाते. ती सर्वांत जास्त काळ चालली. त्या मानाने तिचा बोभाटा मात्र फारसा झाला नाही. ती आता संपली. नवीन राजवट कशी येते ते पाहायचे.

सीरिया प्रकरणी रशिया, इराण, तुर्कस्तान, अमेरिका आणि इस्रायल ही राष्ट्रे आपापले हेतू समोर ठेवून भाग घेत होती. रशियाने असदची सतत पाठराखण केलेली आहे. युक्रेनमध्ये रशिया स्वतः जायबंदी झाला नसता तर त्याने सीरियाला आणखी मदत नक्कीच केली असती. इतर आव्हानांचा सामना करण्यात गुंतलेल्या इराणने तर प्रत्यक्ष युद्ध कुणाशीच केले नाही. त्याचे मुख्य वैर इस्रायलशी होते आणि आहे. यासाठी इराणने लेबनॉनमधील हिजबुल्लाह गटाला हाताशी धरले होते. पण हिजबुल्लाह गट इस्रायलसमोर टिकाव धरू शकला नाही. त्यामुळे इराणला हिजबुल्लाहकरवी सीरियात काही करता आले नाही. तुर्कस्तान आणि हयात तहरीर अल-शाम (एचटीएस) यांच्यात फारसे सख्य कधीच नव्हते. तुर्कस्तानला कुर्दिशांना ठोकून काढायचे होते. त्याचे हल्ले तेवढ्यापुरतेच मर्यादित असत. अमेरिका सीरियात तळ ठोकून होती ती यासाठी की, तिला मुख्यतः इसिसला पायबंद घालायचा होता. इस्रायलचे हल्ले लेबनॉनमधील हिजबुल्लाह गटाच्या विरोधात होते. या हल्ल्यातच हिजबुल्लाहला प्रचंड हानी सहन करावी लागली त्यामुळे हिजबुल्लाहमध्ये असदला मदत करण्याइतके त्राणच उरले नव्हते. अशा या अजब संघर्षाचे जगातले हे पहिलेच उदाहरण असावे.

या गृहयुद्धाची सुरुवात तशी २०११ मध्येच झाली, असे म्हटले पाहिजे. यात लाखापेक्षा जास्त लोकांचे जीवन उद्ध्वस्त झाले. सीरियातच निदान सहा भागांत जणू स्वतंत्र राजवटी सुरू झाल्या होत्या. काहींचे नियंत्रण देशातील प्रभावी गट करीत असत तर काहींचे नियंत्रण देशाबाहेरील सूत्रधारांच्या हाती होते. हे गृहयुद्ध इतके लांबले की, शेवटी त्याचा जगाला जणू विसरच पडला होता. २०११ चा उठाव लोकशाहीवादी घटकांचा होता. तो देशव्यापी होता; पण असदशी एकनिष्ठ असलेल्या सैन्याने तो चिरडून टाकला. २०१२ साली संघर्षाची परिणती गृहयुद्धात झाली. सरकारी फौजा, फ्री सीरियन आर्मी (एफएसए), जिहादी गट असे तीन गट निरनिराळ्या भागांवर नियंत्रण करू लागले. २०१३ मध्ये सीरियातील कुर्दिश डेमोक्रॅटिक पार्टीने कुर्दबहुल उत्तर भागावर नियंत्रण मिळविले आणि 'रोजावा' या नावाचा स्वायत्त प्रशासकीय प्रदेश स्थापन झाला. २०१४ मध्ये इराक लेव्हंट (आयएसआयएल) यांनी सीरियावर नियंत्रण मिळविले आणि खिलाफत स्थापन केले. ('इस्लामिक स्टेट्स ऑफ इराक अ‍ॅण्ड लेव्हंट' किंवा 'इस्लामिक स्टेट्स ऑफ इराक अ‍ॅण्ड सीरिया' ही एक आंतरराष्ट्रीय अतिरेकी संघटना व स्वयंघोषित खिलाफत आहे. इस्लाम धर्मातील सुन्नी पंथाच्या वहाबी/सलाफी विचारांच्या कट्टर अतिरेक्यांद्वारे चालवली जात असलेली ही संघटना प्रामुख्याने पश्चिम आशियातील इराक व सीरिया या देशांमध्ये कार्यरत आहे.) २०१५ मध्ये सीरियन असंतोषाचे आंतरराष्ट्रीयीकरण झाले, असे म्हणता येईल. रशियाने असद सरकारची बाजू घेत ठिकठिकाणी बंडखोरांविरुद्ध मदत म्हणून बॉम्बहल्ले केले. यामुळे असद शासनाचे बळ वाढले आणि त्याचा हुरूपही वाढला. त्यांनी अलेप्पो शहर जिंकून घेतले. आशिया व युरोपला जोडणाऱ्या रेशीम मार्गावरील अलेप्पो हे शेवटचे शहर आहे/होते. २०१७ मध्ये अमेरिकेने कुर्दिशांच्या सीरियन डेमोक्रॅटिक फोर्सेसना (पार्टीला) पाठिंबा दिला. त्यांनी रक्का हे शहर जिंकून घेतले. रक्का हे अलेप्पोच्या पूर्वेला सुमारे १६० किलोमीटर अंतरावर युफ्रेटिस नदीच्या उत्तर तीरावरील सीरियामधील एक शहर आहे. २०१६ मध्ये असदच्या फौजांनी पूर्वेकडील घौटा आणि दारा हे प्रदेश जिंकून पश्चिम सीरिया आपल्या नियंत्रणाखाली आणला. पूर्वी असद यांच्या सैन्याने २१ ऑगस्ट २०१३ च्या पहाटे घौटा येथे रासायनिक हल्ला केला होता, म्हणून हे शहर जगाला प्रथम माहीत झाले होते. जॉर्डनच्या सीमेच्या उत्तरेस दारा या शहरी हौरान प्रदेशाची राजधानी आहे. २०२० मध्ये तुर्कस्तानने हस्तक्षेप करायला सुरुवात केली. तुर्कस्तानचे वैर कुर्दिशांशी होते. तुर्कस्तानचे हल्ले सीरियाच्या कुर्दिशबहुल उत्तर भागापुरतेच मर्यादित होते. तुर्कस्तानमधील कुर्दिश लोकांचा सीरियातील कुर्दिश लोकांशी संपर्क होऊ नये, हा तुर्कस्तानचा हेतू होता. कारण हे दोन्ही प्रदेश एकत्र येऊन स्वतंत्र कुर्दिस्तान निर्माण करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगून होते. २०२० ते २०२३ या काळात संघर्षाला काहीसा विराम मिळाला. डिसेंबर २०२४ मध्ये बंडखोरांनी एकदम उचल खाल्ली. त्यांना हयात तहरीर अल-शाम (एचटीएस) यांचे सक्रिय साहाय्य मिळाले. हयात तहरीर अल-शाम किंवा तहरीर अल-शाम ही एक सुन्नी इस्लामवादी राजकीय आणि सशस्त्र संघटना आहे. त्यांच्या साह्याने बंडखोरांनी अलेप्पो तर जिंकलेच; शिवाय होम्स आणि दमास्कसही जिंकून असद यांना पलायन करण्यास भाग पाडले. होम्स हे पश्चिम सीरियामधील एक महत्त्वाचे शहर आहे. ओरोंटेस नदीवर स्थित होम्स हे सीरियातील अन्य शहरांना जोडणारे आणि भूमध्य सागरी किनाऱ्यावरील मध्यवर्ती शहरही आहे. दमास्कस ही सीरिया देशाची राजधानी आहे. दमास्कस हे मानवाने अखंडपणे वसाहत केलेले जगातील सर्वांत जुने शहर आहे, असे मानतात. सीरियात जे घडले ते समजून घ्यायचे असेल तर हा सर्व इतिहास समोर ठेवूनच विचार करावा लागतो. म्हणून हा तपशील महत्त्वाचा ठरतो. तो आज जगभर अभ्यासला जातो आहे. कारण सीरियाची कहाणी ही एक मुलखावेगळी कहाणी मानली जाते.

९४२२८०४४३०

## वेध

**पुंडलिक आंबटकर**

# परग्रहवासी, विज्ञान आणि तर्क-वितर्क

भौतिक जगाने विज्ञानाच्या जोरावर आजपर्यंत अनेक शोध लावलेत. हे शोध कुठल्याही चमत्कारापेक्षा कमी नाहीत. परंतु, आजही विज्ञानाला जीवनाच्या उत्पत्तीचा उलगडा करता आलेला नाही. किंबहुना जीवनाचा पूर्ण उलगडा होण्याची शक्यता भविष्यातही कुठल्याच अंगाने वाटत नाही. कारण, मनुष्याच्या कल्पनेलासुद्धा एकप्रकारची मर्यादा आहे आणि जीवनाच्या उत्पत्तीचा शोध घेणे, ही बाब मनुष्य कल्पनेच्या आवाक्यात नाही. किंबहुना या बाबीचा शोध घेण्यात मनुष्य पूर्णतः असमर्थ आहे. ज्या ठिकाणी मनुष्याची कल्पनाशक्ती संपते तिथूनच भारतीय अध्यात्माचा उगम होतो. आज विज्ञानाने जे शोध लावले आहे त्यातील बऱ्याच बाबी हिंदूंच्या धर्मग्रंथांत प्राचीन काळापासूनच नमूद आहे. त्यामुळे विज्ञान आणि अध्यात्माची सांगड घालणे काळाची गरज ठरते. परंतु, आजपर्यंत तरी तसा प्रयत्न झालेला नाही. अमेरिकेची नासा ही संशोधन संस्था अनेक वर्षांपासून परग्रहवासी अर्थात एलियन्सचा माग काढण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतु, आजपर्यंत तरी एलियन्सच्या अस्तित्वाचा कुठलाच पुरावा शास्त्रज्ञांना सापडलेला नाही. तरीही आकाशात उडत्या तबकड्या पाहिल्याचा दावा अधूनमधून होत असतो. डिसेंबर २०२१ मध्ये मात्र नासाने एक अहवाल सादर करून यात कुठलेच तथ्य नसल्याचे स्पष्ट केले होते.

इंग्लंडचे थोर शास्त्रज्ञ स्टिफन हॉकिंग यांनी मनुष्याने एलियन्सचा शोध थांबवला पाहिजे, असे मत व्यक्त केले होते. हॉकिंग यांनी ब्रह्मांडातील जीवनाचे तीन स्तर मांडले आहेत. पृथ्वीवरील जीवन यादृष्टीने पहिल्याच चरणात असल्याचे त्यांचे म्हणणे होते. त्यामुळेच एलियन्स आपल्यापर्यंत पोहोचले तर ते पृथ्वीवासीयांना नष्ट करतील, अशी भीती त्यांच्या मनात होती. परंतु, त्यांच्या दाव्याला कुठलाही ठोस आधार नाही. कारण, भौतिक शरीर घेऊन एलियन्स पृथ्वीपर्यंत पोहोचू शकतच नाही, हे विज्ञानानेच अनेकदा सिद्ध केलेले आहे. हॉकिंग निरीश्वरवादी होते. अर्थातच त्यांना ईश्वराचे अस्तित्व मान्य नव्हते. परंतु, जिथे मनुष्याची कल्पनाशक्ती संपते तिथूनच ईश्वराच्या अस्तित्वाला सुरुवात होते, असा तर्क भारतीय अध्यात्माने मांडलेला आहे. हिंदू तत्त्ववेत्त्यांनी आणि भारतीय धर्मग्रंथांनी भौतिक देहाचा नाही, तर त्यातील चैतन्यशक्ती आणि या चैतन्यशक्तीच्या निर्मात्याचा विचार मांडलेला आहे. विश्वातील कुठलीच गोष्ट विनाकारण अस्तित्वात येऊ शकत नाही. त्यामुळेच सृष्टीचे सूत्रसंचालन करणारा नायक आहेच, यावर अध्यात्माचा ठाम विश्वास आहे.

पृथ्वीवरील जीवसृष्टी पंचतत्त्वांपासून अस्तित्वात आलेली आहे आणि हे पंचतत्त्व ब्रह्मांडातूनच पृथ्वीने प्राप्त केलेले आहे. त्यामुळे परग्रहवासीयांचे अस्तित्व नाकारणे, ही बाब सयुक्तिक ठरू शकत नाही. आपल्या आकाशगंगेचा विस्तार १ लाख प्रकाश वर्षे इतका आहे. अर्थातच प्रकाशाच्या वेगाने आपण प्रवास केला तरी संपूर्ण आकाशगंगा फिरण्यासाठी १ लाख वर्षे लागतील आणि ही बाब केवळ अशक्य आहे. पृथ्वी सूर्यापासून १४ कोटी ९६ लाख किलोमीटर अंतरावर आहे. या स्थितीला हेबिटेबल झोन म्हणून गणले जाते. जे जीवनाच्या उत्पत्तीसाठी अत्यंत आवश्यक आहे. या विशाल ब्रह्मांडात जिथे जिथे अशी स्थिती असेल आणि इतर आवश्यक तत्त्वे अस्तित्वात आली असेल तर त्या प्रत्येक ठिकाणी जीवनाची उत्पत्ती झाल्याशिवाय राहू शकत नाही.

आपल्या सौरमंडळात गुरू ग्रहाचा चंद्र युरोपावर जीवसृष्टी असल्याचा तर्क अनेकदा मांडला जातो. यास काही ठोस कारणेसुद्धा आहेत. गुरूच्या या उपग्रहावर बर्फाचा समुद्र आढळून आल्याने बर्फाखाली जलचरांचा अधिवास असण्याची शक्यता नाकारता येत नाही. परंतु, ही जीवसृष्टी पृथ्वीच्या तुलनेत खूपच मागासलेली असेल. कारण, पाण्याच्या बाहेर पडण्याची गरज जोपर्यंत तेथील जीवांना वाटणार नाही, तोपर्यंत तरी त्यांचा विकास होऊ शकत नाही. शनिच्या एका चंद्रावरही पाण्याची वाफ आढळून आल्याचे सांगितले जाते. परंतु, अद्याप तरी या दोन्ही ठिकाणी जीवन असल्याची पुष्टी होऊ शकलेली नाही. मंगळ ग्रहावर वातावरण आहे. शिवाय तिथे कधी काळी समुद्र होता, असा तर्क मांडला जातो. त्यामुळेच तिथे कधी काळी जीवन असावे, असा अंदाज बांधण्यात आला आहे. परंतु, तसा ठोस दावा आजपर्यंत कुठल्याही संशोधन संस्थेने केलेला नाही. भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात् इस्रोने मागील १५ वर्षांत गगनभरारी घेतली आहे. जे नासासारख्या प्रगत संस्थेलाही जमले नाही, अशा अनाकलनीय बाबींचा उलगडा इस्रोने करून दाखविला आहे. भविष्यात इस्रोच्या जोरावर भारत संपूर्ण जगाचा मार्गदर्शक ठरेल, यात दुमत नाही.

९८८१७१६०२७

## इतस्ततः

**दत्तात्रेय आंबुलकर**

# श्रीमद्‌भगवद्‌गीता व आधुनिक व्यवस्थापन

महाभारतातील कौरव विरुद्ध पांडवांच्या कुरुक्षेत्रावरील युद्धात भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला केलेला उपदेश म्हणजे श्रीमद्‌भगवद्‌गीता. आध्यात्मिक आणि तात्त्विक पातळीवरही अनन्यसाधारण महत्त्व लाभलेला हा ग्रंथ व्यवस्थापकीय कौशल्याच्या दृष्टिकोनातूनही तितकाच मार्गदर्शक ठरावा. नुकत्याच संपन्न झालेल्या गीता जयंतीनिमित्ताने श्रीमद्‌भगवद्‌गीता व आधुनिक व्यवस्थापनाची सांगड घालणारे हे विवेचन महत्त्वपूर्ण ठरावे.

महाभारताच्या पृष्ठभूमीवर व प्रत्यक्ष युद्धभूमीवर अर्जुनाला मोह, भ्रम, अनिश्चितता यातून बाहेर पडून भयमुक्त होऊन युद्धाला सामोरे जाण्याचा संदेश व प्रेरणा देणारी 'श्रीमद्‌भगवद्‌गीता' म्हणजे आधुनिक व्यवस्थापन व व्यवस्थापनशास्त्र या उभय क्षेत्रांत सर्व संबंधितांना मार्गदर्शन करणारा व्यवस्थापन ग्रंथ होय. गीतेचा प्रत्येक अध्याय व श्लोक व्यक्तिगतच नव्हे, तर व्यवस्थापकीय स्तरावरदेखील तितकाच मार्गदर्शक ठरतो. याचा उपयोग गीतेचे अभ्यासक-अनुयायांना केवळ नोकरी-रोजगारच नव्हे, तर करीअरव्यतिरिक्त व्यक्तिगत व सामाजिक जीवनातील प्रगतीसाठी उपयुक्त ठरतो. सकृद्दर्शनी पाहता, पांडवांपेक्षा कित्येक पटीने अधिक सैन्य व भीष्म, द्रोण, कर्ण यांसारखे अजेय बाहुबली कौरव सेनेत असताना पण, केवळ आपले लक्ष्य आणि उद्दिष्ट यावरच लक्ष केंद्रित करून संघर्षपूर्ण व आव्हानपर परिस्थितीवर मात करून उद्दिष्टप्राप्ती कशी केली जाऊ शकते, याचा चिरकालीन व प्रेरणादायी संदेश गीतेतूनच मिळू शकतो.व्यवस्थापन पद्धतीच्या चाकोरी वा रचनेमध्ये मनुष्य म्हणजेच कर्मचारी हा नेहमीच महत्त्वाचा घटक असतो. सर्वसाधारणपणे व्यवस्थापन क्षेत्रातील अनुभवी व तज्ज्ञांच्या मते, व्यवसाय-व्यवस्थापन प्रक्रियेला खऱ्या अर्थाने यशस्वी करण्यासाठी व्यक्ती व व्यक्ती समूह अधिकाधिक सक्षमपणे व यशस्वी पद्धतीने काम करणे ही बाब सर्वोपरी ठरत असते. नेमकी हीच बाब गीतेमध्ये 'योगः कर्मसु कौशलम्' या सूत्रामध्ये सांगितली आहे. याचाच अर्थ म्हणजे, आपले कार्य आणि कामकाज यामध्ये अधिक कौशल्य वा कुशलता प्राप्त करणे हेच यशस्वी जीवनाचे लक्ष असायला हवे. त्याचप्रमाणे गीतेला काम आणि कार्य याप्रति समर्पण भावनेचे जनक मानले जाते. गीतेमध्ये हीच भाव-भूमिका महत्त्वाची ठरते. याचे कारण गीता तत्त्वज्ञानात काम करणाऱ्यांचे त्यांच्या कामाप्रति संपूर्ण समर्पण असावे, यावर भर दिला जातो व त्याचे सकारात्मक परिणाम होत जातात. व्यवस्थापन क्षेत्रात ज्याला 'मॅनेजमेंट बाय ऑब्जेक्टिव्हज' म्हटले जाते, त्या व्यवस्थापन संकल्पनेचे मूळ 'ध्येय साधना' स्वरूपात दिसते, हे लक्षणीय आहे.



याशिवाय भगवद्‌गीतेतील विविध अध्याय, श्लोक इत्यादींमध्ये नमूद केलेले दृष्टांतवजा विवेचन, मार्गदर्शन इत्यादी मुद्दे युवावर्गाला शिक्षण-रोजगारापासून जीवन वा व्यवसायातील प्रगती त्यासाठी आवश्यक अशी कौशल्यप्राप्ती यश मिळविण्यासाठी विविध आव्हानांचा करावा लागणारा यशस्वी सामना यासाठी जे मार्गदर्शक-विवेचन केले आहे, त्याचा प्रमुख गोषवारा पुढीलप्रमाणे-

**आळस व भीतीचा त्याग करणे :** भगवान श्रीकृष्णांनी गीतेच्या दुसऱ्या अध्यायातील तिसऱ्या श्लोकात नमूद केल्यानुसार, 'क्लैब्यं मा स्म गमः' म्हणजेच व्यक्तीने यशप्राप्तीसाठी आपल्या आयुष्यातील आळस व भीती म्हणजेच दुबळेपणाचा त्याग करणे आवश्यक ठरते. पुढे श्रीकृष्णांनी म्हटल्यानुसार, 'क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परन्तप' म्हणजे आपल्या हृदयात व्याप्त तुच्छ दुबळेपणा, कमजोर प्रवृत्तीचा त्याग केल्याशिवाय मनुष्याला यशाच्या पायरीवरही पाय राखणे शक्त होत नाही. व्यावसायिक जीवनाचा हाच तर मूलमंत्र आहे.

**जीवनातील अविचलपणा :** दीर्घकालीन उद्दिष्टासह यशप्राप्ती करायची असेल, तर जीवनात सातत्य हवे. अस्थिर व चंचल मनोवृत्ती याठिकाणी उपयोगाची नसते. गीतावचनानुसार, 'गतासूनगतासूंश्च नानुशोचन्ति पण्डिताः' म्हणजेच हर्ष वा शोक याहून दूर राहून प्रत्येक स्थितीत तटस्थ वा भयस्थ वृत्तीने आपण पुढेच मार्गक्रमण करायला हवे.

**स्थिर बुद्धीसह ध्येयसाधना :** गीतेतील विशेष व्यवस्थापन तत्त्व म्हणजे, जीवनातील यशापयशानुसार व्यक्तीने गौरवान्वित वा हताश होऊ नये. उलट व्यवस्थापकाने नेहमीच स्थिर बुद्धीसह ध्येयप्राप्तीच्या दिशेकडे अग्रेसर व्हायला हवे. श्रीकृष्णांनी नमूद केल्यानुसार आपल्या ध्येयानुरूप इच्छित फलप्राप्तीमध्येच यशस्वी जीवनाचे सार आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक व्यवस्थापकाने आपल्या उद्देश आणि उद्दिष्टांप्रति व त्यांच्या प्राप्तीसाठीच निर्धारित व नियोजित असायला हवे.

**एकाग्र चित्त व संपूर्ण समर्पण :** श्रीकृष्णांनी म्हटल्यानुसार, मानवी जीवन हे मन आणि आत्मा यामध्ये असणारे एक द्वंद्व स्वरूपाचे आहे. त्यांच्यानुसार मनुष्याला आपले मन वा चित्त स्थिर ठेवून प्राप्त परिस्थितीचे विश्लेषण-विवेचन करायला हवे. त्याचवेळी मनुष्य योग्य वा संयत निर्णय घेऊ शकतो. याचाच पुढचा व मार्गदर्शक टप्पा म्हणजे, 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' हा गीतेतील श्लोक म्हणजे व्यक्ती म्हणून व्यवस्थापकाने आपल्या कर्म म्हणजेच कामाची चिंता न करता, आपल्या कर्तव्य व कर्तव्यपरायणतेचा मार्ग चोखाळायला हवा.

**संस्थागत व संघटनेच्या हिताचेच काम :** श्रीकृष्णांनी अर्जुनाला आपल्या स्वतःशी संबंधित व मर्यादित स्वरूपातील मुद्यांपेक्षा सर्वांच्या म्हणजेच समाजहिताचा विचार करून निर्णय घेण्यासाठी प्रेरित केले. याचाच अर्थ संस्था-संघटना अथवा व्यवसायाच्या संदर्भात निर्णय घेताना स्वतःचे नव्हे, तर सर्वांचे व्यापक हित लक्षात घेऊन निर्णय घेणेच निर्णायक क्षणी महत्त्वाचे असते.

**आपले काम आपली ओळख :** गीतेतील प्रत्येक व्यक्तीपासून व्यवस्थापक-व्यवस्थापनापर्यंतच्या सर्वांसाठी असणारा महत्त्वाचा बोध म्हणजे कुठल्याही व्यक्तीची ओळख त्याचे कुटुंब-जाती वा यानुसार नव्हे, तर त्याचे कर्म म्हणजेच कामकाजावर आधारित असायला हवी. यासाठी परस्पर संबंध व कार्याधारित व्यवहार या मुद्यांवर भर दिला गेला आहे. व्यवस्थापकांच्या कामकाज, व्यवहार व कार्यबद्धता इ. संदर्भात हे मुद्दे आजही लागू होतात.

**सतत निरंतर प्रयास :** व्यवस्थापनाच्या संदर्भात सातत्यपूर्ण प्रयत्नांना पर्याय नसतो. प्रसंगी व्यवसाय-व्यवस्थापनातील चढ-उतार वा यशापयशाचा सामना करूनच अपेक्षित यश निश्चितपणे मिळत असते. त्यामुळे यश न मिळाल्यास निराश न होता मार्गक्रमण करावे, याची प्रेरणाच भगवद्‌गीतेतून मिळते.

**बदल आणि बदलांबद्दल :** बदल ही निरंतर होणारी प्रक्रिया आहे. ही बिरुदावली निरंतर वापरली जाते. व्यवस्थापनांतर्गत तर आज एक विशेष व आवश्यक बाब म्हणून 'बदलांचे व्यवस्थापन व व्यवस्थापनातील बदलाचे महत्त्व' यावर विशेष भर दिला जातो. यासंदर्भात श्रीकृष्णांनी गीतेत नमूद केलेली बाब म्हणजे, बदलांपासून वा बदलाला सामोरे जाताना घाबरणारी व्यक्ती प्रसंगी अनावश्यक वा अनैतिक कार्य करण्यास प्रवृत्त होते. ही बाब व्यवस्थापकांनी प्रकर्षाने टाळायला हवी. या आणि यांसारख्या अनेक व्यावहारिक दृष्टांतांसह आपल्याला भगवद्‌गीतेतून व्यवस्थापन पद्धतीचे नेमके व मार्गदर्शक दर्शन होते.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

### व्यंग्यचित्रकार मनोहर सप्रे यांना अभिवादन

चंद्रपूर येथील प्रसिद्ध व्यंग्यचित्रकार मनोहर सप्रे यांचे निधन झाल्याचे वर्तमानपत्रातून समजले. ते अतिशय खट्याळ तरीही मार्मिक असे व्यंग्यचित्रकार होते. चंद्रपूर येथे १९७९ साली त्याना भेटलो होतो. काही मित्रांसमवेत ताडोबा राष्ट्रीय अभयारण्यात पहिल्यांदा गेलो होतो. त्यात मनोहर सप्रेही होते. खूप हळहळ आणि दुःख वाटते की मराठी जनमानस एका, सहज सुंदर आणि जनसुलभ प्रतिभावंत कलावंतास मुकले आहे. आडगावी राहून, निखळ हास्यनिर्मिती करणारी व्यंग्यचित्रे त्यांनी रेखाटली होती. प्रचलित राजकीय आणि सामाजिक स्थितीवरीलही त्यांची मिस्किल प्रतिक्रिया, सर्वसामान्य वाचकांना साहित्यिक अनुभूती देणारी खमंग भेट होती. प्रदीर्घ काळ त्यांनी महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक आणि सांस्कृतिक जीवन अभिरुचिसंपन्न आणि समृद्ध केले होते. दिवंगत मनोहर सप्रे यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन.

**जयंत गायकवाड**/वरळी, मुंबई

### हा तर जनतेचा अपमान

नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत जनतेने भरभरून महायुतीच्या आमदारांना मतदान केले. हे मतदान अत्याधुनिक ईव्हीएमच्या साहाय्याने झाले. ईव्हीएम तपासणीपासून तर ती वापरेपर्यंतच्या सर्व प्रक्रिया सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसमोर, संपूर्ण महाराष्ट्रात पार पडल्या असतानाही, विरोधी महाविकास आघाडीचे पुढारी ईव्हीएमवर अविश्वास व्यक्त करून आपल्या मशीन व तिच्या प्रोग्रामिंगच्या अज्ञानाचे प्रदर्शन करत आहेत. सोबतच निवडणूक आयोगावर अविश्वास दर्शवत आहेत. संपूर्ण राज्यात एकाचवेळी सर्व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी मतदान केंद्रात मतदान प्रक्रियेकडे दुर्लक्ष करणे वा झोपून राहणे अशक्य आहे. जनतेने सार्वमताने दिलेला हा कौल नाकारणे म्हणजे जनमताचा अपमान करण्यासारखेच आहे. पुढच्या मतदान प्रक्रियेत याचा परिणाम अकारण ओरडणाऱ्यांच्या विरोधात जाऊ शकतो, हे या नेत्यांच्या लक्षात येत नसेल काय?

**गणेश ज. हजारे**/८६९८८१५५५९

## वाचक पत्रे

### हिंदुराष्ट्र स्थापनेत सनातन आश्रमाचे मोलाचे योगदान!

नुकताच ऑनलाइनच्या माध्यमातूनच एक आध्यात्मिक कार्यक्रम बघण्यात आला. हे वर्ष परमपूज्य गोविंददेव गिरी महाराज यांचे अमृत महोत्सवी वर्ष तर सनातन संस्थेचे रौप्य महोत्सवी वर्ष आहे. हा दुग्धशर्करा योग जुळून आला. त्यानिमित्त गोमंतकाच्या पुण्यभूमीत आध्यात्मिक स्तरावर अतिशय सुंदर कार्यक्रम मोठ्या प्रमाणात संपन्न झाला. त्यावेळी मार्गदर्शन करतांना गोविंददेव गिरी महाराजांनी सनातन संस्थेने केलेल्या भगीरथ प्रयत्नांचे कौतुक केले. प्रवाहाविरुद्ध पोहण्याचे धाडस सनातन संस्थेने केले. ज्या काळी हिंदू म्हणवून घेण्याची सुद्धा कुणाची हिंमत होत नव्हती त्या काळात समाजमनात सनातन धर्म, संस्कृती रुजविण्याचा प्रयत्न केला. सनातन संस्थेचे आणि सनातनच्या रामनाथी आश्रमाचे हिंदुराष्ट्र स्थापनेत मोलाचे योगदान असणार आहे. त्यांचे गोडवे गावे तितके थोडेच आहे, अशा शब्दांत कौतुक सुमनांची माळ आशीर्वाद स्वरूपात सनातन संस्थेला मिळाली. खरंच हा सोहळा म्हणजे हिंदुराष्ट्रासाठी कार्य करणाऱ्या प्रत्येकाला नवसंजीवनी देणारा होता. गोविंददेव गिरी महाराजांच्या चरणी कोटी कोटी कृतज्ञता तसेच सनातन संस्थेला रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त शुभेच्छा!

**रमा देशमुख**/नागपूर

### राष्ट्रीय कीर्तन महोत्सवाने राष्ट्रभक्तीचा जागर

संवेदना परिवाराचे हे राष्ट्रीय कीर्तन महोत्सवाचे पाचवे पुष्प. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कीर्तनकार चारुदत्तबुवा आफळे यांच्या अमोघ व अभ्यासू वाणीतून, दमदार आवाज, संगीताची उत्तम जाण मनस्वी अभिनय हे सर्व आफळेबुवांच्या अंगचे गुण प्रेक्षकांना तासन्तास खिळवून ठेवतात. यावेळी देखील पश्चिम नागपूर नागरिक संघाने नेहमीप्रमाणे यथायोग्य सहकार्य केले. उत्तरप्रदेशातील, वंग भूमीतील, महाराष्ट्रातील क्रांतिकारकांचे कार्य व त्याला जोडून रामायणातील अशीच पात्रे हा फारच मोठा चिंतनाचा आगळा विषय आफळेबुवांनी फार सुंदररीत्या मांडला. स्वातंत्र्यावीर सावरकर व सावरकर परिवाराचे योगदान हा त्यांचा हातखंडा विषय. तरुण क्रांतिकारकांच्या हौतात्म्याने राष्ट्रभक्ती जागवली, त्या तिघींनी डोळ्यात पाणी आणले तर तात्यारावांच्या जीवनप्रवासाने अंगावर रोमांच उभे राहिले. या कीर्तन महोत्सवाचे आगळेपण म्हणजे पारंपरिक पेटी, तबल्याऐवजी तरुणाईला आकर्षित करणारा आधुनिक वाद्यवृंद व गीत- रामायणातील अजरामर गीते मराठी, हिंदी देशभक्तिपर लोकप्रिय व हिंदी सिनेगीते सुद्धा. पाचही दिवस आपापल्या क्षेत्रातील दिग्गजांनी छान मार्गदर्शन केले. पण कायम स्मरणात राहतील ते सात्यकी सावरकरांचे प्रखर बोलणे. उत्कृष्ट नियोजन, शिस्त, व्यवस्थितपणा यासाठी आयोजकांचे अभिनंदन.

**रवी वाघमारे**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अ‍ॅड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## तालुका विज्ञान प्रदर्शनात आर्य चाणक्य विद्यालयाचे यश

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ डिसेंबर -**

धाराशिव तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात आर्य चाणक्य विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दुसरा आणि तिसरा क्रमांक पटकावून नैपुण्य प्राप्त केले आहे.

दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक शारुख तांबोळी, अजिंक्य लोंढे यांनी तयार केलेल्या आधुनिक होम या उपकरणाला मिळाले यासाठी त्यांना प्रशालेच्या शिक्षिका नूतन नागपुरे, मोनालिका पवार यांचे मार्गदर्शन लाभले. तर तिसरा क्रमांक प्रणव साळुंके, अथर्व वाघोलीकर यांनी तयार केलेल्या रोबोटिक फवारणी यंत्र या उपकरणाला मिळाला. विद्यार्थ्यांच्या या कौशल्याबद्दल लोकसेवा समितीचे अध्यक्ष ॲड.मिलिंद पाटील,शेषाद्री डांगे, डॉ.अभय शहापूरकर, कमलाकर पाटील मुख्याध्यापक डॉ.मनीष देशपांडे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना प्रशालेचे बाबासाहेब जगताप, सौ.शिंदे यांनी मार्गदर्शन केले.





### संक्षिप्त वृत्त...

#### कर्जमाफी करुन सरकारने शब्द पाळावा : संतोष घोडके

**जळकोट, दि.१७ डिसेंबर -**

सरकारने निवडणुकीत जाहीर केल्यानुसार आता शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची घोषणा करावी. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा, अशी मागणी सिंदगाव (ता.तुळजापूर) येथील युवासेना विभागप्रमुख संतोष घोडके यांनी केली आहे. घोडके यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्रात नुकतेच नवे सरकार स्थापन झाले आहे. महायुतीचे सरकार आले आहे. येणाऱ्या काळात सरकारने महाराष्ट्राच्या विचारांची परंपरा ठेवत शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, वंचितांना केंद्रबिंदू मानून सर्वसामान्य जनतेला न्याय द्यावा. तसेच निवडणुकीत शेतमालाला योग्य हमीभाव तसेच सरसकट कर्जमाफी देऊन सातबारा कोरा करण्याचा दिलेला शब्द पाळावा. महायुतीने जाहीरनाम्यात तसेच जाहीर सभेत हा शब्द दिला होता. तो शब्द पाळावा.सोयाबीनचे दर दिवसेंदिवस उतरत चालल्याने शेतकरी हताश झाला आहे. सरकारने शेतकऱ्यांची दखल घेण्याची गरज आहे, अशी मागणी घोडके यांनी केली आहे.

#### २० डिसेंबर रोजी : सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाचा शुभारंभ

**धाराशिव, दि.१७ डिसेंबर -**

सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलन शुभारंभ कार्यक्रम जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेत व पोलीस अधिक्षक,अप्पर जिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत २० डिसेंबर रोजी सकाळी ११:३० वाजता जिल्हा नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय,धाराशिव येथे आयोजित करण्यात आला आहे. जिल्ह्यातील सर्व शासकीय/ निमशासकीय कार्यालये तसेच माजी सैनिक व देशभक्त नागरिकांच्या माहितीसाठी दरवर्षी ७ डिसेंबर हा दिवस सशस्त्र सेना ध्वजदिन म्हणून साजरा केला जातो. या कार्यक्रमामध्ये उत्कृष्ट ध्वजदिन निधी संकलनाबाबत मान्यवरांचा सत्कार,वीर पत्नी,वीर माता,वीरपिता यांचा सत्कार तसेच माजी सैनिकांना आर्थिक मदतीचे धनादेश वाटप, विशेष गौरव पुरस्कार प्राप्त पाल्यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

# आपसिंग्याच्या वस्तीगृहात बोगस पटसंख्या?

## अनुदान लाटण्यासाठी शिक्षण संस्थेकडून दाखविले खोटे विद्यार्थी...समाजकल्याण विभागही सहभागी

## विद्यार्थीकडून पाणी तापवण्यासाठी करवून घेत आहेत जळण गोळा करण्याची काम...



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ डिसेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील नरेंद्र आर्य विद्यालय संलग्न असलेले मागासवर्गीय विद्यार्थी वस्तीगृहात गेल्या कित्येक वर्षापासून बोगस विद्यार्थी दाखवून शासकडून अनुदान लाटण्याचा गंभीर प्रकार घडत असून विद्यार्थ्याकडून पाणी तापवण्यासाठी जळण गोळा करण्याचे काम करुन घेत आहेत. तसेच या वस्तीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांची पटसंख्याही बोगस असल्याचे तरुण भारतच्या स्टिंग ऑपरेशनमधून दिसून आले आहे.

येत्या काही नरेंद्र आर्य विद्यालय हे आपले अमृतमहोत्सवी वर्ष साजरे करत आहे. विद्यालय स्थापनेपासून येथे विद्यार्थी वस्तीगृह आहे. हे वस्तीगृह विद्यालय सुरळीत चलावे यासाठी स्थापनेच्या सुरुवातीला आपसिंगा गावातील काही दानशुर व्यक्तींनी वस्तीगृहास धान्य देवून वस्तीगृह चालविले होते. यानंतर ते काही काळ गावातील नागरिक आणि पालकांच्या मदतीवर चालत होते.

शासनाकडून वस्तीगृहासाठी आर्थिक मदत सुरु झाल्यानंतर यात अनेक गैरप्रकार सुरु झाले. तसेच बोगस नावे जोडून खोटे विद्यार्थी





दाखविण्यात आले. मात्र, गेल्या कित्येक दिवसापासून वसतीगृहात राहत नसलेल्या विद्यार्थ्यांची नोंदही वस्तीगृहाच्या हजेरी पटावर आहे. एकही दिवस वस्तीगृहात न राहिलेल्या पालकांशी तरुण भारतकडून संपर्क साधण्यात आला. यात नरेंद्र आर्य विद्यालय येथे सध्या कार्यरत असणारे शिपाई यांच्याही मुलाची नोंद वसतीगृहाच्या हजेरी पत्रकांवर दिसून आली. हा शिपाई अपसिंगा गावातीलच स्थानिक रहिवाशी आहे. यामुळे गावातीलच रहिवाशी असणाऱ्या आणि नरेंद्र आर्य विद्यालय येथे कार्यरत असलेल्या शिपाई यांच्या मुलाला वस्तीगृहात प्रवेश दिलाच कसा हा प्रश्न यामुळे उपस्थित होत आहे.

तसेच याच गावातील अनेक विद्यार्थी हे हजेरी पटाला दिसून आले. ते स्थानिकचे असताना त्यांना कसे वस्तीगृह प्रवेश दिला गेला याचीही चौकशी होणे गरजेचे आहे.

### जळण गोळा केल्याने विद्यार्थी आजारी

अपसिंगा येथील मागासवर्गीय वस्तीगृहात विद्यार्थ्यांना आंघोळीसाठी गरम पाण्याची ऑटोमेटीक व्यवस्था नाही. तसेच गेल्या काही दिवसात येथे पाणी गरम करण्यासाठी बंबची व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र, बंबमध्ये पाणी गरम करण्यासाठी लाकडाची गरज असते. हे लाकडे जळण गोळा करण्यासाठी विद्यार्थ्यांना कामाला लावले जात आहे. यामुळे ते अंगदुखी होवून आजारी पडत आहेत.

### अध्यक्ष म्हणतात ४२, अधिक्षक म्हणतात ७६ आणि विद्यार्थी म्हणतात आम्ही २५ जणच

दै.तरुण भारतचे जिल्हा प्रतिनिधी जेव्हा अपसिंगा येथील विद्यार्थी वस्तीगृहात पोहचले. तेव्हा वस्तीगृहात चार-पाच विद्यार्थी जळण भरुन अंग दुखत असल्याने शाळेत गेले नव्हते. त्यांच्याकडे विचारपूस केल्यानंतर त्यांनी आम्ही संपूर्ण वस्तीगृहात २५ जणच असल्याचे सांगितले.त्यानंतर काही वेळानंतर तेथे वस्तीगृह अधिक्षक आले त्यांना वस्तीगृहातील पटसंख्या विचारली असता त्यांनी ७६ आहे असे सांगितले. त्यानंतर संस्थेच्या अध्यक्षांना विचारले असता त्यांनी ४२ विद्यार्थी असल्याचे सांगितले.

### ग्रंथालयात पुस्ताकऐवजी जळण

अपसिंगा येथील मागासवर्गीय वस्तीगृहात विद्यार्थ्यांनी जळण गोळा करुन आणले होते. ते वस्तीगृहाच्या मैदानात टाकले होते. यातील काही जळण हे ग्रंथालय असलेल्या खोलीत टाकले होते.

### चौकशी करुन कारवाई करू

अपसिंगा येथील मागासवर्गीय वस्तीगृहात बोगस पटसंख्या आढळून आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल. तसेच त्या संस्थेने मागणी केलेले अनुदानही गोठविण्यात येईल.

**-श्री.खामितकर, समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद**

## एमएसएमई क्षेत्र निर्यात प्रचालन जागरुकतेसाठी कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ डिसेंबर -**

राज्यासाठी महत्वपूर्ण योगदान देणाऱ्या एमएसएमई क्षेत्रावर अधिक भर देऊन त्यांची कार्यक्षमता व उत्पादकता वाढविणे, राज्यात उद्योजकीय वातावरण अधिक व्यापककरन रोजगार, स्वयंरोजगार संधी मोठ्या प्रमाणात निर्माण करणे,निर्यातवृध्दीस चालना देण्यासाठी तसेच उद्योगाच्या विकासाकरीता राज्य तसेच केंद्र शासनाचे विविध विभाग त्यांचे उपक्रम व योजना उद्योग संचालनालयाकडून राज्यात राबविण्यात येत आहे.

जिल्ह्यातील एकदिवसीय कार्यशाळा १९ डिसेंबर २०२४ रोजी जिल्हा नियोजन समिती सभागृह मध्यवर्ती प्रशासकीय इमारत,धाराशिव येथे सकाळी ९.३० ते दुपारी २ वाजता दरम्यान आयोजित करण्यात येत आहे.या चर्चासत्राचे नियोजन विकास आयुक्त (उद्योग) यांच्या मार्गदर्शनात तसेच जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेत व छत्रपती संभाजीनगर विभागाचे उद्योग सहसंचालक बी.टी.यशवंते यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात येत आहे. या कार्यशाळेचा सर्व भागधारकांनी लाभ घ्यावा,असे आवाहन महाव्यवस्थापक,जिल्हा उद्योग केंद्र अमोल बळे यांनी केले आहे



**धाराशिव - धाराशिव शहरातील जगप्रसिद्ध सुफी संत हजरत ख्वाजा शमशोद्दीन गाझी रहे यांचा उर्स १५ जानेवारीपासून सुरू होत आहे. या कालावधीमध्ये मिरवणुकीमध्ये डीजेला परवानगी देऊ नये यासाठी धाराशिव शहरातील मुस्लिम धर्मगुरूंच्या वतीने पोलीस अधीक्षक यांना निवेदन देण्यात आले आहे. शहरातील तरुणांनी डीजे न लावून सहकार्य करण्याचे आवाहन देखील मुस्लिम धर्मगुरूंच्या वतीने करण्यात आले आहे.**

## मांजरा शुगर इंडस्ट्रीज (कंचेश्वर शुगर) : गाळपास आलेल्या ऊसाची २ हजार ७०० रुपयांचा हप्ता खात्यावर जमा



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ डिसेंबर -**

सहकार महर्षी व महाराष्ट्राचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचे मार्गदर्शनाखाली तुळजापुर तालुक्यातील मंगरुळ येथील मांजरा शुगर इंडस्ट्रीज कारखान्याचा गाळप हंगाम सन २०२४-२५ यशस्वीपणे चालु आहे. दि. १६ डिसेंबर अखेर कारखान्याचे गाळप ८२ हजार ४०० मेट्रीक टन झाले असुन साखर उत्पादन ८१ हजार ८०० क्विंटल इतके झाले आहे. सरासरी साखर उतारा १०.१८ टक्के इतका आहे. कारखान्याने दि. १ डिसेंबर ते १५ डिसेंबरपर्यंत या कालावधीत गाळपास आलेल्या ऊस बिलाचे पेमेंट एफआरपी पोटी प्रती मेट्रीक टन रु. २ हजार ७०० रुपयेप्रमाणे (दि.१८) रोजी ऊस पुरवठादार शेतकरी यांचे बँक खात्यात जमा होणार आहे याची सर्व ऊस पुरवठादार शेतकरी यांनी नोंद घ्यावी.

सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांचे मार्गदर्शनानुसार शेतकऱ्यांच्या जिवनात आर्थीक उन्नती व्हावी व त्यांचा जिवनस्तर उंचावण्याचा सार्थ हेतु विचारात घेवुन कारखान्यामार्फत विविध ऊस विकास योजना राबविण्यात येत आहेत. शेतकरी हा केंद्र बिंदु समोर ठेवुन या कारखान्याची वाटचाल सुरु आहे. त्यामुळे जास्तीत जास्त या भागातील शेतकरी यांचा ऊस मांजरा कारखान्यास देण्याचा कल आहे. मांजरा कारखान्याची शेतकऱ्यांना वेळेवर ऊस दर अदा करण्याची परंपरा कायम ठेवत या कारखान्याने दि. १ डिसेंबर ते १५ डिसेंबरपर्यंत ऊस पुरवठा केलेल्या शेतकऱ्यांना प्रति मेट्रीक टन रु.२ हजार ७०० प्रमाणे ऊस बिलाची रक्कम आजरोजी बँकेत वर्ग करीत आहेत. त्यामुळे या भागातील सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी मांजरा शुगर इंडस्ट्रीज (कंचेश्वर) कारखान्यास जास्तीत जास्त ऊस पुरवठा करुन सहकार्य करण्याचे आवाहन कारखान्याचे जनरल मॅनेजर सतीश वाकडे यांनी केले.

## तेरणा अभियांत्रिकीच्या दोन विद्यार्थिनींची जलसंपदा विभागात निवड



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ डिसेंबर -**

येथील तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांचा दिवसेंदिवस नोकरीतील संधींचा आलेख वाढत असून नुकत्याच येथील तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या स्थापत्य अभियांत्रिकी या विभागातील दोन विद्यार्थिनींची सरळ सेवा भरती अंतर्गत जलसंपदा विभागात स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक म्हणून निवड झाली आहे. स्थापत्य अभियांत्रिकीच्या प्रगती बिभीशन सिरसट आणि श्रद्धा सोमवंशी या दोन विद्यार्थिनींची जलसंपदा विभागात स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक म्हणून निवड झाल्याचे पत्र त्यांना प्राप्त झालेले आहे.

मागील दोन वर्षांमध्ये अभियांत्रिकी महाविद्यालयाची स्थापत्य विभागाचे २० पेक्षा अधिक विद्यार्थी जलसंपदा, पंचायत समिती बांधकाम विभाग, नगरपरिषद अशा विविध शासकीय सेवेत मोठ्या हुद्द्यावर निवडून आज चांगल्या प्रकारे कार्य करत आहेत.

विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून चांगल्या हुद्द्यावर शासकीय सेवेत निवड व्हावी म्हणून महाविद्यालयाकडून व तसेच ट्रस्ट अंतर्गत तेरणा स्पर्धा परीक्षा अध्ययन केंद्राच्या वतीने सातत्याने प्रयत्न सुरू आहेत त्यांच्या यशाबद्दल नुकताच महाविद्यालयाच्या वतीने दोघींचाही सत्कार करण्यात आला.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विक्रमसिंह माने, स्थापत्य अभियांत्रिकीचे विभाग प्रमुख प्रा.शितल पवार, प्रा.व्ही व्ही कोकाटे, प्रा.अमृता पिंपळे, सहाय्यक ग्रंथपाल बिबीशन सिरसट, प्रा.ए.ए.कदम, प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. या प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने म्हणाले की, स्थापत्य अभियांत्रिकी सारख्या क्षेत्रात नोकरीच्या संधी अनेक असून विद्यार्थ्यांनी डिग्रीबरोबरच, कौशल्यावर आधारित असलेले विविध कोर्सेस महाविद्यालयांमध्ये सुरू असून तेही पूर्ण करावेत. स्थापत्य अभियांत्रिकी मधून सलग तीन-चार वर्षांपासून विद्यार्थ्यांच्या शासकीय नौकरी मध्ये निवडीचे प्रमाणही वाढलेले आहे.

त्याबद्दलही त्यांनी समाधान व्यक्त केले. या दोन विद्यार्थिनींच्या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. पद्मसिंह पाटील, विश्वस्त आ.राणाजगजीतसिंह पाटील, विश्वस्त मल्हार पाटील, व्यवस्थापकीय समन्वयक प्रा.गणेश भातलवंडे यांनी दोघींचे विशेष अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.



## जयप्रकाश विद्यालयाच्या खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ डिसेंबर -**

रुईभर येथील जयप्रकाश माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालय येथील डॉजबॉल स्पर्धेत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाल्यामुळे विद्यालयाच्या प्रांगणात प्राचार्य जयप्रकाश कोळगे यांच्या हस्ते खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.

तालुका क्रीडा संकुल उदगीर विभागीय स्तरावरील डॉजबॉल स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेमध्ये जयप्रकाश माध्य व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या तीन संघानी सहभाग नोंदवला होता. त्यात १९ वर्ष वयोगटातील मुलींच्या संघाची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या खेळाडूत अंकिता खंडाळकर, ऐश्वर्या जगताप, सायली घोडके, समीक्षा घोडके, स्वराली घोडके, अर्पिता घोडके, प्रज्ञा कोळगे, ऐश्वर्या गायकवाड, अंतरा कांबळे, आरती डावकरे, दीक्षा माने या सर्व खेळाडूंचा मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. फेडरेशन तर्फे राष्ट्रीय स्तरावर निवड चाचणीसाठी आदर्श भांगे या खेळाडूंची निवड झाली आहे. तर राज्यस्तरीय निवड चाचणीसाठी हुसेन तांबोळी, ओम पवार, वेदिका शिंदे, अमृता सूर्यवंशी या चार विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. या सर्व खेळाडूंचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. विभागीय स्तरावर विद्यालयाच्या आनखी दोन संघाची निवड झाली होती. त्यात १९ वर्षीय मुलांचा द्वितीय क्रमांक, १७ वर्षीय मुलींचा द्वितीय क्रमांक आला आहे. याही खेळाडूंचे मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या सर्व यशस्वी खेळाडूंना मार्गदर्शन करणारे मार्गदर्शक क्रीडा शिक्षक प्राचार्य जयप्रकाश कोळगे, प्रा.प्रशांत कोळगे, अश्विनकुमार पवार, प्रा.सुधीर नाईकवाडी यांचाही सत्कार करण्यात आला.

# जिल्ह्यात एकही मंत्रीपद नाही; जिल्ह्याचा विकास खुंटणार

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१७ डिसेंबर -**

मंत्रीमंडळ विस्तारात धाराशिव जिल्ह्याला भोपळा मिळाला असुन भाजपचे आ.राणाजगजितसिंह पाटील आणि शिवसेनेचे आमदार व माजी मंत्री डॉ.तानाजी सावंत या दोघांनाही यावेळी मंत्रीपदाची संधी मिळाली नाही. त्यामुळे जिल्ह्याला आता बाहेरचा पालकमंत्री मिळणार असल्यामुळे जिल्ह्याच्या विकासकामावर याचा परिणाम होवून विकास खुंटण्याची शक्यता आहे.

राज्य मंत्रीमंडळाच्या विस्तारात यावेळी धाराशिव जिल्ह्यातुन महायुतीच्या दोन आमदारांपैकी एकाचीही वर्णी लागली नाही. वास्तविक पाहता यावेळी सलग दुसऱ्यांदा मोठ्या मताधिक्याने तुळजापुर विधानसभा मतदार संघातुन विजयी झालेले भाजपचे आमदार राणा जगजितसिंह पाटील यांची मंत्रीमंडळात वर्णी लागणार असे सर्वांनाच खात्री वाटत होती. कारण येणाऱ्या नगरपालिका, जिल्हा परीषद व पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये भाजपचे प्रामुख्याने महायुतीचा परफॉर्मन्स चांगला राहावा यासाठी आमदार राणा जगजितसिंह पाटील यांची मंत्रीमंडळात वर्णी लागण्याची दाट शक्यता होती.

त्याचबरोबर आमदार राणा जगजितसिंह पाटील हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय असल्याने आमदार पाटील यांची मंत्री म्हणुन निवड निश्चित असल्याचे मानले जात होते. मात्र यामध्ये सर्वांचीच घोर निराशा झाली आहे. महायुतीच्या वरीष्ठ नेत्यांनी धाराशिव जिल्ह्याला मंत्रीपद न देऊन जिल्ह्यावर मोठा अन्याय केला आहे. कांही जिल्ह्यात चार, चार मंत्रीपद देण्यात आले आहे.





बीड जिल्ह्यात तर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे धनंजय मुंडे व भाजपच्या पंकजाताई मुंडे या दोघांचीही राज्य मंत्रीमंडळात वर्णी लागली आहे.

धाराशिव जिल्ह्याला एखादे तरी मंत्रीपद मिळणे आवश्यक होते कारण जिल्ह्यातील आज अनेक विकासाचे प्रश्न मार्गी लागणे बाकी आहेत. त्याचबरोबर तुळजापुर तालुक्यात नळदुर्ग तालुका निर्मितीचा प्रश्न, औद्योगिक वसाहत उभारणीचा प्रश्न, कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पर्यटन आणि रोजगार निर्मितीसाठी २ हजार कोटी रुपयांचा सुधारीत तुळजापुर तीर्थक्षेत्र विकास आराखडा, नळदुर्ग आणि तुळजापुर शहरात उभारण्यात येणारे महापुरुषांची भव्य स्मारके, नळदुर्ग येथे सकरण्यात येणारी राज्यातील पहिली भव्य बसवश्रुष्टी यासह अनेक कामे आज मार्गी लागण्याच्या मार्गांवर आहेत ही कामे पुर्ण होण्यासाठी आमदार राणा जगजितसिंह पाटील यांची मंत्रीपदावर वर्णी लागणे गरजेचे होते. मात्र आता ही संधी हुकली आहे.

तसे पाहता विकास कामांसाठी निधी आनण्यामध्ये आमदार राणा जगजितसिंह पाटील यांचा कुणी हात धरू शकणार नाही असे असले तरी मंत्री असल्यानंतर जी कामे लवकर होतात ती आता होऊ शकणार नाहीत. याची खंत जिल्हावासियांना आहे.


जिल्ह्याचे माजी पालकमंत्री व राज्याचे आरोग्य मंत्री शिवसेनेचे आमदार डॉ. तानाजी सावंत यांचाही ऐनवेळी मंत्री पदातुन पत्ता कट झाला आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अगदी जवळचे म्हणुन डॉ. तानाजी सावंत यांना ओळखले जात होते त्यामुळे शिवसेनेच्या कोट्यातुन डॉ. तानाजी सावंत हे नक्की मंत्री होणार याची शाश्वती होती मात्र तीही आशा आता मावळली आहे.

त्यामुळे धाराशिव जिल्हा आता मंत्र्याविना राहणार आहे. याचा फटका महायुतीला येणाऱ्या नगरपालिका, जिल्हा परीषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत मोठया प्रमाणात बसण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मंत्रीपद न मिळाल्यामुळे शिवसेनेचे डॉ. तानाजी सावंत सध्या प्रचंड नाराज आहेत त्यांची ही नाराजी शिवसेनेला महागात पडु शकते.

भाजपचे आमदार राणा जगजितसिंह पाटील व शिवसेनेचे आमदार डॉ. तानाजी सावंत या दोघांनाही मंत्रीपद न मिळाल्यामुळे जिल्ह्याचा विकास खुंटण्याची शक्यता आहे. या दोन नेत्यांना मंत्रीपद मिळाले नसल्यामुळे आता धाराशिव जिल्ह्याचा पालकमंत्री हा बाहेरचा असणार आहे. याचाही जिल्ह्याच्या विकास कामावर मोठा परीणाम होण्याची शक्यता आहे.

कारण ज्या पोटतीडकीने जिल्ह्यातला आमदार जिल्ह्याचा पालकमंत्री झाल्यानंतर जो जिल्ह्याचा विकास करण्याचा प्रयत्न करतो तसा प्रयत्न बाहेरचा पालकमंत्री करणार नाही. कारण त्यांना या जिल्ह्याशी कांही देणेघेणे नसते हे अनेकदा जिल्ह्याने अनुभवले आहे. त्याचीच आता पुनरावृत्ती होणार असल्याचे दिसुन येत आहे.





## हिवाळ्यात घ्या त्वचेची काळजी



मी गेल्या १८ वर्षांपासून ब्युटी पार्लर या व्यवसायात आहे. त्याचबरोबर सामाजिक क्षेत्रात देखील माझे योगदान असून संघटनामध्ये पदाधिकारी म्हणून देखील काम करते आहे. हिवाळ्यात महिला, मुली व मुलांनी, पुरुषांनी सर्वांनीच आपल्या स्किनची काळजी घ्यायला हवी. हिवाळ्यात त्वचा कोरडी पडते, काळवंडते, निस्तेज होते. त्वचा मऊ चकचकीत होण्यासाठी या गोष्टी नियमित कराव्यात.

* पाणी भरपूर प्यावे. * जास्त गरम पदार्थ खाऊ नयेत.
* साबणा ऐवजी फेसवॉशचा वापर करावा.
* रोज रात्री झोपण्यापूर्वी कोणत्याही चांगल्या कंपनीचे मॉश्चराझर चा वापर करावा.
* त्वचा खूप ड्राय झालेली असेल तर हायड्रेटींग सिरमचा वापर करावा.
* बदाम तेलाचा वापर करून मसाज करावा.
* कोरफडचा ही वापर अंघोळ झाल्यावर करावा.
* दोन चमचे कोरफडचा गर, अर्धा चमचा हळद मिक्स करून चेहरा हात पायांना मसाज करावा किंवा कापसाने लावला तरी चालतो.
* स्किन ग्लो करण्यातसाठी ग्लिसरीन असलेले क्रिम प्रोडक्ट वापरावे.
* थंडीमध्ये ओठ खूप ड्राय पडतात. त्यासाठी पीठी साखर व मध यांच्याने हलक्या हाताने ओठांवर मसाज करावा.
* जास्त उन्हात थांबू नये.



**- माधुरी डहाळे**
माधुरीज् ब्युटी पार्लर, मेकअप आर्टिस्ट
अर्जुन टॉवर, विजापूर रोड

# सकस आहाराचे सेवन करा... त्वचा खुलवा



सोलापूर शहर परिसरात कडाक्याची थंडी पडली असून थंडीमध्ये त्वचा कोरडी पडणे, काळी पडणे अर्थात त्वचेवर टॅन येणे हे प्रकार सर्रास होतात. त्यामुळे थंडीच्या दिवसांमध्ये आपल्या त्वचेची आणि मेकअपची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. त्वचा व्यवस्थित मॉईस्चराईज करणे, तसेच दिवसभर पाणी पिणे, आहाराचे योग्य सेवन करणे याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. त्वचेची निगा राखण्यासाठी आपण अनेक गोष्टी करत असतो. त्यामुळे त्वचेला थंडीच्या दिवसातही पोषण मिळावं आणि त्वचा तजेलदार आणि चमकदार दिसावी यासाठी आपला प्रयत्न चालू असतो. उन्हाळ्याच्या दिवसात चेहऱ्यावर मेकअप राहात नाही आणि थंडीच्या दिवसात मेकअपमुळे त्वचा अधिक कोरडी पडण्याची समस्या असते. आपल्याकडे प्रत्येकाची त्वचा वेगळी असते. त्यामुळे संवेदनशील, कोरडी, कॉम्बिनेशन त्वचा या सगळ्या त्वचेची नक्की कोणत्या प्रकारे थंडीच्या दिवसात काळजी घ्यायला हवी. याच्या काही बेस्ट मेकअप टिप्स सोलापुरातील ब्युटीशियन दिल्या आहेत. शहरातील बहुतांश पार्लमध्ये सध्या ब्राईडसाठी ३० टक्के डिस्काऊंट देत आहेत.

## हिवाळ्यात त्वचेची काळजी घेण्यासाठी घरगुती उपाय



मॉइश्चरायझर वापरा. ज्यामधे शिया बटर, कोकोआ बटर, एलोवरा असलेली क्रीम. मुलायम ओठांसाठी लिप बाम वापरा ज्यामध्ये शिया बटर किंवा कोकोआ बटर आहे. तसेच गोड तेल (गुलाबाच्या पाकळ्यांसह) लावून ओठांना नरम ठेवा. आहारात वीटॅमिन ई आणि सी चे म्हणजेच संत्री, आवळा, बदाम, काजू याचे सेवन करावे.

**ब्राइडल ग्लोसाठी**

हळद, दही, आणि मध यांचे मिश्रण चेहऱ्यावर लावून १५ मिनिटे ठेवा. नंतर धुवा. केशर दुधात भिजवून चेहऱ्यावर लावा. मध आणि लिंबू त्वचेला नजेलदार ठेवण्यासाठी हा उपाय प्रभाती आहे. व्हिटॅमिन सी बेस्क सीरंग लावा. रात्री हलका मॉइश्चरायझर आणि एंटी-एजिंग क्रीम वापरा. वधूच्या त्वचेसाठी लग्नाच्या आधी एक महिना प्री- ब्राइडल स्किन केअर ट्रीटमेंट घ्या. त्वचेवर कोणतेही नवीन उत्पादन वापरण्यापूर्वी त्याची चाचणी करा. अधिक मेकअप टाळा आणि त्वचेचा नैसर्गिक तजेला टिकवून ठेवा.



**- पद्मावती राऊत,**
हेअर स्पा ॲण्ड मेकअप आर्टिस्ट
रूपम ब्युटी लेडीज पार्लर
मंत्री चंडक विहार, होटगी रोड, बालाजी सरोवर .

# हिवाळी लग्नसराई; नववधूंसाठी सेलिब्रिटी ब्रायडल मेकअप



### हिवाळ्यात मेकअपचे महत्त्व

हिवाळ्यामध्ये त्वचा अधिक कोरडी होते. त्यामुळे तुम्ही तुमची त्वचा मॉईस्चराईज करणे गरजेचे आहे. मेकअपमुळे तुमच्या चेहऱ्यावरील कोरडेपणा दूर व्हायला मदत होते. तसेच तुम्ही आठवड्यातून किमान दोन वेळा तरी तुमचा चेहरा स्क्रब करणे आवश्यक आहे. ज्यामुळे तुमच्या चेहऱ्यावरील चमकदारपणा टिकून राहण्यास मदत होते. तुमची त्वचा अधिक मऊ आणि मुलायम करण्यासाठी तुम्ही हिवाळ्यात तुमच्या त्वचेला सूट होईल असा मेकअप करायला हवा. अर्थात त्यासाठी तुम्हाला हेव्ही मेकअप करायची अजिबातच गरज नाही. तुम्ही अगदी नियमित त्वचा मॉईस्चराईज करून लिप बाम लावलात तरीही तुमची त्वचा तजेलदार राहण्यास नक्कीच मदत होते.

हिवाळी लग्नसराई सुरू झाली आहे. वधूला नटवण्यासाठी लग्नात मोठा तामझाम असतो. तिचे सौंदर्य खुलवण्यासाठी प्री-वेडिंग फोटोशूट अगोदरपासूनच तयारी सुरू होते. पूर्वी केवळ पार्लरला जाऊन आले की झाले असे होत होते. पण आता मेकअप ही हायक्लास झाला आहे. मेकअप आर्टिस्ट आता स्वत: नवरीला सजवत आहेत. आता लग्नाचा ट्रेंड बदलत आहे. त्याप्रमाणे मेकअप सुद्धा बदलत आहे. बॉलिवूड, हॉलिवूड पद्धतीने मेकअपचा नवीन ट्रेंड येत आहे. सर्वात लोकप्रिय वधू मेकअप आणि केसांचे ट्रेंडची मागणी ग्राहक करत आहेत.

### कर्टन बँग्स

या हंगामात लग्नाच्या केसांचा सर्वात लोकप्रिय ट्रेंड म्हणजे कर्टेन बँग्स. तो म्हणतो, कर्टेन बँग्स ही हृदयाच्या आकाराच्या चेहऱ्यासाठी किंवा अंडाकृती चेहऱ्याच्या नववधूंसाठी योग्य हेअरस्टाईल आहे. याशिवाय वधूने आपल्या त्वचेची निगा आणि केसांची काळजी घ्यावी. यासाठी चांगला आहार घ्या आणि झोपही घ्यावी असेही सोलापुरातील मेकअप आर्टिस्ट नी सांगितले.

### ग्राफिक लाइनर आणि ग्लिटरी शेड

या मोसमात हिवाळ्यातील नववधूंसाठी ठळक आणि तेजस्वी डोळ्यांच्या मेकअपसह लूक प्ले केला जाऊ शकतो. 'गो बिग अँड गो होम' हा या मोसमातील सौंदर्य मंत्र आहे. दोलायम ान रंग, ग्राफिक लाइनर. याशिवाय मेकअप कमीत कमी आणि न्यूट्रल ठेवून लूक संतुलित करा.

### रेड लीपस्टीकचा ट्रेंड जास्त

या हिवाळ्यात क्लासिक लिप रेड हा परफेक्ट ब्राइडल मेकअप ट्रेंड जास्त आहे. रेड शेड एव्हरग्रीन असल्याने तुमचा लुकही बदलेल. लाल रंगाव्यतिरिक्त, तुम्ही स्टोनी गार्नेट, मॅट कार्माइन आणि कोरल सारख्या शेड्सनाही जागा द्यावी.

### अंबाडा

हेअरस्टाईलबद्दल बोलायचे तर, अंबाडा या लग्नाच्या सीझनमध्ये एक क्लासिक लूक देईल , जो वेगळा लूक देण्यासाठी सज्ज आहे. यावेळी अंबाडा असलेला ऑफ शोल्डर ड्रेस किंवा ब्लाउज वापरून पहा. आपण खांद्यावर ग्लिटर वापरू शकता.

संकलन - **आरती कुसेकर**

## असे करा... केसाचे सौंदर्य वाढवा



केससंभारामुळे महिलांच्या सौंदर्यामध्ये भर पडते. केसांना आपल्या हव्या तशा पद्धतीने आकार देऊन त्याचा रुबाब वाढवता येतो. यासाठी अनेक आर्टिस्ट काम करतात. घरीसुद्धा आपण केसांचे सौंदर्य खुलवू आणि फुलवू शकतो. त्यासाठी विविध कौशल्याचा वापर करावा लागेल.

* **केसांचे आरोग्य:** हेअर स्पा केसांना मुळापासून टोकापर्यंत पोषण देऊ शकते, जे नुकसान, पातळ होणे आणि केस गळणे टाळण्यास मदत करू शकते. ते खराब झालेले केस दुरुस्त करण्यात, हरवलेला ओलावा आणि पोषक तत्वे पुन्हा भरून काढण्यात आणि स्टाइलिंग, रंग आणि रासायनिक नुकसानापासून पुनर्प्राप्त करण्यात मदत करू शकतात.
* **स्कॅल्पचे आरोग्य :** हेअर स्पा निरोगी केसांची वाढ सुलभ करण्यासाठी छिद्रे बंद करण्यात मदत करू शकतात. ते तुमच्या टाळूवरील नैसर्गिक तेलांचे प्रमाण नियंत्रित करण्यात देखील मदत करू शकतात, ज्यामुळे तुमचे केस मऊ, गुळगुळीत आणि पोषणयुक्त दिसू शकतात.
* **तणावमुक्ती :** टाळूवर मालिश केल्याने तुमचे शरीर आणि मन आराम होऊ शकते.
* **केसांचा पोत:** हेअर स्पा केसांचा पोत सुधारू शकतो, ते मऊ आणि नितळ बनवू शकतो.
* **कोंडा कमी करणे :** हेअर स्पा तुमच्या टाळू आणि केसांमधील फ्लेक्स काढून कोंडा कमी करण्यात मदत करू शकतात.
* **स्प्लिट एंड्स :** हेअर स्पा सुकलेल्या स्ट्रेंड्सवर उपचार करून स्प्लिट एंड्स कमी करण्यात मदत करू शकतात स्नेहा गायकवाड



**- स्नेहा गायकवाड**
- मेकअप आर्टिस्ट, एसजी ब्युटी केअर आणि सलोन
अमोल नगर, रामवाडी हॉस्पिटल जवळ.

## ● थंडीत चेहऱ्याला काय लावावे

**पेट्रोलियम जेलीमध्ये अधिक प्रमाणात तेल असतं. त्यामुळे तेलकट त्वचा असणाऱ्यांनी चेहऱ्याला अथवा ओठांना पेट्रोलियम जेली हिवाळ्यात लावणे टाळा. तुमचे ओठ ओलसर ठेवण्यासाठी अर्थात कोरडे न पडू देण्यासाठी तुम्ही हर्बल लिप बाम्सचा अथवा मेडिकेटेड लिप बाम्सचा वापर करा. त्यामुळे तुमचे ओठ कोरडेदेखील पडणार नाहीत आणि काळे देखील पडणार नाहीत.**

## ● फाऊंडेशनपूर्वी वापरा टोनर

**तुमची त्वचा मऊ आणि चांगली राहण्यासाठी मेकअप करताना फाऊंडेशनपूर्वी टोनर लावायला विसरू नका. टोनर तुमच्या त्वचेवरील कोरडेपणा कमी करण्यास फायदेशीर ठरतो. तर फाऊंडेशन तुमच्या त्वचेला अधिक कोरडं करतं. त्यामुळे त्वचा टोन करून मगच तुम्ही मेकअपसाठी फाऊंडेशनचा वापर करा. त्याने त्वचा अधिक चांगली राहण्यास मदत होते.**

## ● पावडरऐवजी वापरा क्रिम

**हिवाळ्यात त्वचा कोरडी राहिल्याने कोरड्या त्वचेच्या व्यक्तींच्या चेहऱ्यावर पाडवर लावल्यास, ती फुटते. त्यामुळे चेहरा अधिक खराब दिसतो. त्यामुळे तुम्ही त्वचेवर हिवाळ्याच्या दिवसात पावडरऐवजी सहसा क्रिमचा वापर केल्यास, चेहरा अधिक तजेलदार दिसण्यासाठी मदत मिळते.**

## ● चेहरा नीट क्लिंन्झ करा

**हिवाळा असो अथवा कोणताही ऋतू असू दे तुम्हाला तुमचा चेहरा व्यवस्थित क्लिंन्झ करणं गरजेचं आहे. यामध्ये इतकी माती अथवा प्रदूषणाने धूळ साचते की, तुम्हाला वेळोवेळी चेहऱ्याची काळजी घेण्यासाठी चेहरा नीट क्लिंन्झ करायला हवा. त्यासाठी तुम्ही चांगल्या कंपनीचं क्लिन्झर वापरा.**

## ● पाणी जास्त प्या

**उन्हाळ्यातच पाणी प्यायचं आणि हिवाळ्यात प्यायचं नाही असं अनेकांना वाटतं. हिवाळ्यात जरी तहान जास्त लागत नसली तरीही शरीराला तितक्याच पाण्याची आवश्यकता असते हे लक्षात ठेवा. त्यामुळे स्वत:ला हायड्रेट ठेवण्यासाठी हिवाळ्यातही तुम्ही किमान तुमच्या शरीराला आवश्यक असेल तितकं आठ ग्लास पाणी पिण्याची गरज आहे. पाणी जास्त प्यायल्याने त्वचा कोरडी पडत नाही. तुमच्या शरीराला आवश्यक ते पोषण मिळून त्वचा तजेलदार राहण्यास मदत होते.**

# थंडीमध्ये केसांची योग्य काळजी घेणे आवश्यक


केस गळणे ही अनेकांमध्ये आढळणारी समस्या आहे. केस अनेक कारणांनी गळू शकतात. काही पोषक तत्वांच्या कमतरतेमुळे केस गळू शकतात, तसेच हार्मोन्सच्या असंतुलनामुळे ही केस गळतात. अनुवंशिक कारणांमुळे तसेच काही जनुकीय घटकांमधील बदलांमुळेही केस गळण्याची समस्या उद्भवते. मानसिक ताणामुळे केस गळतात. तसेच ज्या केशरचनांमध्ये केस ओढले जातात अथवा त्यांच्यावर ताण पडतो, अशा केशरचना वारंवार केल्यास केस गळू शकतात. केसांवर लावण्यासाठी रासायनिक पदार्थांचा अती वापर केल्यास केस गळू लागतात. केस गळणे हा एखादे औषध किंवा उपचार पद्धतीचा परिणाम देखील असू शकतो. वातावरणातील बदल, जसेकी ऋतू आणि त्यानुसार बदलणारे तापमान आणि हवेतील आर्द्रता ह्यांचाही केसांवर परिणाम होत असतो आणि प्रदूषणाचाही केसांवर विपरीत परिणाम होतो, ज्यामुळे केस गळू शकतात. तापमान कमी झाल्याने आणि हवेतील आर्द्रता कमी झाल्याने, हिवाळ्यात केस गळण्याची समस्या अनेकांमध्ये उद्भवते. हिवाळ्यात डोक्यावरची त्वचा कोरडी पडते, तिथल्या त्वचेला खाज येते, कोंडा होतो आणि अशा समस्यांची परिणती, केस गळण्यात होते. म्हणूनच थंडीमध्ये केसांची व त्वचेची योग्य काळजी घेणे अधिक महत्वाचे ठरते.



## हेड मसाजने रक्तदाबाची पातळी नियंत्रित




उच्च रक्तदाब सारख्या परिस्थितीमुळे आरोग्यास गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. दररोज मसाज हा उच्च रक्तदाब शांत करण्यास एक चांगला मार्ग आहे. हेड मसाज केल्याने मन शांत होते व आपल्या रक्तदाबाची पातळी देखील नियंत्रण होते स्मरणशक्ती वाढते, हेड मसाज केल्याने आपली एकग्रता पातळी मोठ्या प्रमाणात सुधारण्यास मदत होते. हेड मसाजमुळे स्मरणशक्ती वाढते आणि मेंदूचे एकूण कार्य सुधारते असे म्हटले जाते डोक्याची मालिश केल्याने रक्तप्रवाह वाढण्यास मदत होते. तणाव कमी होतो. रोजचा हेड मसाज मानसिक आरोग्य वाढण्यास मदत करते दुसऱ्याने हेड मसाज करून दिल्यास आपल्याला आराम वाटतो आणि तणाव कमी होतो.



**- सरस्वती प्रबाळकर**
तृप्ती ब्युटी पार्लर,
अरुणा अपारमेंट श्री खंडोबा मंदिर जवळ
खडक गल्ली सोलापूर बाळे

# माळेगाव यात्रेस २९ डिसेंबर पासून सुरुवात : मिनल करनवाल



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १७ डिसेंबर**

दक्षिण भारतात प्रसिध्द असलेल्या माळेगाव यात्रेची सुरुवात दि.२९ डिसेंबर रोजी होणार असून, यासाठी विविध समित्या गठीत करण्यात आल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी पत्रकार परिषदेत दिली.

दि.२९ डिसेंबर रोजी देवस्वारीने माळेगाव यात्रेची सुरुवात होणार आहे. दि.३० डिसेंबर रोजी अश्व, श्वान आदी पशु प्रदर्शन तसेच यावर्षी महिला आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले आहे. दि.३१ डिसेंबर रोजी कुस्ती दंगल, दि.१ जानेवारी रोजी शंकरपट, लोक कला महोत्सव तर दि.२ जानेवारी रोजी बक्षीस वितरण व लावणी महोत्सव होणार आहे. माळेगाव यात्रा पाच दिवस चालणार असून, यासाठी भोजन, पाणी पुरवठा, आरोग्य आदीसह अनेक समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. यावर्षी विशेष म्हणजे येणाऱ्या यात्रेकरुंना सुविधा व्हावी यासाठी माळेगाव येथील विश्रामगृह ते बायपास जोडणारा रस्ता तयार करण्यात आला आहे.

घोड्यांसाठी कच्चे रस्ते तयार करण्यात आले आहेत. पाईपलाईनच्या गळतीची दुरुस्ती करण्यात आली आहे. त्याचबरोबर नविन पाईपलाईनचे देखील काम करण्यात आले आहे. याठिकाणी असलेल्या तलावाच्या पायऱ्याजवळ पालखी ठेवण्यासाठी ओटा देखील तयार करण्यात आला आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधीत रहावी यासाठी सीसीटीव्ही कॅमेर्यात वाढ तसेच स्पिकर व्यवस्था करण्यात आली आहे. आरोग्य समिती मार्फत बाईक अंबुलन्स तसेच पोलीस ठाण्यात देखील वैद्यकीय पथक तैनात करण्यात येणार आहे. माळेगाव यात्रा प्लास्टिक मुक्त व्हावी यासाठी जिल्हा परिषद प्रयत्नशिल असून, कचराकुंड्यामध्ये वाढ तसेच कापडी पिशव्यांचा देखील स्टॉल लावण्यात येणार आहे. टँकर व्यवस्था, अग्निशमन व्यवस्था करण्यात आली असून, यात्रा परिसरात गर्दी होवू नये यासाठी हॉटेलसाठी विशेष मैदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे. माळेगाव यात्रा परिसरात आठ शौचालय बांधून पूर्ण झाले आहेत. तर आठ फिरते शौचालय देखील ठेवण्यात आले असल्याचे यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेला जिल्हा परिषदेचे सर्व अधिकारी उपस्थित होते.

# सहा वर्षांपासून राष्ट्रीय महामार्ग अर्धवट, धुळीने वाहनधारक त्रस्त

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. १७ डिसेंबर**

हिमायतनगर पासून विदर्भातील महागाव तालुक्याच्या धनोडा पर्यंतच्या राष्ट्रीय महामार्ग १६१ ए चे मागिल सात वर्षापासून काम चालू आहे. किनवट शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकापासून गोकुंदा शहरातील सेंटमेरी शाळेपर्यंत मार्ग या ना त्या कारणांनी काम रेंगाळत ठेवले आहे. कार्यारंभ आदेशानंतरही अद्यापतरी सात वर्षात काम चालू केलेले नाही. ना खराब झालेल्या मार्गाचे डांबरीकरणही केलेले नाही. या दोन्ही ठिकाणी हॉटमिक्स डांबरीकरण करुन धूळीपासून नागरीकांना दिलासा देण्याची मागणी, व्हॉईस ऑफ मीडियाच्या किनवट शाखेने किनवटच्या सहायक जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. गोकुंद्यातील सेंट मेरी शाळेपासून



किनवट-गोकुंद्याच्या सरहद्दीपर्यंत आणि किनवट शहरातील अशोक स्तंभापासून ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंतच्या सीसीकरणाचे काम केलेले नसल्यामुळे लहान वाहानांपासून अवजड वाहानांच्या दळण-वळणांमुळे रात्रं-दिवस प्रचंड धूळ उडते. पर्यावरणाची वाताहत, प्रदूषन भयानक वाढले आहे. धूळीमुळे लोकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. कांहींना श्वसनाचे आणि डोळ्यात धूळ जाऊन आजार झाल्याचे समजते, याला कोणी वाली आहे कि नाही ? असा सवालही व्हॉईस ऑफ मीडियाने व्यक्त केला आहे.

महाराष्ट्र राज्याच्या शेवटच्या टोकाला आदिवासी, मागास तालुका हा किनवट तालुका आहे. सर्वच संबंधित विभागाचे या प्रदूषनाकडे दूर्लक्ष होतांना दिसते. प्रशासनातील अधिकाऱ्यांनी त्यांच्या गाडीच्या काचा खाली घेऊन प्रवास केल्यास धूळीमुळे आम नागरीकांना काय त्रास होतो याची जाणीव होईल. पर्यावरणाचा कसा ऱ्हास होतोय याची त्यांना कल्पना येईल. म्हणून हा रेंगाळत ठेवलेला मार्ग हॉटमिक्स डांबरीकरण करण्यात यावे. जसे, राजगड-लोणी घाटात सीसीकरण न करता डांबरीकरण केलेले आहे तसे. तेच निकष वापरुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर ते सेंटमेरी शाळेपर्यंत डांबरीकरण करुन प्रदुषणमुक्त मार्ग करावा, यासाठी आपल्या स्तरावरुन तात्काळ कार्यवाही करावी, अशी लोकहितास्तव व्हॉईस आँफ मीडिया किनवट तालुका शाखेने मागणी केली आहे.

# चित्रपट अभिनय प्रशिक्षण अभ्यासक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १७ डिसेंबर**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील ललित व प्रयोगजीवी कला संकुल आणि फिल्म अॅन्ड टेलिव्हीजन इन्स्टिट्युट ऑफ इंडिया, पुणे (ऋढखख) यांच्या संयुक्त विद्यमाने दि.६ जानेवारी ते २८ मार्च २०२५ या कालावधीत तीन महिन्याच्या 'चित्रपट अभिनय प्रशिक्षण' अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

फिल्म अॅन्ड टेलिव्हीजन इंन्स्टिट्युट ऑफ इंडिया या चित्रपट निर्मीतीचे प्रशिक्षण देणा-या जागतिक पातळीवरील संस्थेशी विद्यापीठाने सामंजस्य करार केल्यानंतर चित्रपट निर्मीतीसंबंधी विविध विषयावर यापुर्वी जवळपास सहा अभ्यासक्रमाचे यशस्वी आयोजन केले आहे. याचा फायदा नांदेडसह मराठवाडा व परराज्यातील कलावंतांनाही झाला आहे.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठातील ललित व प्रयोगजीवी कला संकुलाच्या नाट्य व चित्रपट विभागाने दि. २२ जुलै ते १२ ऑक्टोबर २०२४ या दरम्यान तीन महिने कालावधीच्या चित्रपट अभिनय अभ्यासक्रमाचे आयोजन केले होते. या अभ्यासक्रमात महाराष्ट्रातील पुणे-मुंबई, उत्तराखंड, बिहार, उत्तर प्रदेश, कर्नाटक, दिल्ली आदी परराज्यातील विद्यार्थी कलावंतांनी 'स्वारातीम' विद्यापीठात राहून अभिनयाचे धडे गिरवले होते. मागील अभ्यासक्रमाचा प्रतिसाद पाहता कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या सूचनेनुसार दुस-यांदा तीन महिने कालावधीच्या चित्रपट अभिनय अभ्यासक्रमाचे आयोजन केले असून, आता चित्रपट अभिनय शिकण्याकरीता पुण्या-मुंबईला न जाता नांदेड येथेच देशभरातील विद्यार्थ्यांसह व जागतिक दर्जाच्या फिल्म इंन्स्टिट्युटच्या तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली शिकण्याची संधी विद्यापीठाने उपलब्ध करुन दिली आहे. चित्रपट अभिनयाचे बारकावे शिकण्याची व त्यात करीअर करण्याची इच्छा असणाऱ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे संकुलाचाचे संचालक डॉ. पृथ्वीराज तौर यांनी कळविले आहे.

# गीता अध्याय पाठांतर स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १७ डिसेंबर**

नांदेड येथील श्री दासगणू संत भक्त मंडळाच्या वतीने सोमवार, दि. १६ रोजी सायंकाळी ४ वाजता कुसुम सभागृह येथे शालेय विद्यार्थ्यांची गीतेचा नववा अध्याय पाठांतर स्पर्धा होणार होती. पण नांदेड बंदमुळे गुरुवार, दि. १९ डिसेंबर रोजी दुपारी ४ ते ५ या वेळेत होणार आहे, असे समन्वयक प्रा. प्रदीप वेसणेकर यांनी स्पष्ट केले. यंदाच्या वर्षी चौदा शाळांचे इयत्ता आठवी ते दहावीचे सुमारे दोनशे विद्यार्थी-विद्यार्थिनी भाग घेणार आहेत. गीतेच्या नवव्या अध्यायाचे पाठांतर, श्रीमद् भगवतगीता व व्यक्तिमत्त्व विकास या विषयावर व्याख्यान आणि गीतेच्या संदर्भात चित्रफित दाखवणे हे कार्यक्रम कुसुम सभागृह येथे दि. १९ रोजी सायंकाळी चार ते सात या वेळेत होणार आहेत. या पाठांतर स्पर्धेसाठी तीन हजार, दोन हजार, एक हजार आणि उत्तेजनार्थ एक हजार अशी बक्षिसे दिली जाणार आहेत. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून एसजीजीएसचे संचालक डॉ. मनेश बी. कोकरे आहेत. सायन्स कॉलेज माजी प्राचार्य डॉ. डी. यू. गवई, प्रभारी प्राचार्य डॉ. लक्ष्मण शिंदे यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

## संक्षिप्त वृत्त

### नागपूर, ग्वाल्हेर, हनुमानगढ, वडोदरा विद्यापीठ साखळी फेरीत

**नांदेड**-गेल्या चार दिवसापासून सुरू असलेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ व्हॉलीबॉल स्पर्धेत पात्रता फेरीसाठी झालेले चारही सामने तुल्यबळ झाले. या सामन्यात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर, एलएनआयपी विद्यापीठ ग्वाल्हेर, श्री. के.डी. विद्यापीठ हनुमानगड व पारुल विद्यापीठ वडोदरा संघाने प्रतिस्पर्धावर मात करीत साखळी फेरीत दिमाखात प्रवेश केला आहे. यजमान नांदेड विद्यापीठ संघाला मात्र पराभवाची चव चाखावी लागली. उपांत्यपूर्व पहिल्या सामन्यात वडोदऱ्याच्या पारुल विद्यापीठाने भारती विद्यापीठ पुण्याचा अटीतटीच्या लढतीत ३-२ असा प्राभाव केला. दुसऱ्या सामन्यात हनुमानगढच्या श्री. के.डी. विद्यापीठाने यजमान नांदेड विद्यापीठ संघाचा २५-१९, २५-१८, २६-२४ असा पराभव केला. तर गतविजेत्या एल.एन.आय.पी. विद्यापीठ ग्वाल्हेर संघाने अहमदाबादच्या लोकजागृती विद्यापीठाचा ३-१ असा उत्कंठावर्धक सामन्यात पराभव केला. चौथ्या सामन्यात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने मुंबई विद्यापीठाचा ३-२ असा पराभव करीत साखळी फेरीत प्रवेश निश्चित केला आहे.



**नांदेड-देशाच्या विविध राज्यात स्वच्छ भारत मिशन व राष्ट्रीय जलजीवन मिशन या कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय प्रशिक्षक प्रशिक्षक म्हणून गावो-गावी विविध राज्यात जनजागृति करणाऱ्या किशोर वागदरीकर यांच्या कार्याची दखल घेत जिल्हाधिकारी अभिजित राऊत व निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी शासकीय विश्रामगृहात जिल्हा प्रशासनाच्यावतीने आयोजित कार्यक्रमात त्यांचा सन्मान केला.**

# 'देश का पृकृती परिक्षण' अभियानात सहभागी व्हावे : डॉ उज्ज्वला पवार

**तभा वृत्तसेवा**
**अर्धापूर,दि. १७ डिसेंबर**

अर्धापूर ता मनुष्याची प्रकृती वात पित्त कफ या त्रीदोषांवर आधारित आहे.आयुर्वेदात आहार, विहार, जीवन शैली, उपचार यांना विशेष महत्त्व आहे.आयुष मंत्रालयाच्या व भारतीय चिकित्सा पद्धती राष्ट्रीय आयोगाच्या वतीने देशभरात देश का पृकृती प्रशिक्षण अभियान राबविण्यात येत आहे.या अभियानात नागरिकांनी ऐप डाऊनलोड करून घ्यावी असे आवाहन डॉ उज्ज्वला पवार यांनी मंगळवारी (ता १७) केले आहे. शहरातील शाळा महाविद्यालय व शासकीय कार्यालयात जाऊन शासकीय आयुर्वेद महाविद्यालय नांदेडच्या विद्यार्थ्यांनी जनजागृती केली.तसेच देश का पृकृती प्रशिक्षण अभियान ही ऐप डाऊनलोड केली.

भारतीय जीवन पध्दतीत आयुर्वेदाला विशेष महत्त्व आहे.या चिकित्सा पद्धतीचा आधिका अधिक फायदा नागरिकांना व्हावा यासाठी देशभरात प्रकृती परिक्षण अभियान राबविण्यात येत आहे.या अभियानात देशातील आयुर्वेद महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, डॉक्टर, वैद्यकीय अधिकारी सहभागी झाले आहेत.नांदेड जिल्ह्यात हे अभियान राबविण्यात येत असून नागरिकांच्या प्रकृती विषयी माहिती ऐप मध्ये संकलीत करण्यात येत आहे.

अर्धापूर शहरातील पत्रकार, पोलिस ठाणे, नगरपंचायत, शंकरराव चव्हाण महाविद्यालयात,तहसील कार्यालय, पंचायत समिती, व्यापारी प्रतिष्ठान आदी ठिकाणी भेटी देऊन या अभियानाविषयी माहिती देण्यात आली.या अभियानात आयुर्वेद महाव्द्यिालयाचे रोगनिदान विभागातील विभाग प्रमुख डॉक्टर उज्वला पवार, सहाय्यक प्राध्यापक डॉक्टर हेमंत पंचडे, पदव्युत्तर विद्यार्थी डॉ. राम काळबांडे, डॉ. सौरभ पवार, डॉ. पल्लवी दुधाटे, डॉ. प्रतिक्षा धुळे व पदवी विद्यार्थी अनामिका सिंह, आईशा सेंट, निखिल कुमार, सूर्यांग प्रताप सिंग, नंदिनी कुमारी, अनिकेत पटेल, कोमल जायभाये , ध्वनी गौड, अस्मिता मोतेवार, जवेरिया तहसीन, दिनेश जगताप, विजय उत्तमपल्ले , साईप्रसाद आदि व कर्मचाऱ्यांचे प्रकृती परीक्षण करण्यात येऊन ती माहिती आयुष मंत्रालयाच्या अॅपवर संकलित करण्यात आली. शंकरराव चव्हाण कॉलेजचे प्राचार्य डॉ.जे.सी. पठाण, रघुनाथ शेटे , प्रा काजी, शासकीय आयुर्वेद महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. वाय. आर. पाटील यांनी सहभाग घेतला. आयुष्य मंत्रालयाचा एक महत्त्वाचे अभियान राबविण्यात येत आहे.या अभियानाच्या माध्यमातून आरोग्य विषयक धोरण ठरविण्यासाठी मदत होणार आहे.आपल्या प्रकृती विषयक आवश्यक ती माहिती देण्यात येणार आहे.तसेच माहिती संकलित झाल्यावर ऑनलाईन पध्दतीने प्रमाणपत्र मिळणार आहे. नागरीकांनी विद्यार्थ्यांना सहकार्य करावे असे आवाहन डॉ उज्ज्वला पवार यांनी केले आहे.

# एरियस व राहणीमान भत्ता देण्यास प्रशासनाची टाळाटाळ

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. १७ डिसेंबर**

मुदखेड तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतचे कर्मचारी यांना थकित व एरियस रक्कम व राहणीमान भत्ता व विशेष भत्ता मिळाला नाही म्हणून तालुक्यातील ग्रामपंचायत कर्मचारी दि.१६ डिसेंबर पासून बेमुदत धरणे आंदोलनास मुदखेड पंचायत समिती समोर बसले आहेत. तालुक्यातील ग्रामपंचायत कर्मचारी यांचा एरियस व राहणीमान भत्ता अदा करण्यात आला नसल्याने कर्मचाऱ्यांना उपासमारीची वेळ आली आहे. मुदखेड तालुक्यासाठी ४० लाख ६५ हजार रुपये ८३ कर्मचाऱ्यांसाठी आलेली होती एरियस रक्कम नऊ महिन्याची



पंचायत समितीला रक्कम प्राप्त झालेली आहे परंतु पंचायत समितीने निव्वळ भेदभाव करून कर्मचाऱ्यांना नियमाप्रमाणे रक्कम अदा न करता पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांनी मनमानी रक्कम अदा केली आहे तरी आमची रक्कम प्रत्येक कर्मचाऱ्यांना जवळपास ५३ हजार रुपये रक्कम मिळायला पाहिजे होती परंतु पंचायत समितीने काही कर्मचाऱ्यांस रक्कम कमी मिळालेली आहे. पंचायत समितीकडुन ग्रामपंचायत कर्मचारी यांना शासन नियमाप्रमाणे रक्कम नऊ महिन्याची मिळाली पाहिजे होती परंतु पंचायत समितीने त्यांच्या मनमानी कारभारामुळे कंटाळून आज ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना रक्कम अदा होणार नाही तोपर्यंत धरणे आंदोलन मागे घेणार नाही असे कर्मचाऱ्यांनी सांगितले होते. पण गटविकास अधिकारी यांच्या मध्यस्थीने ग्राम पंचायत कार्मचऱ्यांचे धरणे आंदोलन मागे घेतले आहे. यावेळी ग्राम पंचायत कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष मारोती चव्हाण, तालुकाध्यक्ष बाबाराव जाधव, परसराम पुंडे, प्रभाकर सावंत, राजु देशमुख, यासह आदि ग्राम पंचायत कर्मचारी यांची उपस्थिती हाती.

# शिरड येथिल अंगणवाडीमध्ये निकृष्ट पोषण आहार

**तभा वृत्तसेवा**
**निवघा(बा),दि. १७ डिसेंबर**

हादगाव तालुक्यातील शिरड येथे मिळत आहे बालकांना किड्यांचा पोषण आहार मिळत असून अंगणवाडी सेविकेचा मनमानी कारभार झालेला आहे.

अंगणवाडीमध्ये फिल्टर पाणी नाही. बालकांना या निकृष्ट पोषण आहारामुळे आजार होण्याची शक्यता वाढली आहे. हा निकृष्ठ आहार वाटप होत असताना पुरवठा विभाग याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे पाहावयास मिळत आहे. पोषण आहार हा बाळांना त्यांचे योग्य वयात पोषण मिळवण्यासाठी शासनाकडून पोषण आहार किट वाटप केले जाते. पोषण आहारात विविध प्रकारचे पोषण देणारे धान्य कडधान्य वितरित केले जाते.

अंगणवाडी सेविका, कर्मचारी सुद्धा शासनाकडून येत असलेल्या पोषण आहार निकृष्ट दर्जाचा वाटप करीत असल्याचे पहावयास मिळत आहे. अंगणवाडी पर्यवेक्षिका वानखेडे यांनी योग्य ती कारवाई करण्याची मागणी जनतेतून होत आहे.

# परभणी येथील घटनेच्या निषेधार्थ माहूर बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**माहूर दि.१७ डिसेंबर**

परभणीयेथीलघटनेतपोलिसांनी केलेल्या मारहाणीत न्यायालयीन कोठडीत सोमनाथ सूर्यवंशी या बहुजन आंबेडकरी तरुणाचा मृत्यू झाला.संविधानाच्या रक्षणार्थ तो शहीद झाला असून,सदरचा मृत्यू संशयास्पद असल्याचा आरोप करत या घटनेचा तिव्र निषेध करत आंबेडकरी व संविधानाप्रती आदर असणाऱ्या जनतेच्या वतीने आज मंगळवार दि.१७ रोजी माहूर बंदची हाक दिली होती.या बंदला माहूर येथील व्यापाऱ्यांच्या वतीने उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याने बंद १०० % यशस्वी झाला.



यावेळी शहरातील डॉ. बाबसाहेब आंबेडकर चौक येथे संविधानवादी व लोकशाहीवादी नागरिक एकत्र येऊन शहीद सोमनाथ सूर्यवंशी यास श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.आंदोलकांवरील सर्व गुन्हे मागे घ्यावे. अटकेतील सर्व आंदोलकांची सुटका करावी व अमानुष अत्याचार करणाऱ्या पोलिसांवर कारवाई करावी, एक कोटी रुपये मदत देवुन शहीद सोमनाथ व्यंकट सूर्यवंशी यांच्या कुटुंबाचे पुनर्वसन करावे. सोमनाथ च्या कुटुंबातील एका व्यक्तीला सरकारी नौकरी द्यावी. अशा मागण्याचे निवेदन तहसीलदार व पोलीस निरीक्षक यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांना सादर करण्यात आले. यावेळी तहसीलदार किशोर यादव यांनी आंदोलनकर्त्यांचे निवेदन स्वीकारले.

याप्रसंगी प्रकाश गायकवाड, डॉ.निरंजन केशवे, जयकुमार अडकीने, रफिक भाई, मनोज कीर्तने, विजय भगत, विशाल खरे, धीरज शेंडे, विनोद खुपसे, संजय बनसोडे, कॉ. किशोर पवार, सिद्धार्थ तामगाडगे, ज्ञानेश्वर गुजलवार यांनी आंदोलन कर्त्यांच्या मागण्याबाबत मनोगत व्यक्त केले. निवेदनावर गोविंदराव मगरे, रेणुकादास वानखेडे, अमृत जगताप, महेंद्र वाघमारे, रणधीर पाटील, आकाश कांबळे, विक्रम राठोड, प्रमोद राठोड, राजू सौंदलकर, दीपक कांबळे, प्रमोद जमदाडे, अनिल माडपेलीवार, प्रवीण बरडे, शंकर भालेराव आदीसह तालुकाभरातील संविधानप्रेमी व लोकशाही वादी नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. दरम्यान, कोणत्याही प्रकारची अनुचीत घटना घडू नये म्हणून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शिवप्रकाश मुळे, तथा स.पो.नि. रमेश जाधवर यांनी पोलीस उपनिरीक्षक पालसिंग ब्राम्हण, गंगाधर खामनकर, गजानन जाधव व सहकारी पोलिस कर्मचाऱ्यांसह चोख बंदोबस्त ठेवल्याने बंद शांततेत संपन्न झाला.

# हदगाव शिवसेना तालुकाप्रमुख पदासाठी आबा वानखेडे यांचे नाव जवळपास निश्चित

**तभा वृत्तसेवा**
**निवघा (बा),दि. १६ डिसेंबर**

नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत शिवसेनेचे उमेदवार बाबुराव कदम कोहळीकर भरघोस मताधिक्य घेऊन निवडून आल्यानंतर हदगाव व हिमायतनगर या दोन्ही तालुक्यातील गावोगावी त्यांचे सत्कार संमारंभ चालु असतांना हदगाव तालुक्याचे शिवसेना तालुकाध्यक्ष विवेक देशमुख यांच्या यशस्वी कारकीर्दिची दखल घेत एन विधानसभा निवडणुकीत नांदेड जिल्हाप्रमुख पदाची माळ शिवसेना पक्ष श्रेष्ठींनी विवेक देशमुख यांच्या गळ्यात घातल्याने हदगाव तालुका शिवसेनाप्रमुख पदाची जागा सध्या रिक्त झाली असल्याने हदगाव शिवसेना तालुकाप्रमुखाची माळ नेमकी कोणाच्या गळ्यात पडेल ? याची संबंध हदगाव तालुक्यात खमंग चर्चा एकाव्यास मिळत आहे. हदगाव तालुका शिवसेनाप्रमुख पदासाठी तालुक्यातून अनेक निष्ठावंत शिवसैनिक इच्छुक आहेत, परंतु हदगाव शिवसेनेचे तिन वेळा आमदार व एक वेळ खासदार राहिलेले तत्कालीन शिवसेना मराठवाडा प्रतोद मा.खासदार सुभाष वानखेडे यांनी उबाठा गटाला सोडचिठ्ठी देत. ऐन विधानसभा निवडणुकी अगोदर शिवसेनेचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रचार सभेत शिवसेनेत जाहीर प्रवेश करुन हदगाव हिमायतनगर विधानसभा मतदार संघाचे शिवसेनेचे उमेदवार बाबुराव कदम यांना पाठिंबा देत शिवसेनेचे उमेदवार कदम यांना निवडून आण्याची जबाबदारी स्वीकारत संपूर्ण मतदार संघात आक्रमक सभा घेत बाबुराव कदम नावाची हवा तयार केली. परिणामी निवडणुकित कोहळीकर यांचा मोठ्या मताधिक्याने विजय झाला. या विजयात सिंहाचा वाटा उचलत किंगमेकर झालेले माजी खासदार वानखेडे यांचे पुतणे आबासाहेब वानखेडे यांनी शिवसैनिकांच्या आग्रहाखातर हदगाव तालुका शिवसेनाप्रमुख पदाच्या आखाड्यात उडी घेतल्याने हदगाव तालुका प्रमुख पदासाठी गुढघ्याला बाशिंग बांधून बसलेल्या अन्य इछुकांच्या



तोंडचे मात्र पाणी पळाले आहे.

शिवसेना तालुकाप्रमुख पदासाठी इच्छुक असलेले आबा वानखेडे यांनी माजी खासदार सुभाष वानखेडे यांच्या मागील दोन टर्म विधानसभा व एक वेळ लोकसभा निवडणुकीत संपूर्ण मतदार संघाचा कारभार यशस्वीपणे पार पाडला असल्याने व नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत विद्यमान आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्या खांद्याला खांदा लावून संबंध मतदार संघ पिंजून काढला असल्यामुळे त्यांचा हदगाव तालुक्यातील शिवसैनीकां सोबत दांडगा संपर्क व परिचय आहे व हदगाव शहरासह तालुक्यातील जुन्या व नवीन शिवसैनिकांच्या सुखदुःखाच्या वेळी मदतीला धावून जाण्याची कार्यशैली असलेल्या व हदगाव तालुक्यातील प्रशासकीय अधिकाऱ्यावर आपल्या कडक शैलीची चांगलिच वचक असल्याने व तालुकाभर कडवट शिवसैनिक अशी ओळख असलेल्या आबा वानखेडे यांच्या गळ्यात शिवसेना तालुकाप्रमुख पदाची माळ पक्षश्रेष्ठींनी घालावी अशी जोरदार मागणी तालुक्यातील सर्वसामान्य शिवसैनिकांतून होत आहे

शिवसेना तालुकाप्रमुख पदासाठी इच्छुक असलेल्या सर्वच शिवसैनिकांचे माजी खासदार वानखेडे व आबासाहेब वानखेडे यांच्याशी पूर्वीपासूनच हितसंबंध असल्याने आगामी तालुकाप्रमुख पदासाठी आबा वानखेडे यांचे नाव समोर आल्याने त्यांच्या नावाचा विरोध करण्यासाठी अद्याप पर्यंत कोणी समोर आले नाही किंवा त्यांच्या नावाला अप्रत्यक्ष विरोधही आत्तापर्यंत कोणीही दर्शविला नसल्याने नांदेड जिल्ह्याचे जिल्हाप्रमुख विवेक देशमुख व शिवसेनेचे विद्यमान आमदार बाबुराव कदम शिवसेना तालुकाप्रमुख पदाची माळ आबासाहेब वानखेडे यांच्या गळ्यात घालतील का ? याकडे संबंध हदगाव तालुक्यातील शिवसैनिकांचे व जनतेचे लक्ष लागले आहे.

सध्यस्थितीत शिवसेनेचे जिल्हाप्रमुख पद, उपतालुकाप्रमुख ,युवा तालुका प्रमुख, तालुका समन्वयक, महिला तालुकाप्रमुख, महिला उपतालुका प्रमुख व विद्यमान आमदार अशी अर्धा डजणला वर पदे निवघा व मनाठा विभागालाच मिळाली असल्याने शिवसेना तालुकाप्रमुख हे पद हदगाव तालुक्याच्या मध्यभागी व हदगाव शहरापासून काही अंतरावर वास्तव्यास असलेल्या आबा वानखेडे यांना देण्यात यावं अशी मागणी हदगाव शहर व पळसा, आष्टी, वाळकी, तामसा व कायाधु नदी अलीकडील परिसरातील शिवसैनिकातून होत आहे.

# वातावरणाचा 'पारा' घसरला; बीडकर गारठले!





**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ डिसेंबर**

बीडच्या तापमानाचा पारा १० अंशांच्या खाली आला आहे. रविवार (ता.१५) रोजी शहरात ९ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे.जिल्ह्यात गारवा वाढला असून बीडकर गारठले आहेत. पुढील तीन दिवस जिल्ह्यात थंडीचा जोर कायम राहणार असल्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

मागील चार-पाच दिवसांपासून थंडीचा जोर पुन्हा वाढला असून ६६ अंगातील हुडकुडी स्वेटर-मफलर वापरूनही जात नाही. अंगातील हुडहुडी घालवण्यासाठी शेक घेतल्याशिवाय पर्याय नाही. शेकोटीच्या गर्मीन अंगातील हुडहुडी जाते. शेकोटी पेटवल्यावर गल्लीतील आबालवृद्ध तापण्यासाठी गर्दी करतात.

हिवाळा सुरू होऊन अनेक दिवस लोटले, एक-दोन दिवस सोडले, तर विशेष हु म्हणावी अशी थंडी जाणवत नव्हती. त्यात मध्येच ढगाळ वातावरणामुळे उन्हाळ्यासारखी गों जाणवू लागली. मध्यंतरी एक दिवस बीड शहरांमध्ये हलक्या स्वरूपाचा पाऊसही पडला होता. डिसेंबर महिना अर्ध्यावर आला तरी जणू थंडी नाही,

सेल्सिअसखाली गेला आहे. त्यामुळे सकाळी मॉर्निंग वॉकला जाणाऱ्या नागरिकांच्या संख्येतही मोठ्या प्रमाणात घट झाल्याचे आढळून येते. सकाळच्या टप्प्यात शाळेत जाणाऱ्या विद्यार्थी तसेच ग्रामीण भागातून भाजीपाला तसेच वस्तू घेऊन येणाऱ्या नागरिकांनाही या थंडीचा सामना करावा लागत आहे.

# आयुष ग्लोबल इंग्लिश स्कूलच्या क्रीडा स्पर्धा

## विद्यार्थी व पालकांचा स्पर्धेत उत्साहपूर्वक सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ डिसेंबर**



दि.१४ आणि १५ डिसेंबर रोजी आयुष ग्लोबल इंग्लिश स्कूल, माजलगाव येथे क्रीडा स्पर्धांचे भव्य आयोजन करण्यात आले. या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांसह पालकांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला.

डक वॉक, लेमन स्पून रेस, रनिंग रेस, चेन ब्रेक, ऑक्टोपस रेस अशा विविध प्रकारच्या स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांचे कौशल्य आणि ऊर्जा दिसून आली. विद्यार्थ्यांप्रमाणेच पालकांसाठीही खास क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले, ज्यामध्ये पालकांनीही तितक्याच जोमाने भाग घेतला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंकिता लाटे मॅडम आणि पूनम ललवाणी मॅडम यांनी कौशल्याने केले. शाळेच्या संस्थापक भाग्यश्री करवा मॅडम आणि संचालक सागर करवा यांनी विद्यार्थ्यांना खेळाचे महत्त्व आणि जीवनात खेळांचे स्थान याबाबत प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन शिक्षक वृंदांनी अत्यंत चोखपणे आणि उत्कृष्ट पद्धतीने केले. ही क्रीडा स्पर्धा शाळेच्या एकत्रित कार्यक्षमतेचे आणि विद्यार्थी-पालकांच्या सक्रिय सहभागाचे उत्तम उदाहरण ठरली.



परभणी येथील दगडफेक प्रकरणी न्यायालयीन कोठडीत असणाऱ्या सोमनाथ सूर्यवंशी या भिमसैनिकाला पोलिसांनी अमानूष मारहाण केल्यामुळे त्याचा मृत्यू झाला आहे. मारहाण करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यावर ३०२ चा गुन्हा दाखल करण्यात यावा. तसेच मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील फरार आरोपीना तात्काळ अटक करण्यात यावी. या दोन्ही प्रकरणाची एसआयटी मार्फत सखोल चौकशी करून दोषीवर कठोर कारवाई करण्यात यावी. या मागणीकरिता मंगळवार (ता.१७) रोजी रिपाइंच्या वतीने युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्हाअधिकारी कार्यालयावर तिव्र आंदोलन करण्यात आले.

# दत्त संस्थान बालाघाटावर गोमाता पूजन व धार्मिक कार्यक्रमाने दत्त जन्मोत्सव साजरा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ डिसेंबर**

दत्त संस्थान बालाघाट कपिलधारवाडी (मांजरसुंबा) येथील संस्थांवर परमपूज्य सद्गुरु प.पु.ष.ब्र.श्री १०८ शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर यांच्या कृपाशीर्वादाने श्री दत्त जयंती उत्सव मोठ्या भक्तीमय वातावरणात संपन्न झाला .

दत्त संस्थांवर संपूर्ण दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यामध्ये दुपारी बारा वाजता दत्त जन्मोत्सव साजरा करण्यात आला यानंतर महा अभिषेक दत्त व महादेवाला दुग्धाभिषेक करण्यात आला. यानंतर दत्त जन्मानिमित्त महिलांनी पाळणा गायन केले. याबरोबरच गोमातेला गोग्रास देऊन गोमातेची पूजा करण्यात आली. या दत्त जन्मोत्सवानिमित्त सती अनुसयाची उत्कृष्ट झाकी तयार करण्यात आली होती.या झाकी मध्ये सती अनुसयाच्या वेशभूषा कु. प्रार्थना अमोल ढास ने सहभाग नोंदविला. या कार्यक्रमानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व कार्यक्रमाला बालाघाटावरील कपिलधारवाडी, मांजरसुंबा, कोळवाडी ,उदंड वडगाव (शिवाजीनगर), ससेवाडी आदी परिसरातील व पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. अतिशय भक्ती भावाने व आनंदी वातावरणामध्ये श्रीदत्त जन्मोत्सव उत्सव मोठ्या थाटात साजरा करण्यात आला यावेळी दत्त उपासक श्रीहरी वैजनाथ महाराज यांनी मान्यवरांचे स्वागत केले या कार्यक्रमाला संपूर्ण शिंदे परिवाराने विशेष परिश्रम घेतले.



# ड्रोन खरेदी अर्थसहाय्य योजनेसाठी आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ डिसेंबर**

कृषी क्षेत्रात ड्रोन (मानव विरहीत वायू यान) च्या वापरास पुरेश्या संधी असून सद्य स्थितीत त्याचा विविध पिकांच्या वाढीच्या अवस्थेत कीटक नाशके, सूक्ष्म मुलद्रव्ये, विद्राव्य खते फवारणी या बाबी व्यतिरिक्त कृषी क्षेत्राशी निगडीत इतर कामासाठी देखील वापर करता येऊ शकतो. ड्रोन वापरामुळे शेतकऱ्यांच्या खर्चात, वेळेत व श्रमात बचत होऊन रोजगार निर्मिती होऊ शकते.त्यामुळे केंद्र शासन पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण उपअभियान या योजने अंतर्गत ड्रोन या घटकाचा समावेश करण्यात आलेला आहे.

सन २०२४-२५ साठी कृषी यांत्रिकीकरण उपअभियान अंतर्गत ड्रोन खरेदीसाठी अर्थसहाय्य या घटकासाठी १०० ड्रोनचा महाराष्ट्र राज्य साठी वार्षिक कृती आराखडा मंजूर करण्यात आलेला असून त्यासाठी शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी सहकारी संस्था तसेच कृषी व तत्सम पदवीधर लाभार्थी यांना अर्ज करता येतो.

शेतकरी/संस्था/कंपनी/पदवीधर अनुदान मर्यादा शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी सहकारी संस्था इ. ४० टक्के अनुदान रक्कम ४.०० लाख मार्गदर्शक सूचनेनुसार किसान ड्रोन व त्याचे संलग्न जोडणी साहित्य याची जी मूळ/वास्तविक किंमत असेल त्यापैकी जे कमी असेल ते अनुदान रक्कम देय राहील.कृषी व तत्सम पदवीधर ५०टक्के अनुदान रक्कम ५.०० लाख अ.जा./अ.ज/ लहान व सिमांतिक/महिला शेतकरी ५० टक्के अनुदान रक्कम ५.०० लाख सर्वसाधारण शेतकरी ४० टक्के अनुदान रक्कम ४.०० लाख आयुक्त, कृषी यांचे निर्देशान्वये ड्रोन या घटकासाठी ऑफलाईन अर्ज न करता इतर औजारांप्रमाणे महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन राबविण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार लाभार्थ्यांनी अर्ज करण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर लॉगइन करून अर्ज करावेत.

कृषि यांत्रिकीकरण - मुख्य घटक - भाडे तत्वावरील सेवा सुविधा केंद्र या घटकामध्ये उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.त्यामुळे सन २०२४-२४ मध्ये ड्रोन हा घटक ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येणार असल्यामुळे शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी सहकारी संस्था व कृषी व तत्सम पदवीधर यांनी महाडीबीटी पोर्टलवर https://mahadbt.maharashtra.ov.in/Farmer या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावेत.तसेच अधिक माहितीसाठी नजीकच्या तालुका कृषि अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा व जास्तीत जास्त अर्ज सादर करून लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी सुभाष साळवे, , बीड यांनी केले आहे.

# वाहनांची नवी मालिका येणार पसंती क्रमांकासाठी अर्ज करावे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ डिसेंबर**

परिवहनेत्र दूचाकी वाहनांसाठी नोंदणी मालिका MH23BL ही सद्यस्थितीत सुरू असून सदर मालिकेतील नोंदणी क्रमांकाचे वाटप संपत आलेले आहे. त्या अनुषंगाने परिवहनेत्तर दुचाकी चक२३इच् ०००१ ते ९९९९ ही मालिका दिनांक ३० डिसेंबर २०२४ पासून सुरु करण्यात येणार आहे.

ज्या वाहनधारकांना पसंतीचा नोंदणी क्रमांक घ्यावायचा असेल त्यांनी आपला विहित नमुन्यातील अर्ज आकर्षक क्रमांकला लागू असलेली फीच्या रकमेचा उप प्रादेशिक परिवहन कार्यालय बीड यांच्या नावाचा धनादेश डी.डी व आपल्या ओळखपत्राच्या व आधार कार्डच्या साक्षांकीत प्रतिसह दिनांक १७ डिसेंबर २०२४ ते २४ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी २.०० पर्यंत कॅश काउंटर खिडकी क्रमांक २ वर जमा करावा. सदर मालिकेतील आकर्षक क्रमांकाचे वाटप महाराष्ट्र मोटार वाहन नियम व परिवहन आयुक्तांचे परिपत्रिकानुसार करण्यात येईल. तसेच एकाच आकर्षक क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झालेल्या अर्जाची नोटीस दिनांक २४ डिसेंबर २०२४ रोजी कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर दुपारी ४.०० वाजता प्रसिद्ध करण्यात येईल. दिनांक २७ डिसेंबर २०२४ रोजी एकपेक्षा जास्त अर्ज असलेल्या अर्जदारांनी दुपारी १.०० वाजेपर्यंत बंद लिफाफ्यामध्ये मूळ शुल्का व्यतिरिक्त अधिक रकमेचा धनादेश जमा केल्यानंतर त्याच दिवशी दुपारी ३.०० वाजता लिलावाची विहित कार्यपद्धती अवलंबून नोंदणी क्रमांकाचे वाटप करण्यात येईल. तरी सर्व वाहन धारकांनी,नागरिकांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, स्वप्निल माने यांनी केले आहे.

# मस्साजोग प्रकरणात खा.बजरंग सोनवणेंनी उठविला संसदेत आवाज

## कायदा तुडविणाऱ्या गुंडगिरीला फाशी द्या

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ डिसेंबर**

केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी अपहरण करुन त्यांना टॉर्चर करत क्रूरपणे हत्या केली आहे. सदरील हत्या प्रकरण देशातील कायदा व सुव्यवस्थेवर झालेला मोठा आघात आहे. त्यामुळे या घटनेतील दोषींना फाशी देण्यात यावी.असा आवाज खा.बजरंग सोनवणे यांनी संसदेत सोमवार (ता.१६) रोजी उठविला आहे. दरम्यान मस्साजोग प्रकरणाचा संसदेत आवाज उठविल्याने या घटनेचा तपास पारदर्शक आणि कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता होणार आहे.खा.बजरंग सोनवणेंनी संसदेत प्रश्न उपस्थित केल्याने मस्साजोग प्रकरणातील मास्टर माईंडचे धाबे दणाणले आहेत.



मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्येनंतर बीड जिल्ह्याचे सामाजिक वातावरण ढवळून निघाले आहे.या घटनेतील सर्व आरोपींना फाशी देण्यात यावी, यासाठी जिल्ह्यात मोर्चे, निवेदने, गावबंद आंदोलने सुरु आहेत.बीड जिल्ह्यात काही राजकीय लोकांनी गुंडगिरीचा उच्चांक गाठला आहे. सत्तेच्या जोरावर गुंडगिरी पोसून सामाजिक सलोखा बाधित केला जात आहे.एवढेच नाही तर खंडणीसारखे गुन्हे दाखल होवूनही पोलिसांकडून आरोपींना अटक केली जात नाही.संतोष देशमुख यांचे अपहरण झाल्यानंतर केज पोलिसांना त्याची तातडीने माहिती देण्यात आली होती. परंतू केज पोलिसांकडून हलगर्जीपणा करण्यात आला. या घटनेचे गंभीर्य घेतले असते तर संतोष देशमुख यांची हत्या झाली नसती.बीडचे पोलीस नेमके कोणाच्या इशाऱ्यावर चालत आहेत.या सर्व बाबींचा कसून तपास होणे गरजेचे आहे. कारण त्याशिवाय हत्येचा मास्टर माईंड कोण आहे? उघड होणार नाही. बीडमध्ये नुकत्याच पार पडलेल्या निवडणूकांमध्ये गुंडगिरी प्रवृत्तीच्या लोकांनी अक्षरशः कायदा आणि सुव्यवस्थेचे धिंडवडे उडविले होते. संतोष देशमुख यांची हत्या देखील याचं गुंड मानसिकतेतून झाली आहे. त्यामुळे या घटनेतील एकही आरोपी फाशीच्या शिक्षेतून वगळला जाऊ नये. त्यासाठी तपास अतिशय पारदर्शकपणे करण्यात यावा. असा प्रश्न खा.बजरंग सोनवणे यांनी संसदेत उपस्थित केला आहे.

# घाटनांदूर येथे रेल्वे गाड्या थांबवा

## खा.बजरंग सोनवणेंनी दिले रेल्वे बोर्ड अध्यक्षांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ डिसेंबर**



जिल्ह्यातील घाटनांदूर रेल्वे स्थानक, सामान्य प्रवाशी आणि मालवाहतूक करण्यासाठी महत्वाचे स्थानक आहे. परंतू या रेल्वे स्थानकावर गेल्या काही दिवसांपासून रेल्वे गाड्या थांबविणे बंद झाले आहे.परिणामी घाटनांदूर भागातील नागरिकांना रेल्वे स्थानक असताना देखील फायदा होत नाही.त्यामुळे घाटनांदूर मार्गावरुन धावणाऱ्या रेल्वे थांबविण्यात याव्यात, आशा मागणीचे निवेदन खा.बजरंग सोनवणे यांनी रेल्वे बोर्डाचे केंद्रीय अध्यक्ष सतीश कुमार, रेल्वेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिल्ली येथे भेट घेवून सोमवार (ता.१६) रोजी दिले आहे. त्यामुळे घाटनांदूर परिसरातील जनतेची अडचण दूर होणार आहे.

अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदूर येथील रेल्वे स्थानक सार्वजनिक वाहतूकीसाठी परळी ते लातूर दरम्यान महत्वाचे स्थानक आहे. कोविड-१९ महामारीपूर्वी औरंगाबाद-गुंटूर आणि नांदेड-बंगलोर गाड्या नियमितपणे घाटनंदूर येथे थांबत होत्या. परंतु नंतर थांबणे थांबवले गेले. घाटनंदूर आणि त्या परिसरातील नागरिकांसाठी असुविधाजनक आहे.त्यामुळे या ठिकाणी रेल्वे गाड्या थांबविण्याच्या सूचना देण्यात याव्यात, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रेल्वे बोर्डाकडे केली.

घाटनंदूर येथे रेल्वे स्थानकावर या गाड्या थांबविण्याची मागणी

घाटनांदूर रेल्वे स्थानक येथे औरंगाबाद-गुंटूर: ट्रेन क्र. १७२५४, गुंटूर - औरंगाबाद: ट्रेन क्र. १७२५३,बंगलोर - नांदेड: ट्रेन क्र. १६५९३, नांदेड - बंगलोर: ट्रेन क्र. १६५९४, नांदेड - पनवेल: ट्रेन क्र. १७६१४, पनवेल - नांदेड: ट्रेन क्र. १७६१३ या रेल्वे थांबविण्यात याव्यात अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केली.

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat

# छत्रपती संभाजीनगर



## दहा पटीने वाढणार पैठण शहराची हद्द

### सूचना हरकती घेण्यास सुरुवात

तभा वृत्तसेवा

पैठण दि १७ :- आतापर्यंत मृगजळ म्हणून वाटणाऱ्या पैठण शहर हद्दवाढी बाबत आमदार विलास बाप्पू भुमरे यांच्या प्रयत्नाने तसेच नगर परिषद मुख्याधिकारी तथा प्रशासक संतोष आगळे यांच्या पाठपुराव्याने शासन दरबारी पैठण शहर हद्दवाढीचे प्रकरण पुढे सरकले असून नगर परिषदेने नवीन हद्दवाढीचा नकाशा प्रसिद्ध करून याबाबत नागरिकांच्या सूचना व हरकती ६० दिवसांच्याआत लेखी स्वरूपात मागितल्या आहेत.

**पैठण शहराची सध्याची हद्दवाढ ही दहा पटीने वाढणार असून ती मौजे वाघाडी शिव, पंथेवाडी शिव, आखातवाडा शिव, राहटगांव शिव, करंजखेड शिव, नारायणगांव शिव,कातंतपूर शिव, वाहेगांव शिव, पावन गणपती नारळे शिव, जुने कावसन शिव, तेलवाडी शिव, चणकवाडी शिव, मौजे पाटेगांव शिव अशी गोलाकार पध्दतीने वाढवली जाणार आहे. यामुळे वरील अनेक गांव आणि गावांचा मोठा भाग पैठण शहराच्या हद्दवाढीत येऊन त्याठिकाणी विकास गंगा वाहणार आहे.**

नवीन प्रसिध्द झालेल्या नकाशानुसार पैठण शहराची सध्याची हद्द ही दहा पटीने वाढणार असून यात जवळपास १३ गावांच्या जागेचा पैठण शहरात समावेश होणार आहे.

पैठण शहराची हद्दवाढ होण्यासाठी आमदार विलास भुमरे यांच्या माध्यमातून मुख्याधिकारी संतोष आगळे यांनी नगरविकास विभागाकडे प्रस्ताव दिला होता. आता हद्दवाढ होणार असुन शहराचा विस्तार होणार आहे,पैठण शहरांतर्गत महसूल गावाचा समावेश या हद्दवाढीच्या मुळे होणार आहे. शहराची लोकसंख्या ५४ हजारच्या पुढे आहे. नगर परिषदेच्या स्थापनेनंतर एकदा ही शहराची हद्दवाढ झालेली नाही. तसेच नगर परिषद पैठणच्या बाहेर झपाट्याने विस्तार होत असून निवासी व वाणिज्य क्षेत्र निर्माण होत आहे. पैठण शहराच्या उत्पन्नाच्या दृष्टीने व वाढीव क्षेत्रातील नागरीकांना मुलभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी होत असलेल्या अडचणी सोडवण्याकरीता नगर परिषदेच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत हद्दवाढीस मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव अनेक वेळा सादर करण्यात आलेला होता. त्यावर कोणतीही कार्यवाही न झाल्याने खासदार संदिपान भुमरे यांच्याकडे मुख्यधिकारी संतोष आगळे यांनी नगरविकास विभागाकडे हद्दवाढीस मान्यता देणेबाबत पत्र दिले होते,त्यावर आता शहराचा विकास आराखडा तयार झाला आहे. पैठण शहराची हद्दवाढ होत आहे त्यामुळे शहर झपाट्याने वाढत असलेल्या वाढीव भागात आता नागरी सुविधा देण्यासाठी सोईचे होणार आहे. हद्दवाढी अभावी नवीन वस्त्यांमध्ये पाणीपुरवठा, स्वच्छता, दिवाबत्ती, रस्ते अशा मूलभूत सुविधांअभावी नागरीकांची गैरसोय होत होती. मात्र, आता हद्दवाढ होवून शहर विकासाला गती मिळणार असून नगर परिषद कार्यालयातर्फे प्रसिद्ध करण्यात पैठण शहराच्या नवीन हद्दवाढी बाबत नागरिकांनी आपल्या सूचना व हरकती ६० दिवसांच्या आत नगर परिषदेकडे लेखी स्वरूपात द्याव्या असे आवाहन मुख्यधिकारी तथा प्रशासक संतोष आगळे यांनी केले आहे.

## परतापूरवाडी येथील शेतकऱ्याच्या ११ शेळ्या दगावल्या

वाळूज महानगर, (प्रतिनिधी) : गंगापूर तालुक्यातील परतापूर वाडी येथील शेतकरी वजीर शेख यांच्या ११ शेळ्या आज विषारी पदार्थ खाण्यात आल्याने दगावल्या आहेत. त्यांचे तब्बल ५५ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.

याविषयी अधिक माहिती अशी की, गंगापूर तालुक्यातील परतापूरवाडी येथील शेतकरी वजीर शेख हे त्यांच्याजवळील ११ शेळ्या चारण्यासाठी रानात गेले होते. यावेळी बकर्या रानात चरत असताना अचानक एकामागे एक ११ बकर्या जागेवर मरण पावल्या. त्यात ७ बोकूड व ४ शेळ्यांचा समावेश आहे. त्यांच्या बकर्या मेल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



यावेळी परतापूरवाडी येथील सरपंच अब्दुल पटेल यांना ही माहिती कळताच त्यांनी तात्काळ गाजगाव येथील पशूधन पर्यवेक्षक भालेराव यांना बोलावून घेतले भालेराव घटनास्थळी पोहचले तेव्हा सर्व शेळ्या मृत झाल्या होत्या. शेख वजीर यांचे जे पशूधन दगावले, त्यामुळे त्यांच्यावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. त्यांना आम्ही शासकीय स्तरावर मदत मिळवून देण्यासाठी सहकार्य करणार असल्याचे सरपंच अब्दुल पटेल यांनी सांगितले.

**ज्वारीच्या कोवळ्या पिकातून अर्गट नावाचा पदार्थ तयार होतो, तो या शेळ्यांच्या खाण्यात आला असल्याचा संशय आहे, ज्वारीचे कोवळे रोप खाण्यात आल्याने किरळ लागल्याचे बोली भाषेत सांगितले जाते. मी घटनास्थळी ताबडतोब जाऊनही काही करता आले नाही, या मृत पावलेल्या शेळ्यांमध्ये ७ बोकूड व ४ शेळ्या आहेत.**

**डॉ. पी.एल. भालेराव**
**पशूधन पर्यवेक्षक, गाजगाव**

## ४५ वे वार्षिक पुष्पप्रदर्शन ८ व ९ फेब्रुवारी रोजी; सहभागाचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर,दि.१७ (जिमाका):- सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग उपवने व उद्याने यांच्या वतीने शनिवार दि.९ व रविवार दि.९ फेब्रुवारी २०२५ रोजी ४५ व्या विभागीय वार्षिक पुष्पप्रदर्शन व उद्यान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत व प्रदर्शनात अधिकाधिक स्पर्धकांनी सहभाग घ्यावा,असे आवाहन सहायक संचालक जे. व्ही. चौगुले यांनी केले आहे.

या विभागीय वार्षिक पुष्पप्रदर्शनात गुलाबपुष्पे फुलदानातून, मोसमी फुले, बहुवार्षिय फुले, कॅक्टस व सकुलंट, कुंड्यातील शोभीवंत झाडे, लॅण्डस्केप ऑन द स्पॉट, कलात्मक पुष्परचना, उद्यान स्पर्धा इ. विभाग आहेत. प्रत्येक विभागातील विजेत्यास एक चषक, पुष्पप्रदर्शनात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या स्पर्धकास उपवने व उद्याने विभाग छत्रपती संभाजीनगर यांनी पुरस्कृत केलेला फिरता चषक प्रदान करण्यात येईल. या स्पर्धेतील व सर्व गटांकरता वेगवेगळी परितोषिके ठेवण्यात आली आहेत. तसेच पुष्परचना, पुष्प रांगोळी या विभागासाठीही पारितोषिके ठेवण्यात आली आहेत.अधिक माहितीसाठी सहायक संचालक जे. व्ही. चौगुले ८६९८०७०८८२, उद्यान अधीक्षक एस.टी. जाधव ९१७२५५९७९८ यांच्याशी संपर्क साधावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

## रेश्मा चिमंद्रे यांची आज आकाशवाणीवर मुलाखत

छत्रपती सभाजीनगर, दि.१७(जिमाका):- जिल्हा महिला व बालविकास अधिकारी श्रीमती रेश्मा चिमंद्र यांची बुधवार दि.१८ रोजी एफ एम १०१.७ मेगा हट्र्जवर आकाशवाणीच्या छत्रपती संभाजीनगर केंद्रावरुन मुलाखत प्रसारित होणार आहे. सकाळी पावणे ११ वा. प्रासंगिक या सदरात ही मुलाखत प्रसारीत होणार असून माहिती अधिकारी डॉ. मीरा ढास यांनी त्यांच्याशी बातचीत केली आहे. महिला व बालविकास विभागाच्या योजना पिंक ई-रिक्षा तसेच महिला सुरक्षा इ. विषयी या मुलाखतीत त्यांनी माहिती दिली आहे.

## श्री स्वामी समर्थ केंद्रात दत्त जयंती निमित्ताने अखंड नाम जप यज्ञ सप्ताहाची सांगता





तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.१७ डिसेंबर : येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र येथे श्री दत्त जयंती निमित्ताने आयोजित अखंड नाम जप यज्ञ सप्ताह सोहळा हजारो सेवेकर्यांच्या उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात आला.

सप्ताहात श्री गणेश याग, स्वामी याग ,चंडी याग, रुद्र याग,असे विशेष याग सह, सर्व यज्ञाविधीची सेवा पूर्ण करून सप्ताहाच्या समाप्तीच्या वेळी, श्री सत्यदत्त व सर्व नाम जप करिता उपयोगात आलेल्या पूजेच्या साहित्यांची सांगता पूजा करून सप्ताहाची सेवा पूर्ण करण्यात आली. या सप्ताह मध्ये एकूण ११२ सेवेकरी श्री गुरुचरित्र पारायण करिता बसलेले होते. यात महिलांची संख्या अधिक प्रमाणत दिसून आली. केंद्राचे यंदाचे हे ४० वे वर्ष होते. सोमवार असल्याने श्री स्वामी समर्थ महाराजांना महादेवाच्या रुपात सजवण्यात आले होते.

यावेळी जालना जिल्हा प्रमुख झुंजारराव पाटील काकडे, गंगापूर तालुका प्रतिनिधी गोपीनाथ प्रधान, कर सल्लागार शांतीलाल जाधव , याज्ञिकी संदीप काटकर, अमोल चौसाळकर, सुभाष कहाटे, सुनीता शर्मा, सुनीता सोळके, सायली धुमाळ, सिंधुताई पाटील, योगेश पाटील, वाल्मीक टेमकर, कमलाकर वखारे, सतीश वाघचौरे, अरविंद लाळे, रमेश आसने, रवि पाटील,मंगेश शिंदे,बाप्पा वाडकर, अविनाश पाटील, आदी सेवेकर्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

झुंजारराव काकडे पाटील, जालना जिल्हा प्रमुख.-श्री स्वामी समर्थ केंद्रात सलग चाळीस वर्षापासून दत्त जयंती उत्सव साजरा करण्यात येतो यावेळी महिला सेवेकरींची लक्षणीय उपस्थिती होती. या कार्यक्रमात गुरुचरित्र पारायण नित्यसेवा अखंड नामजप, प्रहर सेवा आदी धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## सोयगाव शहर 100% टक्के कडकडीत बंद

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१७ डिसेंबर

परभणी येथे घडलेल्या संविधान प्रतिकृतीच्या विटंबना प्रकरणी सोयगाव शहरात दि.१६ सोमवार रोजी विविध भिम सैनिकांच्या संघटना आणि राजकिय संघटनांच्या वतीने बंद पुकारण्यात आला होता.



संविधान प्रतिकृतीच्या विटंबना प्रकरणी सोयगाव तहसीलदार,सोयगाव पोलीस स्टेशनचे सपोनि यांना आंबेडकरी संघटनांच्या वतीने रविवारी (दि. १५ ) रोजी संतप्त होत निवेदन देत पुन्हा अशा घटना नये म्हणून त्या समाज कंठकावर कठोर कारवाई करण्यात यावी,निषेध व्यक्त करण्यासाठी सोमवारी सोयगाव शहर बंद ची हाक देण्यात आली होती.शासकीय कार्यालये,राज्य परिवहन महामंडळ, शाळा, महाविद्यालये,बॅका,दवाखाने, औषध दुकाने वगळता व्यापारी वर्गाने उत्स्फूर्तपणे सर्व छोटे मोठे प्रतिष्ठान शंभर टक्के बंद ठेवून सहभाग घेतला होता. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात भिम अनुयायांनी भारतीय संविधान,महात्मा ज्योतिबा फुले,छत्रपती शाहू महाराज,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाच्या प्रचंड घोषणाबाजी करुन परिसर दुमदुमून टाकला.यावेळी भरत पगारे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (राजरत्न आंबेडकर ) सोयगाव तालुका अध्यक्ष,अंकुश पगारे रिपब्लिकन सेना( आनंद आंबेडकर) तालुका अध्यक्ष गणेश पगारे आर.पी.आय.(आठवले गट),रवींद्र काळे,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सोयगाव शहर अध्यक्ष(शरद पवार गट) शिवसेनेचे संदिप चौधरी,राष्ट्रवादी काँग्रेसचे कृष्णा जुनघुरे पाटील,सुभाष सातदिवे,रूपचंद सोनवणे,मुकूंद वाहूळ,निवृत्त शिक्षक सुभाष जाधव,संजीवन सोनवणे, नगरसेवक दिपक पगारे,अजय नेरपगारे,राजू वानखेडे आदींनी चेयनसिंग बहुरे नायब तहसीलदार,पंकज बारवाल सपोनि यांना जनतेच्या भावना ह्या शासनास कळवण्याची विनंती करिता निवेदन दिले.

## सोळा वर्षीय तरुणीची गळफास घेऊन आत्महत्या

वाळूज महानगर (प्रतिनिधी): बजाजनगरातील एका सोळा



वर्षीय शाळकरी मुलीने स्वतः च्या खोलीत गळफास लावत आत्महत्या केल्याची घटना रविवारी रात्री उघडकीस आली.

प्राची शिवराम झिंझुर्डे (वय १६, रा. न्यू गीतामाई हाउसिंग सोसायटी, बजाजनगर) असे आत्महत्या केलेल्या मुलीचे नाव आहे. ती दहावीत शिकत होती. प्राचीच्या आत्महत्येचे कारण अद्याप समोर आलेले नाही. रविवारी सुटीमुळे ती घरीच होती. तिच्या मोठ्या भावाचे लग्न जुळले असल्याने खरेदीसाठी आई, वडील, भाऊ शहरात आले होते. त्यांनी प्राचीला सोबत नेण्यासाठी आग्रह केला. मात्र ती घरी एकटीच थांबली होती. नंतर प्राचीने दुकानातून खाद्यपदार्थ आणले. त्यानंतर तिने गळफास घेतला, अशी माहिती नातेवाइकांनी दिली. या घटनेची नोंद वाळूज एमआयडीसी पोलिस ठाण्यात घेण्यात आली असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## दगडोजी महाविद्यालयात प्रकृती परीक्षण शिबिर संपन्न

वाळूज महानगर (प्रतिनिधी): भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या आदेशानुसार देश का प्रकृती परीक्षण हा राष्ट्रीय अभियान २६ नोव्हेंबर ते २६ डिसेंबर या कालावधीत राबविण्यात येत आहे. त्या अनुषगाने दगडोजीराव देशमुख महाविद्यालयांमध्ये १७ डिसेंबर रोजी प्रकृती परीक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



शिबिराचा लाभ जवळपास १४० विद्यार्थ्यांनी घेतला व परीक्षण करून घेतले. शिबिर प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ राहुल हजारे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले यावेळी उपप्राचार्य डॉ संजय सांभाळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी धनेश्वरी आयुर्वेदिक कॉलेज गेवराई तांडा पैठण येथील टीमने परिश्रम घेतले यामध्ये डॉ अभिजीत आहेर, वैष्णवी वटाणे, प्रसाद दहातोंडे, खुषी सौदेकर, विशाल उगले, समीक्षा चौकरे, वैष्णवी बेकारी, नेहा भोंडे आदींनी परीक्षण घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ भरतसिंग सलामपुरे यांनी मानले.

## मालपाणीज् बेकलाईट ने आत्तापर्यंत २५ कोटी क्रीमरोल्स बनवून गाठला ऐतिहासिक टप्पा

छत्रपती संभाजीनगर, १७ डिसेंबर २०२४ : खाद्यप्रक्रिया आणि बेकरी क्षेत्रातील अग्रगण्य व विश्वासपूर्ण ब्रँड असलेल्या मालपाणीज् बेकलाईट ने एक ऐतिहासिक टप्पा गाठला असून कंपनीच्या १९९९ स्थापना झाल्यापासुन २५ कोटी क्रिमरोल चे उत्पादन करून वेगाने वाटचाल करत आहे. बेकरी उद्योगक्षेत्रातील अग्रगण्य नाव असलेल्या पुण्यातील बेकलाईट फूड् प्रोसेसिंग प्रा. लिमिटेड कंपनी ने बाजारपेठेत दोन दशकांपासून अधिक काळ कार्यरत आहे. ती ग्राहकांना पूर्णपणे शुद्ध शाकाहारी बेकरी उत्पादने पुरवते.



बेकरी क्षेत्रात १०० टक्के शुद्ध शाकाहारी उत्पादने उपलब्ध करून देण्याचे ध्येय घेऊन श्री. सचिन मालपाणी यांनी बेकरी व्यवसायात प्रवेश केला. अगदी आजही बेकरी उद्योग असंघटीत असून क्रिम रोल्स, खारी, टोस्ट, जीरा बटर अशी अनेक उत्पादने स्थानिक उत्पादक विकत आहेत. मात्र, या परिसराच्या अस्ताव्यस्त स्वरूपासोबतच स्वच्छतेचा अभाव, गुणवत्ता नियंत्रणाचा अभाव अशी समस्याही निर्माण झाली आहे. हे क्षेत्र प्रामुख्याने अंडी आणि मांसाहारी उत्पादने तसेच इतर बेकरी उत्पादनांची विक्री करणाऱ्या बेकरीद्वारे नियंत्रित केले जाते. यामुळे, शाकाहारी लोकांसाठी बेकरी उत्पादने खरेदी करण्याचे पर्याय खूपच मर्यादित झाले आहेत.

या यशाबद्दल मत व्यक्त करत मालपाणीज् बेकलाईटचे व्यवस्थापकीय संचालक श्री.सचिन मालपाणी म्हणाले, क्रीम रोल फक्त डेझर्ट नसून आधुनिक विश्वातील समाधानाचे प्रतीक देखील आहे. शुध्द शाकाहारी उत्पादने लक्षात घेऊन आधुनिकता आणि परंपरेचा अनोखा मिलाफ असलेली उत्पादने भविष्यात बाजारात आणण्याची बेकेलाइटची योजना आहे. क्रीम रोल अद्वितीय स्वाद देण्यासोबत प्रसन्नतेचा अनुभव देतो आणि आपले मूळ व प्रियजनांशी असलेल्या संबंधाची आठवण करून देतो. अलिकडील काळात, क्रीम रोल्सकरिता आरोग्यदायी पर्यायांची मागणी वाढत आहे.

## सुमित देशपांडे यांचे निधन



छत्रपती संभाजीनगर : सिडको महानगर १ येथील रहिवासी व एस आर कंपनी इंजिनियर या पदावर कार्यरत असलेले कै. सुमित दुर्गादासराव देशपांडे वय वर्ष ३४ यांचे कर्तव्यावर असताना हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने दिनांक १६ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी दोन वाजता अकस्मात निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी प्रेरणा सुमित देशपांडे एक मुलगी एक बंधू श्री सोहन दुर्गादासराव देशपांडे व वडील असा शोकाकुल परिवार आहे.

## "EmBossed Imprints' पुस्तकाला मोठा प्रतिसाद, लेखन करणारे सुंदररमण गणपतिरामन, विप्रोचे सह-सीईओ

छत्रपती संभाजीनगर - सुंदररमण गणपतिरामन, विप्रोचे अत्यंत आदरणीय सह-सीईओ, यांनी लिहिलेल्या EmBossed Imprints या पुस्तकाने त्याच्या प्रकाशनानंतर जगभरातील नेतृत्व, निर्णय घेणे, आणि संघटनात्मक वाढ यावर असलेल्या अद्वितीय दृष्टिकोनांसह नेत्यांना प्रेरित करत आहे. गेल्या आठवड्यात या पुस्तकाचे प्रकाशन झाल्यानंतर ते विविध उद्योगधंद्यांच्या नेत्यांकडून, कार्यकारी अधिकाऱ्यांकडून आणि वाचकांकडून अत्यंत प्रशंसा मिळवित आहे. त्यातले उपयोगी व अनुभवात्मक मार्गदर्शन आणि कृतीक्षम रणनीतींसाठी पुस्तकाला मोठा प्रतिसाद मिळाला आहे. ॲमेझॉनने याला हॉट न्यू रिलीजेस मध्ये व्यवसाय आणि आर्थिक श्रेणीत १४ व्या क्रमांकावर स्थान दिले आहे.




हे पुस्तक नेतृत्वावर एक मास्टरक्लास आहे, ज्यात लेखकाच्या ३० वर्षांहून अधिक काळातील औद्योगिक स्वयंचलन, उत्पादन, आणि जागतिक व्यवसाय नेतृत्वातील अनुभवाचा उपयोग केला आहे. सुंदररमण गणपतिरामन यांनी विविध खंडांमध्ये बहु-कार्यात्मक संघांचे यशस्वी नेतृत्व केले आहे. त्यांचे रणनीतिक दृषटिकोन अनेक यशस्वी विलीनीकरणे, अधिग्रहणे आणि जागतिक पातळीवर उत्पादन उद्योगांचा जैविक विकास साधण्यास कारणीभूत ठरले आहेत. या पुस्तकाचे कौतुक केले आहे की ते नेतृत्व कसे प्रामाणिकपणे करावे, नवोन्मेष कसा वाढवावा आणि उच्च कार्यक्षम संघ कसे निर्माण करावे यावर खोलवर प्रकाश टाकते.

EmBossed Imprints हे नेतृत्वाच्या जगात एक परिवर्तनात्मक प्रवास आहे, जे आपल्याला आपल्या स्वतः च्या अनुभवांवर विचार करण्यास आणि आपल्या करिअरला आकार देणाऱ्या अपूर्व गुणांची ओळख करून देण्यास आमंत्रित करते. औद्योगिक क्षेत्रात ३५ वर्षांच्या अनुभवावर आधारित हे पुस्तक व्यक्तिगत गोष्टींची आणि उपयोगी दृष्टिकोनांची एक अनोखी मिसळ आहे, जी आपल्याला आपल्या नेतृत्वाच्या क्षमतेला ओळखण्यास आणि विकसित करण्यास सक्षम करते.

२६ समर्पित वर्कशीट्सच्या माध्यमातून, आपण नेतृत्वाच्या विविध गुणांची तपासणी करू शकता, उदाहरणार्थ प्रामाणिकपणा आणि उत्कंठा, आणि ते कसे आपल्या सभोवतालच्या लोकांद्वारे उलगडले जातात हे समजू शकता. आपले स्वतःचे अनुभव आणि इतरांच्या प्रेरणादायी गोष्टींवर विचार करून, आपल्याला नेतृत्वाचे एक गहन ज्ञान मिळेल आणि आपली क्षमता अनलॉक करणे, ज्यामुळे आपल्याला दीर्घकालिक परिणाम साधता येईल.

स्वत:ची ओळख आणि वैयक्तिक विकासावर लक्ष केंद्रित करत, EmBossed Imprints हे प्रत्येकासाठी अनिवार्य वाचन आहे, ज्यांना त्यांचे नेतृत्व कौशल्य सुधारायचे आहे आणि स्वतःचे सर्वोत्तम रूप बनवायचे आहे.

## निरोगी आरोग्यासाठी अध्ययनासोबत क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घ्या

### जि.प.चे सीईओ मीना यांचा विद्यार्थ्यांना मोलाचा सल्ला

तभा वृत्तसेवा

कन्नड :दि.१७ डिसेंबर - तालुक्यातील भिलदरी, पिशोर ता. कन्नड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वतीने आयोजित शालेयस्तर विद्यार्थी व पालक क्रीडा स्पर्धा २०२४ चे उद्घाटन सोमवारी दि.१६ रोजी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक विकास मीना यांच्या हस्ते करण्यात आले. सुदृढ आरोग्यासाठी क्रीडा तसेच सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी व्हा, असे आवाहन मीना यांनी यावेळी विद्यार्थ्यांना केले.



भिलदरी, पिशोर येथील प्राथमिक शाळेच्या वतीने आयोजित क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटन कार्यक्रमात लेझीम पथकासह बैलगाडीतून मिरवणूक काढून सीईओ मीना यांचे स्वागत करण्यात आले.

क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटनानंतर लोकसहभागातून विद्यार्थ्यांसाठी तयार केलेल्या अभ्यासिकेची मीना यांनी पाहणी केली. राबविलेल्या उपक्रमाबद्दल शाळेतील शिक्षक, ग्रामस्थ व स्पर्धेत सहभाग घेतलेल्या पालकांचे त्यांनी कौतुक केले. विद्यार्थ्यांनी निरोगी आरोग्यासाठी अध्ययनासोबत क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घेण्याचे आवाहन मीना यांनी याप्रसंगी केले.

या वेळी गटविकास अधिकारी चंद्रहार ढोकने,नायब तहसीलदार दिलीपकुमार सोनवणे, गटविकास अधिकारी चंद्रहार ढोकणे, शिक्षणाधिकारी (प्रा) जयश्री चव्हाण, गटशिक्षणाधिकारी नीता श्रीमाळ, विस्तार अधिकारी संगीता सावळे, टी डी शिंदे, सरपंच शोभा कोटवाळ, केंद्रप्रमुख कोटावळे, मुख्याध्यापक डी. डी. चिंतामणी, शिक्षक कर्मचारी वर्ग व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मनोरंजनाची संगीतमय सफर घडवणारा 'श्री गणेशा' २० डिसेंबरला होणार प्रदर्शित

छत्रपती संभाजी नगर – कोणत्याही नवीन गोष्टीची सुरुवात 'श्री गणेशा' म्हणून केली जाते. सध्या रसिकांमध्येही अशाच एका 'श्री गणेशा'ची जोरदार चर्चा आहे. 'श्री गणेशा' हा एक आगामी मराठी चित्रपट प्रेक्षकांना मनोरंजनाच्या अनोख्या सफरीवर नेणार आहे. मराठी फॅमिली एन्टरटेनर असलेला 'श्री गणेशा' हा मराठीतील एक धमाल रोड मुव्ही आहे. या चित्रपटातील गाणी प्रेक्षकांच्या चांगलीच पसंतीस उतरली असून, ट्रेलरलाही तूफान प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे या चित्रपटात नेमके काय पाहायला मिळणार याबाबत प्रेक्षकांमध्ये उत्सुकता वाढली आहे. हा चित्रपट २० डिसेंबर रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

'श्री गणेशा' धमाल रोड ट्रीपचा आणि 'श्री गणेशा' फॅमिली एंटरटेनमेंटचा' असे म्हणत खऱ्या अर्थाने रोड ट्रीपच्या रोलर कोस्टर राईडवर नेणाऱ्या 'श्री गणेशा' या फॅमिली एंटरटेनमेंटची प्रस्तुती एमएच-१२ सिने मीडियाने आऊट ऑफ द बॉक्स फिल्म्सच्या सहयोगाने केली आहे. संजय माणिक भोसले आणि कांचन संजय भोसले या चित्रपटाचे निर्माते, तर रवि माणिक भोसले आणि महेश माणिक भोसले या चित्रपटाचे सहनिर्माते आहेत. आजवर नेहमीच आशयघन चित्रपटांना विनोदाची किनार जोडत परिपूर्ण मनोरंजनाद्वारे जनमानसापर्यंत मोलाचा संदेश पोहोचवणारे दिग्दर्शक मिलिंद कवडे 'श्री गणेशा'च्या निमित्ताने लाफ्टर आणि मॅडनेसचा डबल धमाका करणार आहेत. चित्रपटाची घोषणा झाल्यापासून हा चित्रपट कायम चर्चेत आहे. मिलिंद कवडे आणि प्रथमेश परब ही दिग्दर्शक-अभिनेत्याची सुपरहिट जोडी या चित्रपटाच्या निमित्ताने पुन्हा एकत्र आली आहे.

---

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी कन्नड तहसिल कार्यालय कन्नड जि. औरंगाबाद फोनः-०२४३५-२२१०२४**

जा.क्र. २०२३/जमा-२/कुळ / कावी-६३८ दि. २३/०८/२०२४

## जाहीर प्रगटन

सर्व ग्रामस्थ मौजे बोपेवाडी ता.कन्नड जि. औरंगाबाद यांना या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात का की. अर्जदार सरदार बालचंद चव्हाण रा नागदताना ता कन्नड जि. औरंगाबाद यांनी मौजे बोपेवाडी शिवारातील गट नं १६८ चे ७/१२ वरील स.कु एका आनंदा कुळ नोंद कमी होणे बाबत या कार्यालयास अर्ज देवून विनंती केलेली आहे.

करिता ज्या कोणास या बाबत आक्षेप असल्यास त्यांनी लेखी पुराव्यासह हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या कार्यालयास आक्षेप दाखल करावे. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेप अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

तहसिलदार कन्नड



जाहीर लिलाव

| अ.क्र. | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |
|---|---|---|---|---|---|
| 1. | [illegible] | [illegible] | 413 [illegible] | 227 [illegible] | |
| 2. | [illegible] | [illegible] | 279 [illegible] | 153 [illegible] | |
| 3 | [illegible] | [illegible] | 291 [illegible] | 160 [illegible] | |
| 4. | [illegible] | [illegible] | 355 [illegible] | 195 [illegible] | दि , 23/12/2024 |
| 5. | [illegible] | [illegible] | 398 [illegible] | 238 [illegible] | |
| 6. | [illegible] | [illegible] | 435 [illegible] | 247 [illegible] | |
| 7. | [illegible] | [illegible] | [illegible] | 80000 [illegible] | |
| 8. | [illegible] | [illegible] | 200 [illegible] | 100000 [illegible] | |

---

संचिका क्र.२०२४/उ.वि.अ.वै./एम.ए.जी./ज.मु.नोंद/सी.आर/२०२४ दिनांक :- २८/११/२०२४

## जाहीर प्रगटन

अर्जदार :- श्री/श्रीमती कार्तिक ज्ञानेश्वर हेलाडे रा. जाखमाथा ता गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

:: विरुध्द ::

गैरअर्जदार :- नगर परिषद् कार्यालय गंगापूर ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारीत २०२३) मध्ये कलम ११(२) व ३ प्रमाणे जन्म - मृत्यू नोंद बाबत.

ज्याअर्थी: अर्जदार यानी या कार्यालयास अर्जदार सवतः नामे कार्तिक ज्ञानेश्वर हेलाडे यांचा जन्म दिनांक ०४/०४/२०६ रोजी मौजे गंगापूर ता गंगापूर येथे झाला असून नाशं परिषद कार्यालय गंगापूर ता. गंगापूर येथील जन्म/मृत्यु रजिष्टरला जन्म नोंदणी करण्यासाठी आदेश होणेस अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की, सदर नोंद बाबत कोणाचा उजर, अक्षेप हरकत असल्यास त्यांनी हे प्रगटन जाहीर झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला उजर, अक्षेप हरकत या न्यायालयात लेखी स्वरुपात नोंदवावा मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही व अर्जदाराचे मागणीनुसार सदरची नोंद करण्याबाबत संबंधितांना आदेश दिला जाईल.

आज दिनांक २८/११/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

ठिकाण - वैजापूर

दिनांक :- २८/११/२०२४.

उप विभागीय अधिकारी, वैजापूर

---

## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

Civil Misc. Application No. ५७४/२०२४

संजीवनी माधवराव शेंगुळे व इतर

विरूध्द

निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज

ज्याअर्थी मयत माधव त्रिंबक शेंगुळे हे दि.१६/०९/२०२० रोजी मौजे तळपिंप्री, ता.गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु पावले असुन अर्जदार नं. १. संजीवनी माधवराव शेंगुळे, २. निलेश माधवराव शेंगुळे, ३. शैलेश माधव शेंगुळे, सर्व रा. शेंदुरवादा, ता. गंगापुर जि. औरंगाबाद यांनी मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी ॲड. श्री.पीबी.जोशी, गंगापुर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी अर्जदार नं. १ ते ३ यांना या न्यायालया तर्फे वारस प्रमाणपत्र देणे कामी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात लेखी आक्षेप स्वतः अथवा आपल्या विधीज्ञा मार्फत नोंदवावा. मुदतीचे आत आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही नियमाप्रमाणे करून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

सदरचे जाहीर प्रगटन माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस देण्यात येत आहे.

दि.१६/१२/२०२४

आदेशावरून

लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क.स्तर गंगापुर

---

## जाहीर प्रगटन

**माननिय दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर गंगापूर यांच्या न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज कं..५७२/२०२४

अर्जदार - १. जायदाबी रहेमान शेख रा. बिडकीन, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर २. गुलाब वजीर शेख रा. भोयगांव, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर ३. जोहराबी कासम शेख रा. वाळुंज, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर ४. नजीर वजीर शेख रा. भोयगांव, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर ५. रूखसाना शेख हबीब शेख रा. गारखेडा छत्रपती संभाजीनगर ता. व जि. छत्रपती संभाजीनगर ६. सलीमाबी सांडु शेख रा. वाळुंज, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर ७. दगडु वजीर शेख रा. भोयगांव, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार - निरंक

विषय - कलम २ बॉम्बे रेगूलेशन कायदयाप्रमाणे वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत....

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी ॲड. भगवान एस. शिंदे यांच्या मार्फत या मा. न्यायालयात अर्जदार यांनी वारसाचे प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केलेला आहे, सदरील अर्जात अर्जदार यांनी म्हटले आहे की, असे की, अर्जदार कं २ ते ७ हे मयत शेख वजीर शेख गुलमंहमद यांचे मुले व मुली आहेत. शेख वजीर शेख गुलमंहमद हे दिनांक ०५/१०/१९९१ रोजी मोजे भोयगांव, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार यांची आई व मयत शेख वनीर शेख गुलमंहमद यांची पत्नी नामे राशीदबी वजीर शेख हया दिनांक ०६/०५/२०१८ रोजी मयत झालेल्या आहेत. मयत शेख वजीर शेख गुलमंहमद यांना अर्जदाराशिवाय इतर कोणतेही कायदेशीर वारसादार नाहीत. अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय योजनाचा लाभ घेण्यासाठी ते मयत शेख वजीर शेख गुलमंहमद यांचे कायदेशीर वारसदार आहेत असे वारसाचे प्रमाणपत्राची अवश्यकता असल्यामुळे, त्याकामी त्यांनी मा. न्यायालयातुन कायदेशीर वारसाचे प्रमाणपत्र मिळणे कामी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार यांनी या अर्जा व्यतिरिक्त कोणत्याही न्यायालयात ते मयत शेख वजीर शेख गुलमंहमद यांचे वारसदार आसल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केलेला नाही.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांना ते मयताचे कायदेशीर वारसदार आसल्याचे प्रमाणपत्र देण्यास ज्या कोणाचा उजर व आक्षेप आसेल अशानी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत त्यांचा उजर व आक्षेप या न्यायालयात नोंदवावा. मुदतीमध्ये कोणाचा उजर व आक्षेप न आल्यास अर्जदार यांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल, मुदतीनतंर आलेला उजर व आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. पुढील तारीख १३/०१/२०२५.

आज दिनांक १७/१२/२०२४ रोजी माझ्या सही व न्यायालयाक्ष्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून

लिपिक सहायक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क-स्तर गंगापूर

---

## जाहीर प्रगटन

**माननिय दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर गंगापूर यांच्या न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज कं..५८०/२०२४

अर्जदार - सुनिता संजय सातपुते वय ४० वर्ष, धंदा घरकाम, रा. वाळुंज, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार - कौसाबाई तुकाराम सातपुते वय ६५ वर्ष, धंदा घरकाम, रा. एकलहरा, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय - कलम २ बॉम्बे रेगूलेशन कायदयाप्रमाणे वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत....

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी ॲड. भगवान एस. शिंदे यांच्या मार्फत या मा. न्यायालयात अर्जदार यांनी वारसाचे प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केलेला आहे, सदरील अर्जात अर्जदार यांनी म्हटले आहे की, असे की, अर्जदार हि मयत संजय तुकाराम सातपुते यांची पत्नी असुन व गैरअर्जदार हि मयताची आई आहे. संजय तुकाराम सातपुते हे दिनांक ०१/०४/२००२ रोजी मयत झालेले आहेत. अर्जदार व मयत संजय तुकाराम सातपुते यांचा मुलगा नामे शुभम संजय सातपुते हा दिनांक २६/१०/२०२४ रोजी मयत झालेला आहे. मयत संजय तुकाराम सातपुते यांना अर्जदाराशिवाय इतर कोणतेही कायदेशीर वारसादार नाहीत. अर्जदार अर्जासोबत मयताचे मुत्युप्रमाणपत्र व अर्जदार यांचे आधार कार्ड जोडत आहे अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय योजनाचा लाभ घेण्यासाठी ते मयत संजय तुकाराम सातपुते यांचे कायदेशीर वारसदार आहेत असे वारसाचे प्रमाणपत्राची अवश्यकता असल्यामुळे, त्याकामी त्यांनी मा. न्यायालयातुन कायदेशीर वारसाचे प्रमाणपत्र मिळणे कामी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार यांनी या अर्जा व्यतिरिक्त कोणत्याही न्यायालयात त्या मयत संजय तुकाराम सातपुते यांचे वारसदार आसल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केलेला नाही. गैरअर्जदार हया देखिल मयताच्या कायदेशीर वारसदार आहेत, परंतु त्यांनी सदरील अर्जावर सही करण्यास नकार दिल्यामुळे त्यांना सदरील प्रकरणात गैरअर्जदार म्हणुन समाविष्ठ करण्यात आलेले आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांना ते मयताचे कायदेशीर वारसदार आसल्याचे प्रमाणपत्र देण्यास ज्या कोणाचा उजर व आक्षेप आसेल अशानी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत त्यांचा उजर व आक्षेप या न्यायालयात नोंदवावा. मुदतीमध्ये कोणाचा उजर व आक्षेप न आल्यास अर्जदार यांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल, मुदतीनतंर आलेला उजर व आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. पुढील तारीख १७/०१/२०२५.

आज दिनांक १७/१२/२०२४ रोजी माझ्या सही व न्यायालयाक्ष्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून

लिपिक सहायक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क-स्तर गंगापूर

---

**मा. दिवाणी न्यायाधीश, क-स्तर सोयगाव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**

## जाहीर प्रगटन

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १८१/२०२४

अर्जदार : १. कौतिक सखाराम गडवे, वय ४८ वर्ष, धंदा-शेती, रा. वडगावकडे, ता. पाचोरा, जि. जळगाव. २. शशिकलाबाई छगनराव जमधडे, वय ६० वर्ष, धंदा घरकाम, रा. सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद. (छत्रपती संभाजीनगर) ३. अलकाबाई आनंदा इंगळे, वय ४७ वर्ष, धंदा घरकाम, रा. वडगावकडे, ता. पाचोरा, जि. जळगाव. ४. छोटीबाई अनिल सोनवणे, वय-४२ वर्ष, धंदा घरकाम रा. बनोटी, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद, छत्रपती संभाजीनगर ५. उषाबाई शिवाजी गायकवाड, वय ५१ वर्ष, धंदा- घरकाम, रा. बनोटी, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद. छत्रपती संभाजीनगर ६. आशाबाई वामन मोरे, वय-५५ वर्ष, धंदा-घरकाम रा. वडगावकडे, ता. पाचोरा, जि. जळगाव.

विरुध्द

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते कि, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. ए. व्ही. जाधव, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत यशोदाबाई सखाराम गडवे हे दिनांक ३०/०७/२०२२ रोजी वडगावकडे, ता. पाचोरा जि. जळगाव. येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे कै. यशोदाबाई सखाराम गडवे यांच्या गट क्र. ४३ मौजे घोसला शिवार, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर). मधील नावे असलेल्या ०० हे. २७ आर. ०७ आर. पोटखराबसह चे कायदेशीर वारस आहेत असा वारस दाखला मिळावा. असा अर्ज न्यायालयात वकिलामार्फत दाखल आहे. अर्जदार हे मयत यशोदाबाई सखाराम गडवे यांचे वारस असून त्यांना मयत यशोदाबाई सखाराम गडवे यांच्या नावे असलेल्या वरील मिळकतीच्या वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरिता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख १६/११/२०२४

आज दिनांक १२/१२/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

आदेशावरून

विभागीय लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क-स्तर सोयगाव

---

## जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी- १/जन्म-मृत्यु नोंद/सिआर-६७५

उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड

दिनांक ३०/०९/२०२४

अर्जदार : प्रकाश नथ्थू महेर रा. बालखेडा ता. कन्नड जि.छ.संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : ग्रामपंचायत कार्यालय गणेशपूर ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय : जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या मुलगाच्या जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या मुलगाचा जन्म दिनांक १४-१०-२००८ रोजी गणेशपूर ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलगाचा जन्म दिनांक १४-१०-२००८ रोजी गणेशपूर ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलगाचा जन्म दिनांक १४-१०-२००८ रोजी गणेशपूर येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक ३०-१०-२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक १४-१०-२००८ रोजी गणेशपूर येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक ३०/०९/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

---

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर.**

दि.कि.अर्ज क. ५७१/२०२४

अर्जदार :- १. सुभद्राबाई भ्र. छबुराव आहिरे, वय ७१ वर्ष, रा. हनुमंतगाव, ता. राहाता, जि. अहमदनगर, ह.मु. पखोरा, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर, २. मिरा भ्र. माधव बर्डे, वय ५३ वर्ष, रा. अश्वी बु. ता. संगमनेर, जि. अहमदनगर, ३. ताराबाई पि. छबुराव, वय ५० वर्ष, रा. हनुमंतगाव, ता. राहाता, जि. अहमदनगर, ४. ज्ञानेश्वर पि. छबुराव आहिरे वय ४४ वर्ष. रा. वरील प्रमाणे, ५. ज्योती भ्र. गणेश आहिरे, वय ३६ वर्ष, रा. वरील प्रमाणे, ६. वृषाली पि. गणेश आहिरे, वय १८ वर्ष, रा. वरील प्रमाणे, ७. रूतुजा पि. गणेश आहिरे, वय १६ वर्ष, अज्ञान अ.पा.क. अर्जदार क. ५ ज्योती भ्र. गणेश आहिरे, रा. वरील प्रमाणे, ८. ओम पि. गणेश आहिरे, वय १४ वर्ष, अज्ञान अ.पा.क. अर्जदार क. ५ ज्योती भ्र. गणेश आहिरे, रा. वरील प्रमाणे,

विरूध्द

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण :- हेअरशिप व सक्सेशन प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात हेअरशिप व सक्सेशन प्रमाणपत्र मिळणे कामी त्यांचे विधिज्ञ ॲड.एस. के. नरोडे यांचे मार्फत अर्ज दिला की, अर्जदार क. १ ही अर्जदार २ ते ४ यांची आई असुन अर्जदार क. १ चा दुसरा मुलगा नामे गणेश पि. छबुराव आहिरे हा मयत असुन अर्जदार क. ५ ही मयत गणेश याची पत्नी असुन अर्जदार क. ६ ते ८ हे मयत गणेश व अर्जदार क. ५ ज्योती यांची मुले आहेत. अर्जदार क. १ चे पती म्हणजेच अर्जदार क. २ ते ४ यांचे वडील नामे छबुराव पि. बाबुराव आहिरे हे दिनांक १९/१२/२०२३ रोजी मयत झालेले आहेत. मयत छबुराव यांचे आई वडील पुर्वीच मयत झालेले आहेत. मयत छबुराव यांना अर्जदार हे एकमेव वारस असुन असुन त्यांच्या शिवाय इतर कुणीही वारस नाहीत. अर्जदारांना शासकिय कार्यालयीन कामाकरीता ते मयत छबुराव पि. बाबुराव आहिरे यांचे वारस असल्याचे हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तसेच मयत छबुराव यांच्या दि. औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. शाखा कायगाव ता. गंगापुर या बँकेत बचत खाते क. ००९१११००२००४८३१ हे असुन त्यामध्ये रक्कम रूपये ४८,८८१/- तसेच दि. अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. शाखा सोनगाव ता. राहुरी, जि. अहमदनगर या बँकेत बचत खाते क. ०१७४१००१८००१६५१ हे असुन त्यामध्ये रक्कम रूपये ८२,३३४/- ऐवढी रक्कम असुन ती प्राप्त करण्या करीता अर्जदारांना सक्सेशन प्रमाणपत्राची गरज आहे.

त्या अर्थी तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जास कोणाचाही काहीही आक्षेप उजर असल्यास संबंधीतांनी त्यांचा आक्षेप या न्यायालयात व्यक्तीश अथवा विधीज्ञांमार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांना नियमाप्रमाणे त्यांचे मागणीनुसार हेअरशीप व सक्सेशन प्रमाणपत्र जारी करण्यात येईल करीता हे जाहीर प्रगटन माझ्या सही व शिक्याने आज दिनांक १६/१२/२०२४ रोजी दिले.

आदेशानुसार

सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर, ता. गंगापुर

---

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. एस. वाय. वाकचौरे, ३ रे सह. दिवाणी न्यायाधिश, (क. स्तर) न्यायालय गंगापूर**

सिव्हील एम.ए. क्रं. ५७५/२०२४

प्रकरणात पुढील तारीख ०१/०२/२०२५

अर्जदार -१) संतोष पिता राजेश बागुल वय ३२ वर्षे, धंदा मजूरी रा. गोपीनाथ नगर, लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद मो. नं. ९५७९४७६३५३ २) अनिता भ्र. चंद्रमणी पठारे वय २९ वर्षे, धंदा घरकाम रा. विठ्ठलनगर, लोहगांव, ता. राहता जि. अहमदनगर ३) सुनिता भ्र. निलेश पाईकडे वय २७ वर्षे, धंदा घरकाम रा. २७९, स्मशान मारूती मार्ग, दादा कॉलनी, ता. जि. औरंगाबाद ४) कुणाल पिता राजेश बागुल वय २५ वर्षे, धंदा मजूरी रा. गोपीनाथ नगर, लासुर स्टेशन, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद ५) केसरबाई भ्र. तानाजी बागुल वय ७८ वर्षे, धंदा घरकाम रा. गोपीनाथ नगर, लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद

// विरूध्द //

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते उपरोक्त अर्जदारांनी या न्यायालात ॲड. आसिफ आय. शहा रा. लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद यांच्या मार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट / वारसप्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्रं. १ ते ५ हे वरील नमुद ठिकाणचे कायमस्वरूपी राहणारे आहे. अर्जदार क्रं. १ ते ४ हे आपसात सख्खे भाऊ व विवाहीत बहिणी असून अर्जदार क्रं. ५ ही अर्जदार क्र. १ ते ४ यांची आजी आहे. अर्जदार क्रं. १ ते ४ यांचे वडील व अर्जदार क्रं. ५ यांचा मुलगा नामे राजेश तान्हा उर्फ तानाजी बागुल हे दिनांक १४/०५/२०२१ रोजी मौजे हर्सुल, लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्रं. १ ते ४ यांची आई व अर्जदार क्रं. ५ यांची सुन नामे उषाबाई राजेश बागुल दिनांक ३०/०१/२०१२ रोजी मौजे हर्सुल, लासुर स्टेशन ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झालेली आहे. तसेच अर्जदार क्रं. १ ते ४ याचे आजोबा व अर्जदार क्रं. ५ यांचे पती नामे तान्हा उर्फ तानाजी बागुल हे सुध्दा बऱ्याच वर्षापुर्वी मयत झालेले असून मयत राजेश तान्हा उर्फ तानाजी बागुल यांना अर्जदार क्रं. १ व ४ मुले, अर्जदार क्रं. २ व ३ मुली आणि अर्जदार क्रं. ५ आई या नात्याने कायदेशीर वारसदार असून मयतास अर्जदार क्रं. १ ते ५ यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत राजेश तान्हा उर्फ तानाजी बागुल यांच्या मृत्युमुळे अर्जदारांना शासकिय, निमशासकिय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला असून वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिद झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या उजर, आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. करीता जाहीर प्रगटन. आज दिनांक १७/१२/२०२४ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून

लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क.स्तर गंगापूर

---

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगाव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)**

## जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २०७/२०२४

१/- शिलाबाई वाळू करवंदे, वय ४५ वर्ष, धंदा घरकाम, रा. वडगाव तिग्जी, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर. २/- पिंटू वाळू करवंदे, वय ३६ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ३/- रामदास वाळू करवंदे, वय ३१ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ४/- योगेश वाळू करवंदे, वय २८ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरूद्ध

कुणीही नाही

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. सचिन सु. गिरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत वाळू पुंडलिक करवंदे यांचा दि. ०४.०८.२०२४ रोजी मौजे नगरदेवळा, ता. पाचोरा, जि. जळगाव येथे मयत असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ४ एकमेव हे वारस आहेत, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. १ ते ४ यांनी मयत वाळू पुंडलिक करवंदे यांचे वारस असुन त्यांना मयत वाळू पुंडलिक करवंदे यांचे शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. आजरोजी दि. ६/११/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता.१७/१/२०२५

आदेशावरुन

क. लिपीक सहायक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)

---

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर गंगापुर, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर.**

दि.कि.अर्ज क.५७३/२०२४

अर्जदार : १. कांताबाई भ्र. कैलास बोरकर, वय ५६ वर्षे, धंदा घरकाम, रा. दायगाव, लासुर स्टेशन ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर, २. कविताबाई भ्र. रमेश शिंदे वय ३२ वर्ष, धंदा घरकाम, रा. गोयगाव, हिंगोणी ता. वैजापुर, जि. छत्रपती संभाजीनगर, ३. शितल भ्र. संदीप औटे, वय ३० वर्ष, धंदा घरकाम, रा. तिसगाव, ता. जि. छत्रपती संभाजीनगर, ४. योगेश पि. कैलास बोरकर, वय २६ वर्ष, धंदा शेती, रा. दायगाव, लासुर स्टेशन, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण :- हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणे कामी त्यांचे विधिज्ञ ॲड. एस. के. नरोडे यांचे मार्फत अर्ज दिला की, अर्जदार क. १ ही अर्जदार क. २ ते ४ ची आई असुन अर्जदार क. १ चे पती म्हणजेच अर्जदार क. २ ते ४ चे वडील नामे कैलास पि. सुखदेव बोरकर, हे दिनांक ०७/०५/२०२१ रोजी मौजे दायगाव, ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झाले असुन त्यांचे पाठीमागे अर्जदार हे एकमेव वारस आहेत. मयत कैलास बोरकर यांचे आई वडील हे दोघेही मयत झालेले आहेत. अर्जदारांना शासकीय कामाकरीता ते मयत कैलास पि. सुखदेव बोरकर यांचे एकमेव वारस असल्याबाबत हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्या अर्थी तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जास कोणाचाही काहीही आक्षेप उजर असल्यास संबंधीतांनी त्यांचा आक्षेप या न्यायालयात व्यक्तीश अथवा विधीज्ञांमार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांना नियमाप्रमाणे त्यांचे मागणीनुसार हेअरशिप प्रमाणपत्र जारी करण्यात येईल करीता हे जाहीर प्रगटन माझ्या सही व शिक्याने आज दिनांक १२/१२/२०२४ रोजी दिले.

आदेशानुसार

सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर, ता. गंगापुर

---

## जाहीर प्रगटन

**मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात.**

दि.कि. अर्ज नं. ३४९/२०२४

अर्जदार : १. तुकाराम पि. शेकुबा गुंजाळ, वय ५० वर्ष, धंदा शेती, रा. रेल, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. २. लक्ष्मण पि. शेकुबा गुंजाळ, वय ४८ वर्ष, धंदा शेती, रा. रेल, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ३. मंगल पि. शेकुबा गुंजाळ, वय ४५ वर्ष, धंदा शेती, रा. रेल, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ४. ज्ञानेश्वर पि. शेकुबा गुंजाळ, वय ४२ वर्ष, धंदा शेती, रा. रेल, ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन

प्रकरण : अर्जदार नं. १ ते ४ हे मयत शेकुबा रघुबा गुंजाळ व बायजागाई शेकुबा गुंजाळ यांचे कायदेकशीर वारस आहे असे वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी या न्यायालयात ॲड. संजय एस. बोरसे, कन्नड यांचे मार्फत अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार नं. १ ते ४ यांचे वडील हे मयत शेकुबा रघुबा गुंजाळ हे होते व ते मौ. रेल, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. येथील रहीवासी होते. ते अल्पश्या आजाराने दि. ५/३/२०२२ मध्ये मयत झालेले आहेत. त्यांना कायदेशीर वारस त्यांची पत्नी मयत बायजाबाई शेकुबा गुंजाळ व तीन मुले, एक मुलगी अर्जदार नं. १ ते ४ हे होते व आहेत. सदर वारसांव्यतीरीक्त इतर कोणीही वारस नाहीत. तसेच मयत बायजाबाई शेकुबा गुंजाळ हया ही मौ. रेल, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. येथील रहीवासी होत्या. त्या अल्पश्या आजाराने दि. १७/८/२०२२ मध्ये मयत झालेल्या आहेत. त्यांनाही अर्जदार नं. १ ते ४ हे कायदेशीर वारस आहेत. सदर वारसांव्यतीरीक्त इतर कोणीही वारस नाहीत. त्याबाबत त्यांचे मृत्यु प्रमाण पत्र सोबत दाखल केले आहे.

तसेच सदर वारसप्रमाण पत्राची शासकीय व निमशासकीय कार्यालयात तसेच शासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी व अन्य कामा करीता वारस प्रमाण पत्र हे अर्जदार नं. १ ते ४ यांच्या नावे देण्यात यावे. अर्जदार नं. १ ते ४ हे एकाच कुंटुंबातील असल्यामुळे त्याचे आपसात सलोख्याचे, प्रेमाचे, चांगले संबंध आहे. अर्जदार नं. १ ते ४ यांच्या नावे सदर वारस प्रमाण पत्र मिळण्याबाबत अर्जदार नं. १ ते ४ यांची स्वइच्छेप्रमाणे संमंत्ती आहे. ज्या कोणाचा उजर आक्षेप असेल तर त्याने आपला उजर व आक्षेप सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्दीपासुन ३० दिवसाच्या आत मुळ कागदपत्रांसह लेखीस्वरुपात या न्यायालयात नोंदवावा मुदतीत कोणताही उजर व आक्षेप न आल्यास मयत अर्जदार नं. १ ते ४ हे मयत शेकुबा रघुबागुंजाळ व मयत बायजाबाई शेकुबा गुंजाळ यांचे कायदेकशीर वारस आहे यांचे कायदेशीर वारस आहेत. या बाबत अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदती नंतर आलेला उजर व आक्षेप विचारात घेतला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

आज दि २८/११/२०२४ रोजी माझ्या सही निशी व न्यायालयाच्या शिक्या निशी दिले.

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक. सहा. अधिक्षक

सह दिवाणी न्यायालय, क. स्तर, क ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

---

## जाहीर प्रगटन

**मेहेरबान दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कन्नड (व्हि. एन. काटकर) यांच्या कोर्टात.**

दिवाणी अर्ज क्र- २६६/२०२४

अर्जदार : १. इंदुबाई भ्र. पोपट सुर्यवंशी, वय ७८ वर्षे, धंदा - घरकाम, रा. बेलखेडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद २. अशोक पिता पोपट सुर्यवंशी, वय- ५२ वर्षे, धंदा - मजुरी, रा. बेलखेडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद ३. लताबाई भ्र. प्रकाश पाटील, वय ४७ वर्षे, धंदा - घरकाम, रा. निंभोरा ता. भडगांव जि. जळगांव

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे- जिल्हा अधिकारी औरंगाबाद.

अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७चे कलम ३ प्रमाणे कायेदशीर वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी तमाम जनतेस कळवीण्यात येते की, वरील अर्जदार क्र. १ ते ३ यांनी ॲड. एन. बि. थोरात कन्नड यांच्या मार्फत न्यायालयात अर्ज सादर केला की, मयत पोपट पिता चिंधा सुर्यवंशी हे अर्जदार नं. २ व ३ यांचे वडील असुन अर्जदार नं. १ ही त्यांची धर्मपत्नी असुन अर्जदार नं. २ व ३ यांची जन्मदाती आई आहे. मयत पोपट पिता चिंधा सुर्यवंशा हे आजारपणाने दिनांक. १८.०९.२०२३ रोजी मौजे बेलखेडा येथे मयत झालेले आहे. मयत पोपट पिता चिंधा सुर्यवंशी यांना अर्जदारांच्या व्यतीरीक्त ईतर कोणीही कायदेशीर वारस नाही. पोपट पिता चिंधा सुर्यवंशी हे मयत झाल्यामुळे त्यांच्या पश्चात शासकीय कामे करण्यासाठी तहसील कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गांव, नगर व शहर भुमापन कार्यालय, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय, विविध बैंक राष्ट्रीयकृत बँकेच्या कामासाठी व ईतर शासकीय व निमशासकीय कार्यालयात कामे करण्यासाठी वारस प्रमाणपत्र आवश्यकता असल्यामुळे सदरील अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. ज्यामुळे अर्जामध्ये कायदेशीर वारस प्रमाणपत्राची मागणी अर्जामध्ये केली आहे.

त्याअर्थी सदरील अर्जाबाबत कोणाचा काही उजर आक्षेप असल्यास सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत कोर्टात सादर करावा कोणाचा उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करून अर्जदार नं. १ ते ३ च्या हक्कात कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन

दिनांक २२/११/२०२४

आदेशावरुन

क. लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायाधीश क. स्तर कन्नड

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### मानोली येथे शेतकऱ्यांचे पंचप्राण स्व.शरद जोशी यांना अभिवादन

**मानवत,/प्रतिनिधी-** तालुक्यातील मौजे मानोली येथे शेतकऱ्यांचे पंचप्राण शेतकरी संघटनेचे नेते स्व, शरद जोशी यांच्या स्मृती दिनानिमित्त गावातील शेतकरी व नागरिकाच्या वतीने सर्वपक्षीय अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला.

या कार्यक्रमात स्व, शरद जोशी यांच्या प्रतिमेचे पूजन करून प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मानोली मध्ये शेतकरी संघटनेचे मोठे केंद्रस्थान आहे शेतकरी संघटनेचे नेते स्व, शरद जोशी यांनी स्वत मानोली येथे उपस्थित राहून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले आहे शरद जोशी यांचा मृत्युादिन त्यााच्या आठवणींना उजाळा देऊन साजरा करण्यात आला. यावेळी पंडितराव शिंदे पाटील, रामभाऊ शिंदे पाटील , मदन महाराज शिंदे पाटील, गणेश घाडगे पाटील, सोपानराव शिंदे पाटील, दत्ता मांडे पाटील, उद्धवराव सुरवसे पाटील, उद्धवराव शिंदे पाटील, सुदामराव शिंदे पाटील, भागवतराव शिंदे पाटील, पुरुषोत्तमराव शिंदे पाटील पत्राकार वसंतराव मांडे पाटील व गावातील शेतकरी व नागरिक या वेळी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते यावेळी अनेकांनी मा. स्व, शरद जोशी यांच्या जिवनातील अनेक प्रसंगावर प्रकाश टाकला तर तर शेतकऱ्यांच्या जिवनात कृषि क्रांती कशी येईल या संबंधीचे स्वप्न मा. शरद जोशी यांनी पाहिले होते.

### सूर्यवंशी यांच्या मूत्यूप्रकरणी मानवत पोस्टेला निवेदन

**मानवत / प्रतिनिधी-** परभणी प्रकरणातील सोमनाथ व्यंकट सुर्यवंशी या एल. एल. बी. शिक्षण घेत असलेल्या तरूणाचा जेल मध्ये मृत्यू झाल्याची माहिती मानवत मध्ये कळताच शहरातील शाहू फुले आंबेडकर मंच च्या वतीने शासकीय विश्रामगृह येथे बैठक घेण्यात आली.

या बैठकीत भीमसैनिक सोमनाथ सुर्यवंशी यास श्रद्धांजली वाहून मानवत तहसीलदार व मानवत पोलीस स्टेशन येथे येऊन निवेदन देण्यात आले यावेळी छगन भंदगे, शैलेश वडमारे ,जनार्दन किर्तने,अंनत भदर्गे, दिपक ठेगे, रवी पंडित, नागसेन भदर्गे,राजू खरात, दशरथ शिंदे, संपत पंडित ,चंद्रकांत मगर, नितीन गवळी, शेख वाजेद, राहुल कुंभकर्ण, विजय खरात ,बालाजी बिडवे दादा भदर्गे,आनरूध भाले ,यशपाल पंडित. आंनद वाघमारे, प्रधान कांबळे, गजानन बनसोडे, विनोद रनदिवे महेंद्र ठेगे एकनाथ धबडगे, शहरातील भीमसैनिकांची यावेळी मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### प्रा.डॉ.सुनित वानखेडे यांना विद्यापीठाचा उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार

**परभणी/ प्रतिनिधी-** पशु वैद्यक व पशु विज्ञान महाविद्यालयातील पशु पोषणशात्र विभागाचे विभाग प्रमुख प्राध्यापक डॉ. सुनित वानखडे यांना महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचा उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार प्राप्त झाला असून दिनांक ३ डिसेंबर २०२४ रोजी महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाच्या वर्धापन दीना निमित्त विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. नितिन पाटील यांच्या हस्ते उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. शिरीष उपाध्ये, संशोधन संचालक डॉ. नितिन कुरकुरे, विस्तार शिक्षण संचालक डॉ. अनिल भिकाने तसेच विद्यापीठाचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. प्रा. डॉ. सुनित वानखडे यांना विद्यापीठाचा उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार प्राप्त झाल्या बद्दल सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुधीर राजूरकर तसेच महाविद्यालयातील अधिकारी आणि कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाईत महाराष्ट्रात यावर्षी ६१७ जण सापळा कारवाईत अडकले जाळ्यात

## गुन्हे झाले दाखल, गतवर्षीच्या तुलनेत यावर्षीची संख्या कमी

**मोहन धारासूरकर**

**परभणी,/प्रतिनिधी:** महाराष्ट्रातील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने संपुर्ण महाराष्ट्रात लाच स्विकारताना सापळा रचून यशस्वी कारवाईत ६१७ जाणावर गुन्हे दाखल केले .दि.१ जानेवारी ते दि.२६ नोव्हेंबर २०२४ दरम्यान १० महिने २६ दिवसात ही कारवाई झाली. गतवर्षी दि.१ जानेवारी ते दि.२६ नोव्हेंबर २०२३ मध्ये ७३० जणावर सापळा रचून यशस्वी कारवाईत त्याा लाचखोरावर गुन्हे दाखल झाले होते. गतवर्षी पेक्षा या वर्षीची संख्या कमी आहे.

लाचखोरीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.भष्ट्रचार कमी करण्यासाठी महाराष्ट्रात एकुण लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे परीक्षेत्र ८ आहेत. लाचलुचपत पिरीक्षेत्रात दि.१ जानेवारी २०२४ ते दि.२६ नोव्हेंबर २०२४ या १० महिने २६ दिवसात ६१७ जणावर लाचलुचपतचा गुन्हा दाखल केला. सापळा रचून कारवाई यशस्वी केली मात्र गतवर्षीच्या तुलनेत १३० कारवाया कमी आहेत. लाचलुचपत प्रतिबंधक परिक्षेत्र नुसार केलेल्या कारवाई मध्ये मुंबई विभागात ३३, ठाणे विभागात ५९, पुणे विभागात ११९, नाशिक विभाग १३२, नागपुर विभागात ५७, अमरावती विभागात ६२, छत्रपती संभाजीनगर विभाग १०३, नांदेड परिक्षेत्र विभागात ५२ अशा एकुण ६१७ जणावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई केली.

जिल्हानिहाय लाचलुचपत सापळा यशस्वी करून गुन्हे दाखल केलेली संख्या पुढील प्रमाणे आहे.यात एकुण ८ लाचलुचपत प्रतिबंधक परिक्षेत्रात ३६ जिल्हाचा समावेश आहे. जिल्हानिहाय कारवाई या प्रमाणे मुंबई ३३, ठाणे परीक्षेत्र ठाणे ३२, पालघर ९, नवी मुंबई ७, रायगड ७, रतागीरी ३, सिंधुदुर्ग १, अशा एकुण ५९ जणावर कारवाई केल्या आहेत.

पुणे परिक्षेत्रात पुणे ५४, सातारा १२, सांगली ११, सोलापूर २३, कोल्हापूर १९, अशा पुणे परिक्षेत्रात एकुण ११९ सापळा रचून कारवाई केली.लाचखोरावर गुन्हे दाखल केले आहेत. नाशिक परिक्षेत्रात नाशिक जिल्हात ५४, अहमदपुर २३, नंदुरबार १२, जळगाव ३०, धुळे २०, नाशिक परिक्षेत्रात एकुण १३२ जणावर लाचखोरीचे गुन्हे दाखल केले. नागपूर परिक्षेत्र नागपुर १५, गडचिरोली ७ , भंडारा ८, वर्धा ७, गोदीया १०, चंद्रपुर १०, या नागपुर परिक्षेत्रात एकुण ५७, लाचखोरावर गुन्हे दाखल झाले. अमरावती लाचलुचपत प्रतिबंधक परिक्षेत्रात अमरावती १८, अकोला १२, यवतमाळ १३, बुलढाणा ११, वाशिम ८, अशी अमरावती परिक्षेत्रात एकुण ६२ जाणावर सापळा कारवाई यशस्वी करून गुन्हे दाखल केले.छत्रपती संभाजीनगर विभागात छत्रपती संभाजीनगर ३८, जालना २०, बीड २२, धाराशिव २३ अशी छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्रात १०३ लाचलुचपत कारवाई करून गुन्हे दाखल केले. नांदेड परिक्षेत्रात नांदेड १७, परभणी १२, लातुर १४, हिंगोली ९ अशी नांदेड परिक्षेत्रात ५२ अशा नांदेड परिक्षेत्रात एकुण ५२ जणांवर लाचखोरीची कारवाई केली.

बॉक्स- महाराष्ट्रात नाशिक परिक्षेत्रात सर्वात जास्त १३२ लाचलुचपत कारवाई केली. सर्वात कमी नांदेड परिक्षेत्र कारवाई झाल्या आहेत. नांदेड परिक्षेत्र ५२ कारवाई केल्या आहेत. गतवर्षी २०२३ मध्ये ७३० लाचलुचपतच्या जाळ्यात अडकले होते.२०२४ मध्ये ६१७ जण लाचलुचपत जाळ्यात अडकले.गतवर्षीपेक्षा १३० कारवाई कमी झाल्या आहेत. २०२४ मध्ये लोकसभा आणी विधानसभा निवडणूक झाल्याने सर्वाधीक काळ आचारसंहित गेला.शासकीय कर्मचारी याना प्रतिनियुक्तीवर निवडणूकीची कामे लागल्याने लाचलुचपत प्रकरण गतवर्षी पेक्षा कमी झाले असावेत.

## वाकोडे यांचे ऱ्हदयविकाराने तीव्र झटक्याने निधन

**परभणी,/प्रतिनिधी:** विजय भारतीय रिपब्लिकन सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष तथा आंबेडकरी चळवळीतील संघर्षशील नेतृत्व विजय वाकोडे यांचे सोमवारी (दि.१६) रात्री ऱ्हदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी ते ६३ वर्षांचे होते. या घटनेने सर्वांना मोठा धक्का बसला आहे.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोरीलडॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळा परिसरातील संविधानाच्या प्रतिकृतीच्या काचेची तोडफोड करीत संविधानाचा अवमान केल्याची घटना १० डिसेंबर रोजी घडली. घटना घडल्या बरोबर ज्येष्ठ नेते वाकोडे यांनी घटनास्थळी धाव घेतली व तेथील स्फोटक परिस्थिती तात्काळ ओळखून तातडीने अत्यांत संयमाची भूमिका घेतली. दुसऱ्या दिवशीसुद्धा या घटनेच्या निषेधार्थ पुकारलेल्या बंदच्या आंदोलनात दरम्यान वाकोडे यांनी संपूर्ण बंद शांततेत आणि सुरळीतपणे पार पडावा या दृष्टिकोनातून प्रयत केले. अति उत्साही कार्यकर्त्यांना आवरण्याचा प्रयत केला. दरम्यान या घटनेच्या



पार्श्वभूमीवर पोलीस दलाने ठिकठिकाणी केलेल्या बळाच्या वापराबद्दल तसेच गेल्या दोन दिवसात पोलिसांनी केलेल्या कोम्बिंग ऑपरेशनचा तीव्र शब्दात निषेध केला. पोलिसांच्या मारहाणीत कारागृहात मृत्युमुखी पडलेल्या सूर्यवंशी या युवकाच्या निधनानंतर वाकोडे यांनी आक्रमक भूमिका घेवून मृतदेहाचे शवविच्छेदन छत्रपती संभाजीनगरला करावे, अशी मागणी केली होती. तसेच आज सोमवारी दिवसभर पुकारलेल्या राजव्यापी बंदच्या दरम्यान येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आयोजित केलेल्या धरणे आंदोलनात ठाण मांडून वाकोडे यांनी या घटनेत न्यायालयनीय चौकशीकरावीअशीमागणीकेली.

सायंकाळी ६.३० वाजता सूर्यवंशी यांच्या अंत्याविधीत यात्रेत तसेच अंत्यासंस्कारात सहभाग नोंदवून ते घरी परतत असतांना प्रकृती अस्वस्थ वाटू लागल्याने कार्यकर्त्यांच्या मदतीने वाकोडे यांनी एका खाजगी रुग्णालयात धाव घेतली, परंतु उपचार सुरू असतांनाच त्यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले, अशी माहिती हाती आली आहे. दरम्यान, वाकोडे यांच्या निधनाच्या वृत्ताने आंबेडकरी चळवळीसह सर्व क्षेत्रातील नागरीकांना मोठा धक्का बसला आहे. परिवर्तनवादी चळवळीतील शिलेदार गेल्या चार दशकांपासून आंबेडकरी चळवळीतील एक महत्वाचे नाव म्हणून विजय वाकोडे संपूर्ण मराठवाडाच नव्हे तर मराठवाड्याबाहेरही परिचित होते.

## सोमनाथ एक लढणारा योध्दा : प्रकाश आंबेडकर यांचे प्रतिपादन

**पालम,/प्रतिनिधी-** सोमनाथ सुर्यवंशी हा एक लढणारा योध्दा भीमसैनिक आपल्यातून निघून गेला आहे. परंतु, आपण भावनेवर नियंत्रण ठेवायला हवे. आंबेडकरी तरुणांनी व्यसनं सोडावीत, स्वतः ला मजबूत करावे आणि पोलीस खात्याात मोठ्या संख्येने जाण्याची तयारी ठेवावी, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी केले.

सोमनाथ व्यंकटराव सुर्यवंशी (वय ३५) यांचा रविवारी पहाटे न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाला. या घटनेच्या निषेधार्थ सोमवारी (दि.१६) महाराष्ट्र बंदची हाक देण्यात आली. त्याा आवाहनास प्रतिसाद देत परभणी शहरात बाजारपेठा पूर्णतः बंद ठेवून कडकडीत बंद पाळण्यात आला. तसेच येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा परिसरातील आंदोलन मैदानात धरणे आंदोलनही करण्यात आले. त्याासाठी मंडप उभारण्यात आला. या ठिकाणी मोठ्या संख्येने नागरीक सहभागी झाले होते. यावेळी व्यासपीठावरून आंबेडकरी चळवळीतील मान्यवर नेत्याांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर, वडार समाजाचे नेते विजय चौगुले, विजय वाकोडे, भीमराव हत्तीअंबीरे, सिद्धार्थ हत्तीअंबीरे, रवी सोनकांबळे, सुधीर साळवे, संजय सारणीकर, बाळासाहेब भराडे यांच्यासह आंबेडकरी चळवळीतील जनसमुदाय उपस्थित होता.




**परभणी- शहरात घडलेल्या त्या घटनेच्या पार्श्वभुमीवर पोलिसांच्यावतीने मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. यावेळी शहरातील मुख्य बाजारपेठेमधून पोलिसांच्यावतीने चोख असा पहारा देण्यात येत होता.**

## ज्ञानसाधना प्रतिष्ठान येथे सायंटिस्ट आपल्या भेटीला या नाविन्यपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी:** ज्ञानसाधना प्रतिष्ठान अंतर्गत रायरेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये वर्ग आठवी ते अकरावीच्या विद्यार्थ्यांसाठी सायंटिस्ट आपल्या भेटीला या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होण्यासाठी तसेच विज्ञानातील काही पायाभूत संकल्पनांचे आकलन होण्यासाठी वेगवेगळे उपक्रम घेतले जातात. सायंटिस्ट आपल्या भेटीला हा त्याातीलच एक उपक्रम आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा मार्गदर्शक म्हणून माननीय श्री धनंजय रावल सर (शास्त्राज्ञ , सायन्स कम्युनिकेशन व संचालक अंकुर हॉबी सेंटर अहमदाबाद) हे उपस्थित होते. यासोबतच या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून संस्थेच्या सचिव माननीय प्रा .सौ शीतल सोनटक्के मॅडम उपस्थित होत्याा. कार्यक्रमाच्या



प्रास्ताविकातून माननीय सौ.शीतल सोनटक्के मॅडम यांनी ज्ञानसाधना प्रतिष्ठान हे नेहमी विज्ञानाचा पुरस्कार करते त्याासोबतच विद्यार्थ्यांनी आपल्या सभोवतालच्या अनेक गोष्टीतून विज्ञान कसे सहज अवगत केले पाहिजे, तसेच विद्यार्थ्यांनी नेहमी संशोधक व जिज्ञासू कसे बनले पाहिजे याबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले. मुलाने नेहमी प्रत्योक गोष्टीचा विज्ञानातून विचार केला पाहिजे असे त्याांनी यावेळी सांगितले.

माननीय धनंजय रावल यांनी विद्यार्थ्यांना निरीक्षणातून विज्ञान कसे शिकले पाहिजे. तसेच ॲस्ट्रॉनॉमी या शाखेचे व यातील विविध संकल्पनांचे सखोल मार्गदर्शन केले. यासाठी त्याांनी अनेक उदाहरणे व दाखले दिले. विविध छोट्या छोट्या प्रयोगातून व ॲक्टिव्हिटी मधून मुलांच्या अनेक बेसिक संकल्पना स्पष्ट केल्या. या कार्यक्रमांमध्ये घेण्यात आलेल्या ॲक्टिव्हिटी मध्ये मुलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला सोबतच अतिशय चांगला प्रतिसाद दिला. हसत खेळत सहज साध्या साध्या गोष्टी मधून आपण कसे विज्ञान शिकू शकतो याचे अनेक दैनंदिन जीवनातील उदाहरणे त्याांनी दिली. मुलांच्या संशोधक वृत्तीला चालना मिळण्यासाठी त्याांच्या अनुभवातील अनेक प्रसंग सांगितले तसेच विज्ञानाच्या विविध शाखा मधील संशोधनामध्ये करिअरच्या वेगवेगळ्या संधी त्याांनी मुलांना सांगितल्या.

या कार्यक्रमासाठी श्री विजय नरवाडे सर तसेच परभणी ॲस्ट्रॉनॉमिक सोसायटीचे सचिव श्री सुधीर सोनुनकर सर उपस्थित होते. मासाठी सर्व विभागांचे समन्वयक ,विभागप्रमुख तसेच शिक्षक वृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री खंडेलवाल सर यांनी केले तर श्री रोकडे सर यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व कर्मचारी वृंद यांनी परिश्रम घेतले.

# मा. आमदार रामप्रसाद बोर्डीकर हस्ते गजानन चौधरी यांचा सन्मान- आरोग्य वर्धिनी योग शिक्षक संघाचे डॉ. मनोज निलपवार हस्ते राज्य अध्यक्षपदी झाली निवड

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी:** मा. आमदार रामप्रसाद बोर्डीकर हस्ते गजानन चौधरी यांचा सन्मान आरोग्य वर्धिनी योग शिक्षक संघाच्या राज्य अध्यक्षपदी झाली निवड जिंतूर- महाराष्ट्र योगशिक्षक संघ अंतर्गत कार्यरत असलेल्या आरोग्य वर्धिनी योग शिक्षक संघटनेच्या महाराष्ट्र राज्य अध्यक्षपदी परभणीचे जिल्हा अध्यक्ष गजानन चौधरी यांची नुकतीच पुणे शहरात आयोजित योगशिक्षक महासंमेलनात संघटनेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. मनोज निलपवार यांनी निवड केली आहे.

पुणे शहरात महाराष्ट्र राज्यातील योग शिक्षकांचे महासंमेलन आयोजित करण्यात आले होते. या संमेलनात ही निवड करण्यात आली जिंतूरचे माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर व जिल्हा परिषद चे माजी उपाध्यक्ष प्रभाकर पाटील वाघे कर यांच्या हस्ते गजानन चौधरी यांचा सन्मान करण्यात आला याप्रसंगी ओंकार चौधरी घनश्याम गोला वामनराव शिंपले मुंजाभाऊ कंठाळे आदी उपस्थित होते. राज्यातील पदाधिकाऱ्यांच्या निवडी व नियुक्ती प्रक्रिया संपन्न झाली. संघटनेच्या समितीने ही प्रक्रिया पार पाडल्यानंतर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. मनोज निलपवार यांनी जिल्हा अध्यक्ष गजानन चौधरी यांची शासनमान्य योग शिक्षकांच्या आरोग्य वर्धिनी योग शिक्षक संघाच्या राज्य अध्यक्षपदी निवड झाल्याचे जाहीर केले. मान्यवरांच्या हस्ते गजानन चौधरी यांना निवडीचे नियुक्तीपत्र देऊन त्याांचा सन्मान करण्यात आला. सदर नियुक्ती बद्दल संघटनेचे संस्थापकीय अध्यक्ष डॉ. मनोज निलपवार, कार्यकारी अध्यक्ष श्री प्रसाद कुलकर्णी,राज्य नियोजन समितीचे अध्यक्ष सदानंद वाली, राज्य महासचिव अमित मिश्रा, योग फाउंडेशन चे सचिव शरद बजाज, पुणे जिल्हा अध्यक्ष सौ. चंद्रज्योती दळवी, जिल्हाध्यक्ष सुभाष जावळे, कृष्णा कवडी यांनी अभिनंदन केले आहे.

छायाचित्र जिंतूर- येथे मा.आ. रामप्रसाद बोर्डीकर यांच्या हस्ते योग शिक्षक संघटनेचे नूतन राज्य अध्यक्ष गजानन चौधरी यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी परभणी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष प्रभाकर पाटील वाघीकर, ओमकार चौधरी, घनश्याम गोला,वामनराव शिंपले, मुंजा कंठाळे दिसत आहेत.

महाराष्ट्र योग शिक्षक संघ हा राज्यातील योग शिक्षकांसाठी कार्य करतो. हा संघ पदाधिकाऱ्यांच्या निवडी करताना त्याांचे कार्य पाहतो. योग शिक्षकांसाठी कार्य करणारा हा एकमेव संघ आहे. डॉ. मनोज निलपवार संस्थापकीय अध्यक्ष महाराष्ट्र योग शिक्षक संघ, महाराष्ट्र संघटनेचे संस्थापकीय अध्यक्ष डॉ. मनोज निलपवार व समितीने विश्वास दाखवून जी संधी दिली आहे याचा सदुपयोग आरोग्य वर्धिनी योग शिक्षकांसाठी करणार आहे. श्री गजानन चौधरी राज्य अध्यक्ष आहेत.



# जलजीवन मिशनची कामे मार्चपर्यंत पूर्ण करा– जिल्हाधिकारी गोयल



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ डिसेंबर.**
जलजीवन मिशन अंतर्गत 'हर घर नल से जल' योजनेची अपूर्ण कामे शासनाच्या उद्दिष्टानुसार मार्च २०२५ पर्यंत पूर्ण करुन ग्रामीण भागातील नागरिकांना ५५ लीटर दरडोई दररोज शुध्द व शाश्वत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, अशा सूचना जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी आढावा बैठकीत दिल्या.

जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषद व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या नळ पाणी पुरवठा योजनेच्या कामाचा दि. १४ डिसेंबर रोजी आयोजित जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनच्या बैठकीत जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अतुल साळुंके यांच्यासह महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, वॅपकॉस अंमलबजावणी संस्था, टाटा त्रयस्थ तांत्रिक तपासणी यंत्रणा इत्यादी विभागाचे अधिकारी, प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. गोयल पुढे म्हणाले, नळ पाणी पुरवठा योजनेच्या कामांचा योग्य दर्जा राखण्यासाठी त्रयस्थ तांत्रिक तपासणी संस्था प्रतिनिधी यांनी कामे प्रगतीपथावर असताना वेळोवेळी भेटी देऊन दर्जा तपासणी करावी. त्यासाठी अंमलबजावणी संस्था व सर्व शासकीय यंत्रणांनी योग्य समन्वय साधून प्रभावीपणे तपासण्या करुन घेण्याचे निर्देश दिले. नळ पाणी पुरवठा योजनेची कामे पूर्ण झाली आहेत, परंतु विद्युत जोडणी अभावी योजना कार्यान्वित झाली नसल्यास त्याबाबत तात्काळ कार्यवाही करावी. ज्या गावातील नळ पाणी पुरवठा योजनांचा उद्भव विहिरीला पाणी लागले नाही, अशा गावांच्या नवीन स्त्रोतांसाठी भूजल सर्वेक्षण यंत्रणेमार्फत तात्काळ सर्वेक्षण करुन नवीन स्त्रोत उपलब्ध करुन घ्यावेत.

जलजीवन मिशन अंतर्गत 'हर घर नल से जल' योजनेच्या अंमलबजावणीसाठी येणाऱ्या अडचणीबाबत मार्गदर्शन केले. जागेअभावी रखडलेल्या योजनांना जिल्हा परिषदेने तात्काळ जागा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी. आवश्यक असलेल्या गावाची सुधारित अंदाजपत्रके तयार करुन शासनाकडे मान्यतेसाठी लवकरात लवकर सादर करावेत. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेने त्यांच्याकडील कामे वेळेत पूर्ण करावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी श्री. गोयल यांनी दिले. ९ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अतुल साळुंके यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

# संतोष देशमुख खून प्रकरणाची चौकशी सीआयडी मार्फत करा

## सकल मराठा समाजाचे मुख्यमंत्र्यांना निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ डिसेंबर**
बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोग येथील मराठा सेवक तथा माजी सरपंच संतोष देशमुख यांचे हत्येचा तपास सीआयडीमार्फत करून प्रकरणातील दोषीविरुद्ध केस फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून आरोपींना फाशीची शिक्षा देण्याच्या संदर्भामध्ये औंढा तालुक्यातील सकल मराठा समाजाच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना औंढा तहसीलदार वैजनाथ भालेराव यांच्यामार्फत बुधवारी निवेदन देण्यात आले आहे.

बीड जिल्ह्यातील मस्साजोग तालुका केज येथील माजी सरपंच तथा मराठा सेवक संतोष देशमुख यांची दिनांक नऊ डिसेंबर रोजी अपहरण करून त्यांचा निर्घुणपणे खून करण्यात आला आहे. सदरील घटना अत्यंत निंदणीय असून खून झाल्यानंतरही गुन्हा नोंद करण्यास जातीयवादी मानसिकतेचे अधिकारी यांचे दुर्लक्षामुळे घडली आहे. बीड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेचे धीडवडे काढणारी आहे. बीड जिल्ह्यातील या घटनेचा तीव्र स्वरूपात निषेध करतो संतोष देशमुख खून प्रकरणातील आरोपींना त्वरित अटक करण्यात यावे, तसेच या प्रकरणाचा तपास सीआयडीमार्फत करण्यात येऊन प्रकरण जलद गती न्यायालयामार्फत चालवण्यात यावे, या प्रकरणातील आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी, अन्यथा या प्रकरणी भविष्यामध्ये तीव्र आंदोलन करावे लागेल असा इशारा देखील निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. निवेदनाव खंडेराव सरनाईक, मनीष आखरे, रमेश शिंदे, पवन जाधव पाटील, अ‍ॅड अमोल जाधव, माधव कोरडे, सुनील पाटील, संतोष कदम, महेश राखोंडे, मनेश खंदारे, त्र्यंबकराव लोंढे, भागवत जगताप, गजानन सोळंके, दत्ता टोंपे, राजू पाटील, विठल अंभोरे, दत्ता बोढारे, एकनाथ शिंदे, शिवशंकर पठाडे, मुजांजी टोम्पे, रामराव गोरख, ओम चव्हाण, गजानन ठीकजे, विठ्ठल जाधव, प्रल्हाद शिंदे, नामदेव कऱ्हाळे, दिलीप पतगे, तुकाराम झाडे यांच्यासह सकल मराठा समाज बांधवाच्या निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत.

# होमगार्ड संघटनेच्या वर्धापन दिनानिमत्त नेत्र तपासणी शिबीर



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ डिसेंबर**
महाराष्ट्र राज्य होमगार्ड संघटनेच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त हिंगोली येथील जिल्हा समादेशक होमगार्ड कार्यालय येथे जिल्हा समादेशक तथा अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रनायक नानासाहेब मोखडे यांच्या अध्यक्षतेखाली आज मंगळवारी होमगार्ड महिला पुरुष व त्यांच्या कुटुंबीयांची नेत्र तपासणी करण्यात आली.

महाराष्ट्र राज्य होमगार्ड संघटनेच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त हिंगोली येथील जिल्हा समादेशक होमगार्ड कार्यालयाच्या वतीने जिल्हा समादेशक तथा अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रनायक नानासाहेब मोखडे यांच्या अध्यक्षतेखाली १३ डिसेंबरपासून सप्ताहास सुरुवात करण्यात आली आहे. पहिल्या दिवशी होमगार्ड यांच्यासाठी 'आहार विहार' या विषयावर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. तर १४ डिसेंबर रोजी शहरातील संत नामदेव पोलीस कवायत मैदान व नवीन पोलीस वसाहत येथे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. १५ डिसेंबर रोजी जिल्हा समादेशक कार्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. १६ डिसेंबर रोजी संचलन व कवायत सराव घेण्यात आली. मंगळवार १७ डिसेंबर रोजी होमगार्ड महिला पुरुष व त्यांच्या कुटुंबीयांची मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. नेत्र तपासणी शिबिराच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रनायक नानासाहेब मोखडे तर प्रमुख पाहुणे म्हणून हिंगोली शहर पोलीस ठाण्याचे नरेंद्र पाडाळकर व हिंगोली ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्यामकुमार डोंगरे यांची उपस्थिती होती. नेत्र तपासणी शिबिराचा दीडशेहून अधिक कर्मचाऱ्यांनी लाभ घेतला. नेत्र तपासणीचे काम प्रीतम सरकटे सेवा प्रतिष्ठानच्यावतीने करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वरिष्ठ पलट नायक हरिशंकर जोशी, भागवत देवरसे, पलट नायक सुनील मुनेश्वर, शंकर कांद्रे, शंकर कंठे, वामन मगर, विश्वनाथ बेंद्रे आदींनी परिश्रम घेतले. दि १८ डिसेंबर रोजी जिल्हा समादेशक कार्यालयाच्या परिसरातून प्रभातफेरी काढण्यात येणार आहे. १९ डिसेंबरला समारोप होणार आहे.



**हिंगोली– सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून कळमनुरी येथील अनुसूचीत जाती व नवबौध्द मुलींच्या शासकीय निवासी शाळा येथे जिल्हास्तरीय क्रिडा व सांस्कृतीक स्पर्धा घेण्यात आल्या.**

# सुशासन सप्ताहात लोकाभिमुख योजना गावपातळीवर पोहचवा– गोयल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ डिसेंबर**
जिल्ह्यात १९ ते २४ डिसेंबरदरम्यान सुशासन सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध लोकाभिमुख योजना 'प्रशासन गाव की ओर' उपक्रमात तहसील आणि पंचायत समितीच्या माध्यमातून ग्रामपंचायत पातळीवर पोहचविण्यात येणार आहेत. त्यामुळे सर्व विभागप्रमुखांनी समाजातील विविध घटकातील नागरिकांच्या अडचणी, तक्रारी विशेष मोहीम, उपक्रम, महसूल अदालत आदि शिबिरांचे आयोजन करून त्या दूर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी दिले.

सुशासन सप्ताहाची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत विभागप्रमुखांची जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेण्यात आली होती. त्यावेळी जिल्हाधिकारी गोयल बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नेहा भोसले, अपर मुख्य कार्यकारी अधिकारी अनूप शेंगुलवार, उपजिल्हाधिकारी अनिल माचेवाड, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी राजेंद्र कदम, जिल्हा नियोजन अधिकारी गं. गो. चितळे यांच्यासह सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

सर्व विभागांनी १९ ते २४ डिसेंबर २०२४ दरम्यान सुशासन सप्ताहात शासनाच्या सर्वच योजना गावपातळीवर प्रभावीपणे राबवाव्यात. तहसीलदार आणि गटविकास अधिकारी यांनी प्रशासनातील सर्व विभागप्रमुखांशी योग्य समन्वय राखून 'प्रशासन गॉव की ओर' या उपक्रमांतर्गत नवनवीन संकल्पना राबवाव्यात. सर्व कार्यालय प्रमुखांनी १९ डिसेंबर रोजी नागरिकांची सनदीचे वाचन करायचे आहेत. दि. २० डिसेंबर रोजी जिल्ह्यातील सर्व तहसील कार्यालयांनी सामाजिक सहाय्य योजनेचे प्रलंबित अर्ज निकाली काढण्याच्या अनुषंगाने शिबिराचे आयोजन करावेत. दि. २१ रोजीला जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती गावकऱ्यांना द्यावी. दि. २२ रोजी अँग्री स्टॅक योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी गावपातळीवर शिबिराचे आयोजन करावे. दि. २३ रोजी शहर व ग्रामीण आवास योजनेची माहिती द्यावी. दि. २४ रोजी सहायक आयुक्त समाज कल्याण विभागाने त्या विभागाच्या योजनांची शिबिरांच्या माध्यमातून माहिती द्यावी. नागरिकांची प्रलंबित प्रकरणे, तक्रारी, प्रश्न सोडविण्यात यावीत, अशा सूचना जिल्हाधिकारी गोयल यांनी यावेळी दिल्या.

## संक्षिप्त वृत्त

### आज अल्पसंख्यांक हक्क दिवसाचे आयोजन

हिंगोली– अल्पसंख्याक हक्क दिवसा निमित्ताने अल्पसंख्यांकांना त्यांच्या घटनात्मक आणि कायदेशीर हक्काबाबत जाणीव किंवा माहिती करून दिली जाणार आहे. त्याअनुषंगाने बुधवार १८ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली येथे सायंकाळी ४ वाजता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. अल्पसंख्यांक समाजातील नागरिकांनी आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी केले आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेने दि. १८ डिसेंबर, १९९२ रोजी राष्ट्रीय, वांशिक, धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्याकांच्या हक्काचा जाहीरनामा स्विकृत करून प्रस्तुत केला आहे. त्यानुसार अल्पसंख्याक नागरिकांना त्यांची संस्कृती, भाषा, धर्म, परंपरा इत्यादींचे संवर्धन करता यावी यादृष्टीने प्रयत्न करण्याबाबत राष्ट्रीय आयोगाने सूचना दिल्या आहेत. त्यानुसार प्रत्येकवर्षी १८ डिसेंबर हा दिवस जिल्हा प्रशासनाच्यावतीने अल्पसंख्याक हक्क दिवस म्हणून राबविण्यात येतो.

### वार्षिक योजनेची कामे वेळेत पूर्ण करा– गोयल

हिंगोली– जिल्हा वार्षिक योजनेचा मंजूर निधी विविध विकास कामांवर खर्च करुन नियोजित कामे संबंधित यंत्रणांनी तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी आज दिले.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण), जिल्हा वार्षिक अनुसूचित जाती उपयोजना, आदिवासी उपयोजनाची आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हाधिकारी श्री. गोयल यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार, जिल्हा नियोजन अधिकारी गं. गो. चितळे, उपजिल्हाधिकारी अनिल माचेवाड यांच्यासह संबंधित विभागाच्या विभागप्रमुखांची उपस्थिती होती. जिल्हाधिकारी श्री. गोयल पुढे म्हणाले, संबंधित यंत्रणांनी तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही तात्काळ पूर्ण करुन विकास कामे सुरु करावीत. मंजूर झालेली सर्व कामे तातडीने देऊन पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. तसेच सन २०२५–२६ चा आराखडा प्रारुप आराखडा आयपास प्रणालीवर भरुन सादर करण्याच्या सूचना केल्या. मंजूर संपूर्ण निधीचा विनीयोग करुन निधी परत जाता कामा नये, याची खबरदारी घ्यावी. तसेच मागील वर्षीची प्रलंबित कामे तात्काळ पूर्ण करण्याबाबत निर्देश दिले.

### नायलॉन मांजा न वापरण्याचे आवाहन

हिंगोली– मकरसंक्रांतीचा सण जवळ आल्यामुळे अनेकजण पतंग उडविण्याचा आनंद घेत असतात. त्या अनुषंगाने नायलॉन मांजाचा धोका लक्षात घेता या मांजा वापरावर बंदी घालण्यात आली असून नायलॉन मांजाचे कुणीही वापर करू नये तसेच व्यापाऱ्यांनीही मांजाची विक्री करू नये, असे आढळल्यास संबंधीतांवर पर्यावरण संरक्षण कायद्यांतर्गत व भारतीय न्याय संहिता अन्वये कारवाई करण्याचा इशारा पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दिला आहे.

# नांदेड परीक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक यांचा लवकरच हिंगोली दौरा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ डिसेंबर**
नांदेड परिक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक उमप यांचा हिंगोली दौरा होणार असून या पार्श्वभूमीवर काही पोलिस ठाण्यांची तपासणी होणार आहे. यानिमित्त पोलिस ठाण्यातील अधिकारी, कर्मचारी कामाला लागल्याचे दिसत आहेत.

नांदेड परिक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक उमप हे लवकरच हिंगोली दौऱ्यावर येणार असून त्यांच्या दौऱ्यात पोलिस ठाण्यांची तपासणी होणार आहे. येथील पोलिस उपअधीक्षक कार्यालय ग्रामीणचे उपअधीक्षक सुरेश दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस ठाण्याची साफसफाई तसेच रंगरंगोटीचे काम करण्यात येत आहे तसेच पोलिस अधीक्षक कार्यालयातही साफसफाई आणि रंगरंगोटी करण्यात येत असून यानिमित्त पोलिस ठाण्यातील फाईलीही तयार करण्यात येत आहेत. यानिमित्त अधिकारी, कर्मचारी कामाला लागल्याचे दिसत आहे. दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासन सज्ज झाले आहे.

# छगन भूजबळ यांना मंत्रीमंडळात डावलल्याने समता परिषद आक्रमक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ डिसेंबर**
नुकत्याच राज्याच्या मंत्रीमंडळ विस्तारामध्ये ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते तथा माजी मुख्यमंत्री आ. छगन भुजबळ यांना महायुती सरकारने मंत्रीमंडळात स्थान दिले नसल्याने हिंगोलीत समता परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी सोमवारी बैठक घेवून निषेध नोंदविला.

मागील अनेक वर्षापासुन माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ हे ओबीसीचे नेतृत्व करीत असून राष्ट्रीय व राज्य स्तरावर त्यांनी ओबीसीच्या न्याय हक्कासाठी नेहमीच लढा चालु ठेवला. नुकत्याच विधानसभा निवडणुकीत महायुतीला मोठे घवघवीत यश संपादन झाले. नागपुर येथील अधिवेशन दरम्यान १५ डिसेंबर रोजी राज्य मंत्री मंडळाच्या विस्तारामध्ये माजी उपमुख्यमंत्री तथा ओबीसी नेते आ. छगन भुजबळ यांना सरकारने मंत्री मंडळातुन वगळल्याने १६ डिसेंबर रोजी हिंगोलीत समता परिषदेच्या पदाधिकार्यांची तातडीची बैठक समता परिषद जिल्हाध्यक्ष चंदु भाऊ लव्हाळे यांच्या उपस्थितीत घेण्यात आली. या प्रसंगी चंदु भाऊ लव्हाळे यांनी बोलताना महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत ओबीसी समाजाने महायुतीच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहण्याच्या सुचना ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी दिल्या होत्या. त्यानुसार राज्यात सर्वच ठिकाणी महायुतीच्या पाठीमागे ओबीसी समाज खंबीरपणे उभे राहिल्याने महायुतीचे २३० आमदार निवडुन आले. परंतु गरज सपताच ओबीसीचे नेते व ओबीसींना राज्याच्या राजकारणातुन डावलण्याचा प्रयत्न होत आहे. त्याच उद्देशातून ओबीसी नेते छगन भुजबळ यांना मंत्री मंडळातुन डावल्यात आले आहे. त्यामुळे हा अन्याय समता परिषद कदापीही खपवुन घेणार नसून भविष्यात ओबीसी नेते भुजबळ हे जो काही निर्णय घेतील त्यांच्या पाठीशी हिंगोली जिल्ह्यातील समता परिषद ठामपणे उभे राहणार असल्याचा निर्धार केला असल्याचे लव्हाळे यांनी आपल्या मनोगतात बोलतांना साांगितले.

यावेळी समता परिषद महिला अध्यक्षा श्रीमती वनीताताई गुंजकर, जयश्रीताई सातव, ज्योती दिघडे, मिराताई राऊत, मंदाताई पारिसकर, बालाजीराव सोनवणे, डॉ. रवि थोरात, समता परिषदेचे शहराध्यक्ष चंद्रशेखर उबाळे, वसंत वाघ, संतोष भुसांडे, भागवत बोधने, प्रभाकर पारिसकर, अक्षय लव्हाळे, नागशे धनमने, संदिप भुसांडे, राजु लव्हाळे, विजय बनचरे, मारोती बनसोडे, संग्राम पांडुळे, गणेश कोंडाने, रोहित चौधरी, स्वराज वाघ, गणेश बंबरुले, राजु बनचरे, पवन मुळे, आकाश मोटे, चेतन कोंडाने, शतपाल यादव, रितेश शहाणे, विवेक वानखेडे, सुशिल कसबे, आशिष मुधळे यांच्यासह अनेक समता परिषदेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# हिंगोलीत थंडीची लाट

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ डिसेंबर**
मागील तीन दिवसांपासून हिंगोली शहरासह जिल्ह्यात थंडीची लाट आली आहे. मागील आठवड्यात आभाळ आल्यामुळे थंडी ओसरली होती परंतु रविवारपासून पुन्हा कडाक्याची थंडी पडत असल्यामुळे नागरिकांनी गरम कपडे खरेदी करण्यासाठी दुकानांमध्ये गर्दी केली आहे तसेच जागोजागी थंडीपासून बचावासाठी शेकोट्या पेटतांना दिसत आहेत. दुसरीकडे शेतकरी मात्र आनंदी झाले आहेत. थंडीमुळे गहु, हरभरा आणि तुर या पिकांना पोषक वातावरण निर्माण झाल्यामुळे उत्पादनात वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.